महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन

मासिक

# उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

वर्ष ३४ वे

ऑगस्ट 2024

₹ 75/-

दरमहा १५००, वर्षाला १८,००० रुपये जमा होणार थेट बँक खात्यात

## 'माझी लाडकी बहीण'

योजना ठरणार महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा महामार्ग





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन, २९,००० कोटींच्या प्रकल्पांचा शुभारंभ, पायाभरणी, लोकार्पण

## महाराष्ट्राला जगाचे पॉवर हाऊस बनविणार



केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, जगातील पहिल्या १० बंदरांपैकी एक ठरणार

## वाढवण येथे ७६,२०० कोटी रुपयांचे ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट बंदर



शाश्वत वाहतुकीच्या दिशेने पाऊल

## महिला स्वयंरोजगारासाठी 'पिंक ई-रिक्षा'

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

**उद्योजकता विकास क्षेत्रात ३४ वर्षापासून कार्यरत संस्था**

**ध्येय (Mission)**

**जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती**

**दृष्टिकोन (Vission)**

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंर्तगत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ज प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ज असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वतःचे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.

प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.

मा. कार्यकारी संचालक
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.
Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in

MCED

उद्योजकीय मन घडविणारे मासिक
उद्योजक

**Visit us @ http://www.mced.co.in**

उद्योजक

*August-2024, VOL.XXXIV, ISSUE VIII*

मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-38, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - 431 005.
☎ 2321223, 2321224
फॅक्स : (0240) 2341719

**सल्लागार मंडळ**
**डॉ. भा. र. साबडे**
संचालक, आयएसबीआय, पुणे
**डॉ. यु. म. पठाण**
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**श्री. राम भोगले**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. रा. रं. बोराडे**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**संपादक**
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर
**श्री. विवेक देशपांडे**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. सुधीर सेवेकर**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर
**अध्यक्ष**, मसिआ, छत्रपती संभाजीनगर
**विभागप्रमुख**, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
**श्री. सुरेश वाघ**, नाशिक

उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन
अंतर्गत कार्यरत संस्था
MCED
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र
यांचे प्रकाशन

**E-mail :**
udyojakmagazine1@gmail.com
udyojakadvt@gmail.com

**Portal :**
www.mced.co.in

**कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.**


# स्वातंत्र्याचा अमृतकाळ



४ जुलै १९४७ रोजी 'ब्रिटिश हाऊस ऑफ कॉलोनियल'मध्ये भारतीय स्वातंत्र्य विधेयक सादर करण्यात आले. ब्रिटिशांनी १८ जुलै १९४७ रोजी प्रदीर्घ काळापासून सक्रिय असणारा भारतीय स्वातंत्र्य कायदा लागू केला आणि तो भारतीय स्वातंत्र्य चळवळीला कारणीभूत ठरला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांची १५० वर्षांची राजवट संपून भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक आणि स्वातंत्र्याची आठवण म्हणून हा दिवस 'स्वातंत्र्य दिवस' म्हणून साजरा केला जाऊ लागला.

यंदा देश ७७ वा स्वातंत्र्य दिवस साजरा करत आहे. दोन वर्षांपूर्वी स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष पूर्ण होऊन अमृतकाळाला सुरुवात झाली. स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंतचा हा २५ वर्षांचा काळ देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. अमृतकाळात देशवासियांच्या जीवनमानात सुधार करणे, गाव आणि शहराच्या विकासातील भेदभाव संपवणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून जीवन सुकर करण्याचे उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठरवले आहे. त्यादृष्टीने देशाची आणि महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली आहे.

महाराष्ट्राच्या प्रगतीवर केंद्राचे लक्ष आहे. यामुळेच देशातील सर्वाधिक पायाभूत प्रकल्प राज्यात सुरू आहेत. गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदा महाराष्ट्राला भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते तब्बल २९ हजार कोटींहून अधिक किमतीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे शुभारंभ, भूमिपूजन, पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पांमुळे राज्यातील नागरिकांचे जीवन सुलभ होणार आहे. प्रवासाचा वेळ वाचेल आणि एकूणच जीवनाला गती प्राप्त होईल. तत्पूर्वी पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळील वाढवण येथे ७६,२२० कोटी रुपये मूल्याचे बारमाही ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट प्रमुख बंदर उभारण्यास मंजुरी देण्यात आली. जगातील पहिल्या दहा बंदरांपैकी एक म्हणून हे बंदर उभे राहील. यातून सुमारे १० लाख नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

केंद्र शासनाने देशाला जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सची करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यात महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्सचा वाटा देणार आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेने एवढी मोठी झेप घेण्यासाठी उद्योग क्षेत्राकडे आशेने बघितले जात आहे. त्यादृष्टीने अर्थमंत्री अजित पवार यांनी यंदा २८ जून रोजी सादर केलेला राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अर्थसंकल्पात उद्योग क्षेत्रासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. राज्यात नवीन सूक्ष्म व लघु उद्योग धोरण लागू केले जाणार आहे. महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना' तर लघुउद्योजक महिलांना १५ लाख कर्जापर्यंतच्या व्याजाचा परतावा देणाऱ्या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. नवी मुंबईत महापे येथे जेम्स ॲण्ड ज्वेलरी पार्कची निर्मिती करण्याचे नियोजन आहे. राज्यातील महिला व मुलींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. त्यास राज्यातून चांगला प्रतिसाद मिळतोय. २०२३-२४ मध्ये राज्याच्या कृषी व संलग्न कार्ये क्षेत्रात १.९%, उद्योग क्षेत्रात ७.६% तर सेवा क्षेत्रात ८.८ % वाढ अपेक्षित आहे. ही राज्यासाठी समाधानाची बाब आहे.

स्वातंत्र्य हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा प्रसंग नाही, तर तो आपल्या देशाच्या उन्नतीचा, प्रगतीचा आणि सर्वांगीण विकासाचा संकल्प करण्याचा दिवस आहे. स्वातंत्र्याच्या ७ दशकांचा मागोवा घेतला असता भारताची प्रगती नेत्रदीपक असल्याचे लक्षात येते. शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, औद्योगिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रांमध्ये भारताने जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण केले आहे. मात्र, अजूनही अनेक आव्हाने संपलेली नाहीत. बेरोजगारी, दारिद्र्य, निरक्षरता आणि सामाजिक असमानता यासारख्या प्रश्नांवर मात करण्यासाठी सर्वांची एकजूट आवश्यक आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त ही एकजूट दाखविण्याचा संकल्प करूया.

स्वातंत्र्य दिनाच्या आपण सर्वांना खूप खूप शुभेच्छा... स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...

**दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.**
**विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा**
**अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)**


Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक

## ऑगस्ट 2024

## अंतरंग




- महाराष्ट्राला जगाचे पॉवर हाऊस बनविणार / डॉ. आरतीश्यामल जोशी ............................०५
- सर्वसामान्यांना दिलासा; विकसित भारत संकल्पनेला बळ / प्रतिनिधी.............................०७
- ‘माझी लाडकी बहीण’ योजना ठरणार महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा महामार्ग / प्रिया गंधे ......०९
- महिला स्वयंरोजगारासाठी ‘पिंक ई-रिक्षा’ / प्रतिनिधी ............................................११
- असंघटित क्षेत्रातच रोजगार वाढ / हेमंत देसाई ..................................................१३
- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना / प्रतिनिधी ..............................................१५





- वाढवण येथे ७६,२०० कोटी रुपयांचे ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट बंदर / प्रिया गंधे.....................१९
- फ्लोटिंग सोलरमध्ये संधींसह अडथळेही भरपूर / महेश जोशी.................................२०
- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना : शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीची तजवीज / प्रतिनिधी.......२२
- धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे.................................२३
- डिजिटल परिवर्तनाला सेल्सफोर्सचे साह्य / प्रतिनिधी .........................................२६
- इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१९ : इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला संजीवनी / - संतोष बोर्डे................२७





- सायबर साक्षर होण्यासाठी / प्रतिनिधी.......................................................३०
- डेटा ॲनालिटिक्समध्ये संधी अनलिमिटेड / प्रतिनिधी.........................................३१
- करिअरची आकडेमोड / प्रतिनिधी...........................................................३३
- अन्न उद्योगात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका / शेख मोहम्मद सोहेल खलील, .......................३६
- संस्कृतीकडून समृद्धीकडे / डॉ. आरतीश्यामल जोशी..........................................३७
- दोन शब्द कौतुकाचे, परिणाम लाखमोलाचे / जीवन मुळे........................................३९





- महाराष्ट्रातील खाद्य व कृषी पर्यटनातील संधी / निलाक्षी पवार..................................४१
- उसापासून गोल्डन ब्लॉक्सपर्यंत / ऋषिकेश बारगजे.............................................४३
- वाहन चालक ते ड्रायव्हिंग स्कूलचा मालक / डॉ. उमेश कणकवलीकर..............................४५
- असामान्य प्रेरणादायी प्रवास / सुधीर साबळे...................................................४७
- नवे आयाम, नवे दृष्टिकोन / डॉ. अभिराम विजया सुरेश डबीर.................................५०
- हॅकर्सना धडा शिकवणार ‘न्यूटन्स ॲपल्स’/ प्रसाद घारे...........................................५३
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये .........................................................५५

इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल व सिंटर्ड मेटल ब्रश

याशिवाय संपादकीय, शीर्षासन, प्रश्नपेटी इत्यादी...



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन, २९,००० कोटींच्या प्रकल्पांचा शुभारंभ, पायाभरणी, लोकार्पण

# महाराष्ट्राला जगाचे पॉवर हाऊस बनविणार

**मुंबई हे देशाचे पॉवर हाऊस असून महाराष्ट्राला जगातील शक्ती केंद्र आणि मुंबईला फिनटेक कॅपिटल बनविणे हे स्वप्न असल्याचे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. महाराष्ट्राला गौरवशाली इतिहास असून राज्य उद्योग, कृषी आणि वित्तक्षेत्राचे शक्ती केंद्र आहे. महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्राला मोठा वाव असून राज्य पर्यटनाचे हब बनावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मुंबईत मोदी यांच्या हस्ते तब्बल २९ हजार कोटींहून अधिक किमतीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे रिमोटद्वारे शुभारंभ, भूमिपूजन, पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर पंतप्रधान मोदी १३ जुलै रोजी पहिल्यांदाच महाराष्ट्रात आले होते. याप्रसंगी मुंबईतील गोरेगाव स्थित नेस्को प्रदर्शन केंद्र येथे आयोजित कार्यक्रमात त्यांनी २९ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित विविध प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी केले. यात प्रामुख्याने ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचे भूमिपूजन, गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्पांतर्गत दुहेरी बोगद्याचे भूमिपूजन, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ, कल्याण यार्ड रिमॉडेलिंग प्रकल्प पायाभरणी, लोकमान्य टिळक टर्मिनस येथे नवीन प्लॅटफॉर्मचे राष्ट्राला समर्पण, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे विस्तारित प्लॅटफॉर्म क्र. १० आणि ११ चे राष्ट्राला समर्पण आणि तुर्भे गतीशक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनल प्रकल्पाची पायाभरणी या कामांचा समावेश होतो. कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांची उपस्थिती होती.

**वाढवण बंदरातून १० लाख रोजगार :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, गेल्या काही वर्षात मुंबई आणि परिसराची कनेक्टिव्हिटी वाढली आहे. येत्या काही वर्षात ती अधिक चांगली होईल. राज्यात विविध विकास प्रकल्प उभारले जात असून यामुळे रोजगारदेखील वाढत आहे. वाढवण बंदराला नुकतीच मंजुरी देण्यात आली असून ७६ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख रोजगारनिर्मिती होणार आहे. महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांचे आकर्षण केंद्र बनले असून केंद्र आणि राज्य सरकार अधिक वेगाने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र पर्यटनाचे हब बनावे :** महाराष्ट्राला गौरवशाली इतिहास आहे. महाराष्ट्र हे उद्योग क्षेत्राचे शेती क्षेत्राचे तसेच वित्तक्षेत्राचे शक्ती केंद्र आहे. पर्यटन क्षेत्राला येथे मोठा वाव असून हे पर्यटनाचे हब बनावे अशी अपेक्षा मोदी यांनी व्यक्त केली. देशातील नागरिकांना गतीने विकास हवा असून यात मुंबईसह महाराष्ट्राचा मोठा वाटा असणार असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील नागरिकांचे जीवन अधिक दर्जेदार करण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. सागरी किनारा मार्ग अटल सेतू अशा प्रकल्पांमुळे नागरिकांना मोठा लाभ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. १० वर्षांपूर्वी मुंबईत ८ किलोमीटर मेट्रो धावत होती, आज ती ८० किलोमीटर धावत असून २०० किलोमीटर मेट्रो नेटवर्कवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.



**पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर**

**- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर मागील १० वर्षात देशाने अभूतपूर्व प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे राज्यातही विविध विकास प्रकल्प पूर्ण होत असून विकासकामांना नवी गती मिळाली आहे. पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. राज्यातील प्रत्येक योजनेला पंतप्रधान मोदी यांचा पाठिंबा मिळतो आहे. उद्योगस्नेही राज्य अशी महाराष्ट्राची ओळख पुन्हा निर्माण होत आहे. त्यांच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या प्रकल्पांचे लोकार्पण देखील पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होईल. तसेच सुरक्षित, सुशोभित आणि भक्कम मुंबई घडवायची आहे. त्यासाठी प्रधानमंत्री यांची साथ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### मुंबईचे चित्र बदलणार

### - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान मोदी यांच्या पाठिंब्यामुळे मुंबईत विविध विकासकामे होत असून पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्यांचे नाव इतिहासात लिहिले जाईल. २०१८ साली राज्याने मुंबईत कोठेही १ तासात प्रवास करता येईल अशी कनेक्टिव्हिटी तयार करण्याचा संकल्प केला होता, त्यांच्या हस्ते भूमिपूजन होत असलेल्या प्रकल्पांमधून ते साध्य होईल. मुंबईत होत असलेले विविध प्रकल्प हे पायाभूत सुविधांचे चमत्कार आहेत. या प्रकल्पांमुळे भविष्यात मुंबईचे संपूर्ण चित्र बदललेले असेल, असे त्यांनी सांगितले.

**कनेक्टिव्हिटी वाढल्याचा सर्वांना लाभ :** पंतप्रधानाच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलेल्या मुंबईतील प्रकल्पांमुळे प्रवासाच्या वेळात वेळेत मोठी बचत होणार आहे. कनेक्टिव्हिटी वाढल्याचा सर्वांना लाभ होणार आहे. विविध तीर्थयात्रांमध्ये सुविधा वाढवणार असल्याचा उल्लेख करून पंतप्रधान मोदी यांनी पंढरपूर वारीसाठी पालखी मार्ग लवकरच सेवेत येईल. राज्यात युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती दिली जात आहे. याचा युवकांना मोठा लाभ होईल, असे त्यांनी नमूद केले. राज्यात सर्वसामान्यांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांचे त्यांनी कौतुक केले.

दरम्यान, तत्पूर्वी नरेंद्र मोदी यांचे मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे भारतीय वायू सेनेच्या विमानाने आगमन झाले. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि पवार यांच्यासह आमदार आशिष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राजशिष्टाचार विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, व्हॉईस अडमिरल संजय जसजीत सिंह, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.



**मा.श्री. उदय सामंत**
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

**नवीन प्रकल्पांविषयी :** पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते लोकमान्य टिळक टर्मिनस येथील नवे फलाट (प्लॅटफॉर्म) तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मधील फलाट क्र. १० आणि ११ चा विस्तारीत भाग यांचे लोकार्पण झाले. लोकमान्य टिळक टर्मिनसमधील नवे, अधिक लांबीचे फलाट जास्त लांबीच्या गाड्यांसाठी सुयोग्य ठरतील आणि प्रत्येक गाडीत अधिक प्रवाशांची सोय होईल. तसेच प्रवाशांच्या वाढलेल्या वाहतुकीचे नियमन करण्याची रेल्वे स्थानकाची क्षमता देखील यामुळे सुधारेल. यासाठी ६४ कोटींचा खर्च आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकातील फलाट क्र. १० आणि ११ यांची लांबी ३८२ मीटरने वाढवण्यात आली असून या भागावर सावलीसाठी आच्छादन तसेच गाडी धुण्याच्या दृष्टीने या भागातील रेल्वे रुळांवर विशेष सोय देखील केलेली आहे. या विस्तारामुळे या फलाटाची क्षमता तब्बल २४ डब्यांची गाडी उभी राहण्याइतकी वाढली आहे. यासाठी ५२ कोटी रुपये खर्च आला आहे.

-ठाणे बोरिवली हा १६,६०० कोटी रुपये खर्चाचा बोगदा प्रकल्प आहे. ठाणे आणि बोरिवली दरम्यान हा दुहेरी ट्यूब बोगदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खालून जाणार आहे. यामुळे बोरिवलीच्या दिशेने पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि ठाणेकडील ठाणे-घोडबंदर रोड दरम्यान थेट संपर्क व्यवस्था निर्माण होईल. प्रकल्पाची एकूण लांबी ८ किमी आहे. यामुळे ठाणे ते बोरिवली हा प्रवास १२ किमीने कमी होईल आणि प्रवासाच्या वेळेत सुमारे एक तासाची बचत होईल.

-गोरेगाव मुलुंड लिंक रोड या ६३०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाच्या बोगद्याच्या कामाची पायाभरणी केली. गोरेगाव येथील पश्चिम द्रुतगती महामार्ग ते मुलुंड येथील पूर्व द्रुतगती महामार्ग या दरम्यान रस्ता जोडणे ही गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाची कल्पना आहे. गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाची एकूण लांबी अंदाजे ६५ किलोमीटर आहे आणि पश्चिम उपनगरांना नवी मुंबई येथील नवीन प्रस्तावित विमानतळ आणि पुणे मुंबई एक्स्प्रेस वे शी थेट कनेक्टिव्हिटी प्रदान करेल.

### तरुणांना दिशा मिळेल

### - उपमुख्यमंत्री अजित पवार



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्य शासन लोकहिताचे निर्णय घेत असून विविध लोककल्याणकारी प्रकल्प वेगाने पूर्ण होत आहेत. युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून तरुणांना दिशा दाखवण्याचे काम होणार असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

-मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा प्रारंभ देखील पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला. हा एक परिवर्तनकारी आंतरवासिता कार्यक्रम असून १८ ते ३० या वयोगटातील तरुणांना कौशल्य सुधार आणि उद्योगाभिमुखतेच्या संधी देऊन तरुणांमधील बेरोजगारीची समस्या सोडवणे, हे यामागचे उद्दिष्ट आहे. यासाठी सुमारे ५५४० कोटी रुपये खर्च होणार आहे.

-कल्याण यार्डाच्या पुनर्रचनेच्या कामाची पायाभरणी देखील पंतप्रधानांनी केली. कल्याण यार्डाच्या पुनर्रचनेमुळे लांब पल्ल्याच्या गाड्या आणि उपनगरी रेल्वे गाड्या यांच्या वाहतुकीचे पृथक्करण करण्यात मदत होईल. या पुनर्रचनेनंतर अधिक गाड्यांची वाहतूक हाताळण्यासंदर्भात यार्डाच्या क्षमतेत वाढ होईल, रेल्वेगाड्यांची कोंडी होणे कमी होईल आणि गाड्यांचे परिचालन करण्यासंदर्भात यार्डाच्या कार्यक्षमतेत सुधारणा होईल. यासाठी ८१३ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

-नवी मुंबईमध्ये तुर्भे येथील गतिशक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनल ३२,६०० चौरस मीटर्सहून अधिक क्षेत्रावर उभारले जाणार असून हे टर्मिनल स्थानिक जनतेसाठी अतिरिक्त रोजगार संधी निर्माण करेल आणि सिमेंट तसेच इतर वस्तूंच्या हाताळणीसाठी आवश्यक अतिरिक्त टर्मिनलची गरज पूर्ण करेल. हा प्रकल्प २७ कोटींचा असेल.

*(या लेखाच्या लेखिका उद्योजक मासिकामध्ये कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) म्हणून कार्यरत असून त्यांना मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा सतरा वर्षांचा अनुभव आहे.)*



’नवरत्न’ अर्थसंकल्पात युवा भारताचे प्रतिबिंब, मुख्यमंत्री शिंदे यांची प्रतिक्रिया

# सर्वसामान्यांना दिलासा; विकसित भारत संकल्पनेला बळ

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातून सूक्ष्म, लघु, मध्यम औद्योगिक क्षेत्राला नवी चालना मिळाली आहे. युवकांना असंख्य नव्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पातून शिक्षण आणि कौशल्य विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला, तर कररचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देत पंतप्रधान मोदी यांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास सार्थ ठरविला. यंदाचा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रित करणारा नवरत्न अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि ‘विकसित भारत’ संकल्पनेला बळ देणारा असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.**

**- प्रतिनिधी**



**मा.श्री.एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या अर्थसंकल्पाची प्रतीक्षा सर्वांनाच लागली होती. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा २३ जुलै २०२४ रोजी केंद्रीय अर्थसंकल्प मांडला. अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, निर्मला सीतारामन आणि त्यांचे सहकारी अभिनंदनास पात्र आहेत. हा अर्थसंकल्प समाजातील प्रत्येक घटकाला शक्ती देणारा आहे. हा देशातील ग्रामीण भागातील गरिबांना समृद्धीच्या वाटेवर नेणारा अर्थसंकल्प आहे. मागच्या दहा वर्षात २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर निघाले. या माध्यमातून जो नव मध्यम वर्ग तयार झाला. त्यांना या अर्थसंकल्पातून सशक्तीकरण करण्यात आले आहे. युवकांना असंख्य नव्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शिक्षण आणि कौशल्य विकासाला या अर्थसंकल्पातून एक नवी गती मिळेल. मध्यम वर्गाला शक्ती देणारा अर्थसंकल्प आहे. दलित आणि वंचितांना सशक्त करणाऱ्या नव्या योजनांसह हा अर्थसंकल्प समोर आला आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर काढले.

### उद्योगविश्वाला गती देणारा अर्थसंकल्प
### - पंतप्रधान नरेंद्र मोदी



अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातून सूक्ष्म, लघु, मध्यम औद्योगिक क्षेत्राला नवी चालना मिळाली आहे. ई-कॉमर्स एक्सपोर्ट हब आणि फूड क्वालिटी टेस्टिंगसाठी १०० युनिट स्थापन करण्यात येणार आहेत. यातून वन प्रॉडक्ट, वन डिस्ट्रिक्ट योजनेला गती मिळेल. आमच्या स्टार्टअप आणि संशोधक वृत्तीच्या लोकांसाठी हा अर्थसंकल्प खूप साऱ्या संधी घेऊन आला आहे. अवकाश तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी एक हजार कोटींचा निधी देणे असो किंवा एंजल कर हटविण्याचा निर्णय असो, असे अनेक महत्त्वाचे निर्णय अर्थसंकल्पातून घेण्यात आले आहेत.

### नवीन कररचनेत सर्वसामान्यांना दिलासा

पंतप्रधानांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास ठरविला सार्थ ठरविणारा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल सीतारामन यांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा निर्णय हा कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. त्याचबरोबर एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाने देखील महाराष्ट्रात नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी पावले उचलल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नवीन कररचना ही सामान्यांना, नोकरदारांना दिलासा देणारी असून त्याचे मी स्वागतच करतो. या नव्या कररचनेमुळे करदात्यांची संख्याही वाढेल. यातून विकासाला आवश्यक असणाऱ्या करसंकलनातही महाराष्ट्र अग्रेसर राहील, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

### ग्रामीण भागाचा कायापालट

या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रातील उत्पादकता, रोजगार व कौशल्य विकास, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकास, ऊर्जा, संरक्षण, पायाभूत संरचना, संशोधन व विकास, नव्या पीढीतील सुधारणा या नऊ घटकांचा प्रामुख्याने विचार करण्यात आल्याने सर्वसमावेशक असा हा अर्थसंकल्प असल्याचे सांगत ग्रामीण भारताच्या विकासासाठी केलेली २.६६ लाख कोटी रुपयांची तरतूद खेड्यांचा कायापालट करणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

### ५० लाख अतिरिक्त रोजगार

आपला देश युवांचा आहे असे नेहमी म्हटले जाते. त्याचे प्रतिबिंब आजच्या अर्थसंकल्पात पहायला मिळाले असून युवा वर्गासाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत. पहिल्यांदाच रोजगारासाठी तयार झालेल्या युवकांना एक महिन्याचा भत्ता पहिल्या महिन्यात देण्याचा निर्णय हा युवांसाठी दिलासा देणारा आहे. ५० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याचा देखील निर्धार अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील युवकांनाही रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे. देशातील ५०० अग्रणी कंपन्यांमध्ये युवकांना इंटर्नशिप संधी मिळणार असून पाच वर्षांत सुमारे एक कोटी तरुणांना याचा फायदा होणार आहे. कौशल्य विकासासाठी जाहिर केलेल्या नवीन योजनेद्वारे राज्य सरकार व उद्योगविश्व यांच्या संयुक्त विद्यमानातून ५ वर्षांच्या काळात २० लाख युवकांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मुद्रा योजनेतून दुप्पट कर्ज देण्याचा निर्णयही युवांना सक्षम करणारा आहे.

### पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी

अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या निर्माणासाठी देखील भरीव तरतूद करण्यात आला आहे. देशात पायाभूत सुविधा उभारणी कामात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ११ लाख कोटींची भांडवली तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय पायाभूत सुविधांमध्ये होणाऱ्या खासगी गुंतवणुकीला सरकारी धोरणांमधून प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना अधिक पाठबळ मिळेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. देशभरात रस्तेबांधणीसाठी २६ हजार कोटींचा खर्च केला जाणार असल्याने दळणवळणाचे जाळे मजूबत होणार आहे. देशभरात १२ इंडस्ट्रियल पार्कला नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्रॅमअंतर्गत मंजुरी देण्याचा निर्णय हा उद्योगक्षेत्राला भरारी देणारा आहे. देशभरातील २५ हजार गावांसाठी चांगल्या दर्जाचे रस्ते बनवण्यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा ४ सुरू करण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजनेद्वारे सौर ऊर्जेला चालना मिळणार असून अर्थसंकल्पातील तरतुदी आणि योजनांमुळे महाराष्ट्राच्या विकासात मोठी भर होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### महाराष्ट्राच्या चौफेर विकासाला बळ

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाचा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या चौफेर विकासाला बळ देणार असल्याचे प्रतिपादन केले. केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले, देवेंद्र फडणवीस यांनी वाचली यादी -

- विदर्भ-मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पः ६०० कोटी
- महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधारः ४०० कोटी
- सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉरः ४६६ कोटी
- पर्यावरणपूरक शाश्वत कृषी प्रकल्पः ५९८ कोटी
- महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पः १५० कोटी
- MUTP-३ : ९०८ कोटी
- मुंबई मेट्रोः १०८७ कोटी
- दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरः ४९९ कोटी
- MMR ग्रीन अर्बन मोबिलिटीः १५० कोटी
- नागपूर मेट्रोः ६८३ कोटी
- नाग नदी पुनरुज्जीवनः ५०० कोटी
- पुणे मेट्रोः ८१४ कोटी
- मुळा-मुठा नदी संवर्धनः ६९० कोटी



दरमहा १५००,
वर्षाला १८,००० रुपये जमा
होणार थेट बँक खात्यात

# 'माझी लाडकी बहीण' योजना ठरणार महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा महामार्ग

**राज्यातील महिला व मुलींना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करणे, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्य शासनाने राज्य शासनातर्फे 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' सुरू करण्यात आली आहे. महिला व मुलींना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर रोजगारनिर्मितीस चालना, महिलांचे आर्थिक-सामाजिक पुनर्वसन आणि सशक्तीकरणास चालना तसेच महिला व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे हे सुद्धा या योजनेचे उद्दिष्ट आहेत. याचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येतील. योजनेस राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळतोय.**

**- प्रिया गंध्रे**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या यंदाच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. यात सर्वांचे लक्ष वेधून घेणारी घोषणा म्हणजे, 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना'. मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रात ही योजना आणण्यात आली आहे. योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र राहिलेल्या महिलांना स्वतःच्या आधार लिंक केलेल्या खात्यात थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल, तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येणार आहे. याचाच अर्थ त्या महिलेला १ वर्षात १८ हजार रुपये मिळणार आहेत.

### किचकट अटी केल्या शिथिल

योजना जाहीर केली त्यावेळी त्यात वयोमर्यादेपासून काही किचकट अटी होत्या. मात्र, राज्यातील अधिकाधिक महिलांना लाभ घेता यावा यादृष्टीने सरकारने त्या वेळोवेळी शिथिल केल्या. योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिलांना तसेच कुटुंबातील एका अविवाहित महिलेला दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. राज्यातील अनेक महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरायचा आहे. जिथे अशक्य आहे, तिथे ऑफलाइन अंगणवाडी सेविका, सेतू सुविधा केंद्रात अर्ज जमा करता येईल. घरच्या घरी मोबाइलवरूनही नारीशक्तीदूत ॲपवरून ऑनलाइन अर्ज भरता येईल. महिलांसाठी गेमचेंजर ठरणाऱ्या या योजनेविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊया -

**योजनेचा उद्देश :** राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करून रोजगारनिर्मितीस चालना देणे; त्यांचे आर्थिक-सामाजिक पुनर्वसन करणे; राज्यातील महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे; राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना देणे; महिला व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे.

**योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :** २१ ते ६५ वर्ष वयोगटातील महिला; लाभार्थी महाराष्ट्राच्या रहिवासी असणे आवश्यक; लाभार्थी महिलेचे बँक खाते असणे आवश्यक; लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे; पिवळे व केशरी रेशनकार्ड असल्यास उत्पन्न दाखला प्रमाणपत्रातून सूट; विवाहित, विधवा, घटस्फोटित, परितक्त्या, निराधार व कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ; योजनेचा लाभ मिळण्यासाठी अधिवास प्रमाणपत्र नसल्यास १५ वर्षांपूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्मदाखला यापैकी ग्राह्य; परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील पुरुषाबरोबर विवाह केला असल्यास पतीचा जन्मदाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य

**अपात्रता :** ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष रुपयांपेक्षा अधिक; ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता; ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी

म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत; परंतु बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी अपात्र ठरणार नाहीत; ज्या लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेद्वारे दरमहा १५० रुपये पेक्षा जास्त लाभ घेतला असेल; ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार, आमदार आहे; ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड, कॉर्पोरेशन, बोर्ड, उपक्रमाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक सदस्य आहेत; ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे; ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

**आवश्यक कागदपत्रे :** योजनेच्या लाभासाठी ऑनलाइन अर्ज; लाभार्थी महिलेचे आधार कार्ड; महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र/ महाराष्ट्रातील जन्मदाखला; सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला; बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत; पासपोर्ट साईजचा फोटो; रेशन कार्ड; या योजनेच्या अटी-शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

**असा करा अर्ज :** ज्या महिलेस ऑनलाइन अर्ज करता येत नसेल, त्याच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये/ग्रामपंचायत/वॉर्ड/सेतू सुविधा केंद्रे येथे उपलब्ध आहे; अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक/ वार्ड अधिकारी यांनी ऑनलाइन प्रस्तावित केल्यावर लाभार्थी महिलेचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर करता येईल; अर्ज करण्याची प्रक्रिया विनामूल्य आहे; अर्जदार महिलेने स्वतः अर्ज करताना उपस्थित राहणे आवश्यक आहे जेणेकरून तिचा थेट फोटो काढता येईल आणि ई-केवायसी करता येईल.

**लाभार्थी निवड :** लाभार्थ्यांची पात्रता अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, मुख्यसेविका, सेतू सुविधा केंद्र, ग्रामपंचायत, ग्रामसेवक, वार्ड अधिकारी यांनी खातरजमा करून ऑनलाइन प्रमाणित केल्यांनतर लाभार्थ्यांचा अर्ज सक्षम अधिकारी म्हणजेच संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे व अंतिम मंजुरी देण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडे येईल.

**नियंत्रण अधिकारी :** आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे हे या योजनेसाठी नियंत्रण अधिकारी राहतील. तसेच आयुक्त, एकत्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे सहनियंत्रण अधिकारी राहतील.

**तात्पुरत्या यादीचे प्रकाशन :** अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदाराची तात्पुरती यादी पोर्टल/ॲपवर जाहीर केली जाईल, त्याची प्रत अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत, वॉर्ड स्तरावरील सूचना फलकावर देखील लावण्यात येईल.

**आक्षेपांची पावती :** जाहीर यादीवरील हरकत पोर्टल, ॲपद्वारे प्राप्त केल्या जातील. याशिवाय अंगणवाडी, सेविका, मुख्यसेविका, सेतू, सुविधा केंद्र यांचेमार्फत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी हरकत, तक्रार नोंदवता येईल. लेखी (ऑफलाइन) प्राप्त झालेल्या हरकत, तक्रार रजिस्टरमध्ये नोंदविल्या जातील आणि ऑनलाइन अपलोड केल्या जातील. पात्र लाभार्थी यादी जाहीर केल्याच्या दिनांकापासून ५ दिवसांपर्यंत सर्व हरकत, तक्रार नोंदविणे आवश्यक आहे. सदर हरकतीचे निराकरण करण्यासाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'तक्रार निवारण समिती' गठित करण्यात येईल.

**अंतिम यादीचे प्रकाशन :** प्राप्त हरकतीचे निराकरण करण्यात येऊन, पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार केली जाईल. पात्र, अपात्र लाभार्थ्यांची स्वतंत्र यादी अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत, वॉर्ड स्तरावर, सेतू सुविधा केंद्र, तसेच पोर्टल, ॲपवर जाहीर केली जाईल. पात्र अंतिम यादीतील महिला मृत झाल्यास सदर महिलेचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

**लाभाच्या रकमेचे वितरण :** प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत रक्कम जमा केली जाईल.

**राज्यस्तर समितीची रचना :** राज्यस्तर समिती अध्यक्ष आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे, सदस्य सचिव उपआयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास, आयुक्तालय पुणे, सर्व सदस्य आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य नवी मुंबई, सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सह सचिव,उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई, सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, सर्व उपआयुक्त (विकास), ग्राम विकास विभाग, संचालक, नगरपालिका, नगरपंचायत प्रशासन, नवी मुंबई.

**जिल्हास्तर समिती :** अध्यक्ष संबंधित जिल्हाधिकारी, सहअध्यक्ष संबंधित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सदस्य सचिव संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सर्व सदस्य संबंधित पोलीस अधीक्षक, जिल्हा सहआयुक्त नगर प्रशासन, जिल्ह्यातील महानगरपालिकेचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप आयुक्त दर्जापेक्षा कमी नसावे) संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्ह्यातील नगरपरिषदांचे मुख्यधिकारी.

**३१ ऑगस्टपर्यंत अर्जाची मुदत :** सुरुवातीला माझी लाडकी बहीण योजनेची अर्ज करण्याची शेवटची तारीख ही १ जुलै ते १५ जुलै अशी होती. मात्र, सुधारित जीआरनुसार ही तारीख आता ३१ ऑगस्ट २०२४ करण्यात आली आहे.

*(या लेखाच्या लेखिका मुक्त पत्रकार असून विविध विषयांवर लिखाण करतात. त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१६८०६७००६ हा आहे.)*





शाश्वत वाहतुकीच्या दिशेने पाऊल

# महिला स्वयंरोजगारासाठी 'पिंक ई-रिक्षा'

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतेच पावसाळी अधिवेशनात राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. महिलांच्या सक्षमीकरणास बळ देण्यासाठी अर्थसंकल्पात अनेक बाबींचा समावेश करण्यात आला. लैंगिक समानता आणि पर्यावरणीय संवर्धन या दोन्ही गोष्टींचा समतोल साधताना 'पिंक ई-रिक्षा योजना', पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देताना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेल्या अग्रगण्य प्रकल्पाची घोषणा पवार यांनी यावेळी केली. पिंक ई-रिक्षामध्ये महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पॅनिक बटन आणि जीपीएस यासारखी यंत्रणा लावण्यात आली आहे. या योजनेसाठी ८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

**- प्रतिनिधी**

राज्याचा सर्वांगीण विकास व्हावा, प्रत्येक समाजघटकाला विकासाच्या प्रवाहात संधी मिळावी, शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा, सर्वसामान्य नागरिक अशा सर्वांच्या अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाची कटिबद्ध आहे. प्रत्येक समाजघटकाला न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून केला आहे. महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवत असताना आर्थिक आघाडीवर देखील राज्य सुस्थितीत रहावे, यासाठी सरकारचा प्रयत्न आहे. या सर्व गोष्टी नजरेसमोर ठेवून अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. पिंक ई-रिक्षा योजना २०२४ ही योजना लवकरात सुरू होणार आहे. यामुळे किमान दहा हजार महिलांना सक्षम करण्याचा सरकारचा मानस आहे. या योजनेमुळे महिलांना एक कमाईच साधन उपलब्ध होईल. महिलांना दैनंदिन खर्चासाठी कोणावर अवलंबून राहावे लागणार नाही. या योजने करिता महाराष्ट्र शासनाकडून लाभार्थी महिलांना आर्थिक सहायता मिळेल, ज्यामुळे त्यांना रिक्षा खरेदी करण्यास मदत होईल. रिक्षातून प्रवास करताना महिलांचा छळ आणि गैरवर्तन होऊ नये यासाठी भारत सरकारने हा उपक्रम हाती घेतला आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी पॅनिक बटणे आणि जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम यासारखी विशेष वैशिष्ट्ये बसविण्यात आली आहेत. गुलाबी रिक्षा एक तर पूर्णपणे गुलाबी रिक्षा असतात किंवा त्यांचे छत गुलाबी रंगाचे असते.

### रांचीमध्ये पहिल्यांदा गुलाबी रिक्षा

लैंगिक अत्याचार आणि बलात्कारापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने रांचीमध्ये पहिल्यांदा गुलाबी रिक्षा २०१३ ला सुरू केली होती. कालांतराने भारतातील इतर अनेक शहरांमध्ये ही योजना सुरू झाली. कायदेशीर पडताळणी आणि कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वाहने प्रशिक्षित व्यावसायिक, पुरुष किंवा स्त्रिया चालवतात. आसाममधील बोनगाई गाव येथे सुद्धा गुलाबी रिक्षाला सुरुवात करण्यात आली. तसेच ओरिसाच्या मुख्यमंत्र्यांनी २०१५ रोजी भुवनेश्वर येथे गुलाबी ऑटो योजनेला सुरुवात केली. गुडगाव येथे वर्ष २०१५ मध्ये या योजनेला सुरुवात करण्यात आली. झारखंडमध्ये महिला प्रवासांच्या वाहतुकीसाठी रांची येते सुमारे २०० गुलाबी रिक्षा सुरू केल्या. भारतात सुरत महानगरपालिकेने २०१७ मध्ये गुलाबी ऑटो लॉन्च केले. ज्यामध्ये महिलांकरिता खरेदीसाठी केंद्र सरकारकडून २५ टक्के अनुदान देण्यात आले तर याकरिता ७ टक्के व्याजदराने कर्ज मिळवून दिले.

### प्रारंभी दहा जिल्ह्यांमध्ये योजना

राज्यातील १७ शहरात ही योजना राबविण्यात येणार आहे. प्रारंभी नाशिक, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, मुंबई शहर, पनवेल,

नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड या दहा जिल्ह्यांत प्रारंभी ही योजना राबविण्यात येणार आहे.

### महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

पिंक ई-रिक्षा योजना सुरू करण्याच्या मुख्य उद्देश महाराष्ट्र राज्यातील आर्थिकदृष्ट्या अस्थिर असलेल्या महिलांना मदत करणे आणि त्यांना आर्थिक सहायता देणे. यामुळे राज्यातील महिलांचे मोठ्या प्रमाणावर सक्षमीकरण करता येईल. वर्ष २०२४-२०२५ मधील महाराष्ट्र राज्यातील आर्थिक वर्षाचा एकूण आर्थिक संकल्प ६,१२,२९३ कोटी रुपये आहे. या योजनेत रिक्षाचालक म्हणून महिलेला नियुक्त करावे असे ठरवण्यात आले; परंतु यामध्ये महिलांचा कमी प्रतिसाद मिळाला. त्यामुळे याकरिता पुरुष रिक्षाचालक सुद्धा नियुक्त केले. सर्व पुरुष रिक्षाचालकांना अटी व नियमाच्या आधारे व त्याची पडताळणी करून विशेष ओळख देऊन या ऑटोमध्ये महिलांना फिरवण्याची परवानगी देण्यात आली. पिंक ई-रिक्षा योजना महिलांचे सक्षमीकरण आणि शहरी वाहतुकीतील कार्बन फूटप्रिंट कमी करण्याच्या दुहेरी उद्देशाने सुरू करण्यात आली. ही योजना महिलांना अनुदानित अटींवर इलेक्ट्रिक रिक्षा (ई-रिक्षा) प्रदान करते, ज्यामुळे त्यांना स्वयंरोजगार चालक बनता येते. हा उपक्रम केवळ महिलांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देत नाही, तर शहरी भागातील प्रदूषण कमी करण्यासही हातभार लावतो.

### ई-रिक्षा पर्यावरणपूरक

महिलांना ई-रिक्षा प्रदान करून, या योजनेचे उद्दिष्ट शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करणे, त्याद्वारे त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक दर्जा वाढवण्यास मदत करू शकतात. ई-रिक्षा पर्यावरणपूरक आहेत, कोणतेही प्रदूषक उत्सर्जित करत नाहीत, त्यामुळे स्वच्छ हवा आणि शहरी वाहतूक व्यवस्थेच्या कार्बन फूटप्रिंटमध्ये घट होण्यास हातभार लागतो. रिक्षांचा गुलाबी रंग सुरक्षिततेचे प्रतीक आहे आणि महिला प्रवाशांना आश्वस्त करण्यासाठी, सार्वजनिक वाहतूक महिलांसाठी अधिक सुरक्षित आणि अधिक समावेशक बनवण्याचा हेतू यामागे आहे. ही योजना पारंपरिकपणे पुरुषप्रधान वाहतूक क्षेत्रातील लैंगिक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करते, सर्वसमावेशकता आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देते.

### भक्कम आर्थिक सहाय्य

पिंक ई-रिक्षा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सरकारी संस्था, गैर-सरकारी संस्था (एनजीओ) आणि खाजगी क्षेत्रातील भागीदारांसह अनेक भागधारकांचा समावेश आहे. प्रक्रियेमध्ये सामान्यतः खालील चरणांचा समावेश होतो. संभाव्य महिला लाभार्थ्यांची निवड पारदर्शक प्रक्रियेद्वारे केली जाते. निवडलेल्या उमेदवारांना ई-रिक्षा चालवणे, रहदारीचे नियम समजणे, मूलभूत देखभाल आणि ग्राहक सेवा याविषयी सर्वसमावेशक प्रशिक्षण दिले जाते. आर्थिक सहाय्य ई-रिक्षा परवडण्याजोग्या बनविण्यासाठी, योजना अनुदान, कमी व्याज कर्ज किंवा सुलभ हप्ते योजनांद्वारे आर्थिक सहाय्य देते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलाही सहभागी होऊ शकतात. नियमित देखभाल समर्थन आणि विक्रीनंतरच्या सेवा ई-रिक्षांचे कार्य सुरळीत चालावे यासाठी प्रदान केले जातात. याव्यतिरिक्त, महिला चालकांना आवश्यक असलेल्या कोणत्याही तात्काळ मदतीसाठी हेल्पलाइन आणि समर्थन केंद्रे स्थापन केली जाणार आहे.योजनेच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी, आव्हाने ओळखण्यासाठी आणि आवश्यक समायोजन करण्यासाठी सतत देखरेख आणि मूल्यमापन केले जाणार आहे.

### महिलांचे जीवनमान सुधारणार

भारतात ज्या ठिकाणी ई-रिक्षा सुरू झाल्या त्या ठिकाणी काही महत्त्वपूर्ण बाबी समोर आल्या आहेत. ई-रिक्षा चालक बनून हजारो महिलांना आर्थिक फायदा झाला आहे. त्यांच्या वाढलेल्या उत्पन्नामुळे जीवनमान सुधारले आहे, त्यांच्या मुलांचे चांगले शिक्षण झाले आहे आणि सामाजिक स्थिती सुधारली आहे. ई-रिक्षांच्या तैनातीमुळे शहरी प्रदूषण पातळी कमी होण्यास हातभार लागला आहे. विजेवर चालणारी ही वाहने शून्य उत्सर्जन निर्माण करतात. त्यामुळे हवामान बदलाचा सामना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. महिला ई-रिक्षा चालकांच्या उपस्थितीमुळे महिला प्रवाशांसाठी सार्वजनिक वाहतूक अधिक सुरक्षित झाली आहे. महिला प्रवाशांना प्रवास करताना अधिक सुरक्षित आणि आत्मविश्वास वाटतो, ज्यामुळे महिलांद्वारे सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढतो. या योजनेने पारंपरिक लिंग भूमिका आणि रूढींना आव्हान दिले आहे, ज्यामुळे अधिक महिलांना वाहतूक क्षेत्रात प्रवेश करण्यास आणि भरभराट करण्यास प्रोत्साहित केले आहे. स्त्री-पुरुष समानतेला चालना देणाऱ्या इतर समान उपक्रमांना या योजनेने प्रेरणा दिली आहे.

### भवितव्य आशादायक

अनेक राज्यात ही योजना यशस्वी असूनही अनेक आव्हानांचा सामना या योजनेस करावा लागतो ज्यात महिलांनी या योजनेचा लाभ घेताना त्या व्यवसायात टिकून राहणे गरजेचे आहे. योजनेच्या यशासाठी सतत निधी महत्त्वाचा आहे. सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील भागीदारी आवश्यक आर्थिक संसाधने सुरक्षित करण्यात मदत करू शकतात. ई-रिक्षांसाठी चार्जिंग स्टेशन्ससह पुरेशी पायाभूत सुविधा अखंडपणे चालण्यासाठी आवश्यक आहे. ई-रिक्षांच्या वाढत्या संख्येला पाठिंबा देण्यासाठी अशा पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे अत्यावश्यक आहे. ई-रिक्षांसाठी नियमित देखभाल आणि तांत्रिक सहाय्य सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. मूलभूत देखभाल कौशल्यांमध्ये महिलांना प्रशिक्षण दिल्यास हे आव्हान कमी करण्यात मदत होऊ शकते. गुलाबी ई-रिक्षा योजनेचे भवितव्य आशादायक आहे, यात विस्तार आणि वाढीसाठी अनेक मार्ग आहेत. ■ ■

### शिक्षण आणि रोजगार यांची योग्य सांगड हवी

# असंघटित क्षेत्रातील रोजगार वाढ



**भारतातील ८० टक्के मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करतात आणि फक्त २० टक्के औपचारिक क्षेत्रात काम करतात. यापैकी निम्मे मजूर शेतीमध्ये काम करतात आणि बाकीचे बिगरशेती क्षेत्रामध्ये काम करतात. नुकतेच केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी विभागाने २०२२-२३ चा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्यानुसार उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र यांचा अनौपचारिक उद्योगधंद्यामध्ये सिंहाचा वाटा असल्याचे दिसून आले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे असंघटित क्षेत्रात वाढ होत आहे. भारतातील उत्पादन क्षेत्राची वाढ पाहता शिक्षण आणि रोजगार यांची योग्य सांगड होणे अतिशय गरजेचं आहे. - हेमंत देसाई**



**मा.श्री. मंगल प्रभात लोढा,**
कोशल्य विकास मंत्री,
महाराष्ट्र राज्य

जिथे मालक व नोकर यांचे औपचारिक संबंध असतात आणि जेथे किमान दहाजण कामाला असतात, अशा संघटनेला किंवा कंपनीला औपचारिक क्षेत्र मानले जाते; परंतु भारतात दहापेक्षा जिथे कमी कामगार कामाला असतात, असे अनौपचारिक क्षेत्रच सगळयात मोठे आहे. भारतातील ८०% मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करतात आणि २०% फक्त औपचारिक क्षेत्रात. यापैकी निम्मे मजूर हे शेतीमध्ये काम करतात आणि बाकीचे बिगरशेती क्षेत्रात.

असंघटित क्षेत्रात महिन्याच्या वेतनाऐवजी दिवसाची रोजंदारी दिले जाते. कामाचे सातत्य नसते. त्यामुळे ज्या दिवशी काम असते, त्या दिवशी संध्याकाळी मजुरी घेणे, असेच चालते. भारताची अर्थव्यवस्था ही मोठमोठ्या सरकारी व खासगी कंपन्या आणि त्यांची उलाढाल यामार्फत चालत नसून, ती छोट्या छोट्या व्यवहारांतून चालते. फेरीवाले, टपरीवाले, हातगाडीवाले हे असंघटित क्षेत्रात येतात. ते स्वयंरोजगार प्राप्त करतात; पण या क्षेत्रात बहुसंख्य प्रमाणात बिगरपावतीचा व रोखीतला व्यवहार चालतो. अर्थात आजकाल फेरीवाले, रस्त्यावरील स्टॉलवालेदेखील ऑनलाइन पेमेंट स्वीकारतात, हा भाग वेगळा. जास्तीत जास्त व्यवसाय-उद्योग हे डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये यावेत. म्हणजे रोखीचे अथवा काळे व्यवहार कमी होतील, हे सरकारचे धोरण आहे. त्या दिशेने पावले पडत आहेत, हे वास्तव आहे.

नुकताच केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमल बजावणी विभागाने २०२२-२३चा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र यांचा अनौपचारिक उद्योग-धंद्यांमध्ये सिंहाचा वाटा असल्याचे दिसून आले. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही क्षेत्रांमधील असंघटित उद्योगात ही राज्ये पुढे आहेत. कोरोना संपल्यानंतरच्या २०२२-२३ या वर्षात गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, तामिळनाडू यासारख्या राज्यांतील असंघटित उद्योगांचा वाटा कमी झाला. विशेष म्हणजे, ज्या राज्यास बीमारू म्हणून हिणवले जाते, त्या उत्तर प्रदेशमध्ये गेल्या पाच-सात वर्षांत उत्तम प्रगती झाली आहे. कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती तर सुधारली आहेच; परंतु रस्ते, उड्डाणपूल, विमानतळ, शिक्षणसंस्था या सर्व आघाड्यांवर या राज्याने प्रगती केली आहे.

परंतु उत्तर प्रदेशमध्ये असंघटित उद्योगांच्या संख्येमध्ये १३%, पश्चिम बंगालमध्ये १२ टक्के तर महाराष्ट्रात नऊ टक्के इतकी भर पडली आहे. २०१५-१६ मध्ये या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येतील वाढीचा वेग कमी झाला होता. उलट राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार, २०२२-२३ या काळात आंध्र, आसाम, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये असंघटित क्षेत्रातील उद्योगधंद्यांमधील कामगारांच्या संख्येत वाढ

झाली, ही नक्कीच दिलासादायक आकडेवारी आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात २०१५-१६ मध्ये ९१ लाख कामगार काम करत होते, ते प्रमाण २०२१-२२ मध्ये ९८ लाख आणि २०२२-२३ मध्ये एक कोटी १५ लाखांवर जाऊन पोहोचले. मात्र उत्तराखंड, आसाम, छत्तीसगड, दिल्ली आणि जम्मू-काश्मीर या राज्यांत असंघटित क्षेत्राची वाढ अत्यंत कमी प्रमाणात झाली. देशातील अर्थव्यवस्थेत अनौपचारिक क्षेत्र हे रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे ही आकडेवारी पाहणे गरजेचे असते. २०२२-२३च्या आकडेवारीनुसार, जवळपास ११कोटी कामगार या क्षेत्रात काम करत आहेत. यापैकी पाच कोटी ७२ लाख कामगार हे शहरातले आणि पाच कोटी २४ लाख कामगार हे ग्रामीण भागातले आहेत. असंघटित क्षेत्रातील ही वाढ २०२१-२२ च्या तुलनेत एक कोटींपेक्षा जास्त आहे.

भारतातील एकूण बेरोजगार तरुणांमध्ये लोकांमध्ये तरुणांचे प्रमाण हे ८३% आहे. बड्या कंपन्यांची कामगिरी चांगली आहे आणि जे उच्चशिक्षित आहेत, ज्यांच्याकडे उच्च दर्जाची कौशल्य आहेत, त्यांनाही चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत आहेत; परंतु अतिशय छोटे छोटे उद्योग व असंघटित क्षेत्रातील युनिट्स हे अस्तित्वासाठी झगडत आहेत. त्यांच्या क्षमतांचा अपेक्षेइतका विस्तार होत नाही. त्यामुळे या क्षेत्राच्या गरजांकडे लक्ष पुरवण्याचे आवाहन नुकतेच नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी पंतप्रधानांना उद्देशून केले आहे. लघु व मध्यम उद्योगांवर भर द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे. या क्षेत्रासाठीचे नियम शिथिल करण्याची त्यांची सूचना आहे.या सर्व पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने नुकतीच शिकाऊ उमेदवारांसाठी स्टायपेंड देण्याची योजना अर्थसंकल्पात मांडली आहे. त्यामुळे अनेकांना कामाचे शिक्षण घेता येईल आणि शिकाऊ वेतन घेतल्यानंतर त्यांना नोकरीची सुद्धा संधी मिळू शकेल. असंघटित क्षेत्र, लघु व मध्यम उद्योग यांना प्रोत्साहन देणे आणि अप्रेंटिसशिप योजना यामुळे देशातील रोजगार लक्षणीय प्रमाणात वाढू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. भारतातील उत्पादनक्षेत्राचा पाहिजे तसा विस्तार झालेला नाही. त्यातही वाहन, वस्त्रोद्योग यासारख्या रोजगारप्रधान क्षेत्रांमध्ये जास्त प्रणामात कामाच्या संधी निर्माण होण्याची गरज आहे. तसेच अजूनही शिक्षण आणि रोजगार यांची पाहिजे तशी सांगड घालण्यात आपण यशस्वी झालेलो नाही. यखेरीज, निर्यातप्रधान उद्योगधंद्यांना चालना मिळाल्यास, असंख्य तरुण-तरुणींना त्यात नोकऱ्या मिळू शकतील. मुद्रा योजनेंतर्गत कर्जवाटपात लक्षणीय वाढ झाली असली, तरी थकबाकीचे प्रमाण प्रचंड आहे. त्यामुळे केवळ लक्ष्यपूर्ती साधण्यासाठी दिखाऊ पद्धतीने योजना राबवणे चुकीचे आहे.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*



*उद्योजक मासिकाच्या माहे जुलै २०२४ गुंतवणूक परिषद विशेष अंकाचे प्रकाशन श्री.बी.टी.यशवंते, उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून श्री. संजय बावस्कर, अंकेक्षण अधिकारी, श्री दत्तात्रय थावरे, विभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर, डॉ. अभिराम डबीर, मालमत्ता विभाग प्रमुख, श्री विवेक तोंडरे, समन्वय विभाग प्रमुख व श्री संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक तथा उद्योजक मासिक विभाग प्रमुख दिसत आहेत.*



## कुशल व रोजगारक्षम महाराष्ट्र

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

**युवक वर्ग आपले शिक्षण पूर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी, व्यवसायाच्या शोधात बाहेर पडत असतात. अशा बहुतांश युवकांना व्यवसाय व नोकरीसंबंधित अनुभवाचा अभाव असल्याने व्यवसाय सुरू करणे अथवा नोकरी प्राप्त करण्यामध्ये अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते. या समस्येमुळे युवक वर्गामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. याबाबत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाने नुकताच शासन निर्णय पारीत करण्यात आलेला आहे. या माध्यमातून १२वी पास, विविध ट्रेड मधील आय.टी. आय., पदविकाधारक, पदवी आणि पदव्युत्तर युवकांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे, याविषयीच्या शासन निर्णयाविषयी.**

**- प्रतिनिधी**

राज्यामध्ये युवक वर्ग आपले शिक्षण पूर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी, व्यवसाय यांच्या शोधात बाहेर पडत आहे. अशा बहुतांश युवकांना व्यवसाय व नोकरी संबंधित अनुभवाचा अभाव असल्याने व्यवसाय सुरू करणे अथवा नोकरी प्राप्त करण्यामध्ये अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येत आहे. या समस्येमुळे युवक वर्गामध्ये बेरोजगारीचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी अडचणी येत आहेत. विशेषतः यामध्ये १२ वी पास, विविध ट्रेड मधील आय.टी. आय., पदविकाधारक, पदवी आणि पदव्युत्तर युवकांचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्यातील अनेक उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध असली तरी असे उद्योग व बेरोजगार युवक यांना साधणारा दुव्यांचा अभाव असल्याकारणाने युवकांना शिक्षणानंतर अनुभवा अभावी पूर्णवेळ रोजगार मिळणे कठीण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.



### उद्योगांना मनुष्यबळ, तरुणांना काम
### - उदय सामंत, उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

सरकारने मुली व महिलांसाठी सुरू केलेल्या ''मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण' योजनेनंतर लाडक्या भावाबद्दल काय? असा प्रश्न विचारला जात होता. त्या पार्श्वभूमीवर 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' म्हणजेच ''लाडका भाऊ' योजना सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ उपलब्ध होईल. योजनेतील तरुण वर्षभर एखाद्या कारखान्यात अप्रेन्टिसशिप करेल, त्याला कामाचा अनुभव आणि अनुभवाच्या जोरावर पूर्णवेळ नोकरी मिळेल.

महाराष्ट्र शासनामार्फत रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम ही योजना दि. ३ डिसेंबर, १९७४ पासून राबविण्यात येत होती. सदर योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी व योजनेचा लाभ अधिकाधिक उमेदवारांना व्हावा यासाठी कालानुरूप सदर योजनेत सुधारणा करणे आवश्यक होते. त्यामुळे उमेदवारांना रोजगाराच्या अधिकाअधिक संधी उपलब्ध

**योजनेची वैशिष्ट्ये :**

१) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरिता ५ हजार ५०० कोटींची तरतूद.

२) उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्षे या वयोगटातील असावे.

३) उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत १२ वी उत्तीर्ण रु. ६ हजार, आयटीआय व पदविका उत्तीर्ण रु. ८ हजार, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण रु. १० हजार दरमहा विद्यावेतन मिळणार.

४) कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी सहा महिने राहील.

५) शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व विविध क्षेत्रातील प्रकल्प, उद्योग, स्टार्टअप्स, आस्थापनांनी आवश्यक मनुष्यबळाची मागणी ऑनलाइन नोंदविणे गरजेचे.

६) उद्योग क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे (इंटर्नशिप) उमेदवारांना रोजगारक्षम करून उद्योगाकरिता कुशल मनुष्यबळ तयार करणार.

७) प्रत्येक आर्थिक वर्षात १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) च्या संधी उपलब्ध होणार.

८) प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ असे एकूण ५० हजार योजनादूत नेमणार.

९) इच्छूक उमेदवारांपनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक.

व्हाव्यात याकरिता सदर योजना सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूप :**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जाणार आहे. या उपक्रमांर्तगत तयार केलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमतावाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. रोजगार इच्छुक उमेदवार आणि प्रशिक्षण देऊ इच्छिणारे उद्योजक विभागाचे संकेतस्थळावर सुलभतेने नोंदणी करतील.

१.१ या उपक्रमाअंतर्गत या योजनेकरिता विभागाच्या संकेतस्थळावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. योजनेचे कामकाज उदा. उमेदवारांची नोंदणी, आस्थापनांची नोंदणी, कार्यप्रशिक्षण व्यवसाय नोंदणी, उपस्थिती नोंदविणे, विद्यावेतन अदा करणे, प्रशिक्षण रुजू व समाप्ती अहवाल, अनुभव प्रमाणपत्र इ. बाबी ऑनलाइन पद्धतीने करण्यात येतील. यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांची राहील.



**मा.श्रीमती निधी चौधरी,**
आयुक्त, कौशल्य, रोजगार,
उद्योजकता, महाराष्ट्र राज्य

१.२ बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार ऑनलाइन नोंदणी करतील.

१.३ लघु आणि मध्यम (SMEs) व मोठे उद्योग, स्टार्टअप्स, सहकारी संस्था, शासकीय, निमशासकीय आस्थापना / महामंडळ, सामाजिक संस्था (कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन ८) आणि विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंदवतील. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या आस्थापना / उद्योगामध्ये सध्याच्या मनुष्यबळावर आधारित सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील. या योजनेंतर्गत पात्र आस्थापना / उद्योग यांची यादी परीशिष्ट-अ मध्ये नमूद आहे.

१.४ शासकीय / निमशासकीय आस्थापना / उद्योग / महामंडळाची सबंधित तालुका / जिल्हा / विभाग / राज्यस्तरीय कार्यालये या योजनेंतर्गत मनुष्यबळाची मागणी करू शकतील.

१.५ रोजगार इच्छुक उमेदवारांची पात्रता व उद्योगाची कुशल मनुष्यबळाची मागणी यास जोडण्याचे काम विभागाचे संकेतस्थळ करेल.

२. सदर योजनेकरिता उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे असेल :

२.१ उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.

२.२ उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२वी पास / आयटीआय / पदविका / पदवी / पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत.

२.३ उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.

२.४ उमेदवाराची आधार नोंदणी असावी.

२.५ उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.

२.६ उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

३. सदर योजनेकरिता आस्थापना/उद्योगासाठीची पात्रता खालीलप्रमाणे असेल :

३.१ आस्थापना/ उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.

३.२ आस्थापना / उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

३.३ आस्थापना/ उद्योगाची स्थापना किमान ३ वर्षापूर्वीची असावी.

३.४ आस्थापना/उद्योगांनी EPF, ESIC, GST, Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधार ची नोंदणी केलेली असावी.

४. या योजनेअंतर्गत राज्यातील उद्योगांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जाईल व त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे निश्चित केले आहे.

४.१ या योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या या योजनेसाठीच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

४.२ आस्थापना/उद्योग/महामंडळामार्फत विना अनुभवी रोजगार इच्छुक पात्र उमेदवारांना आस्थापना/उद्योग/ महामंडळ या मध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण देण्यात येईल. या योजनेंतर्गत उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत कार्य प्रशिक्षणाद्वारे कुशल/अर्धकुशल प्रकारचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे.

४.३ सदर कार्य प्रशिक्षणचा कालावधी ६ महिने असेल. सदरच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेंतर्गत शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.

४.४ प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल.

४.५ या योजनेच्या प्रशिक्षणा नंतर प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार सबंधित उद्योग/ आस्थापना यांना योग्य वाटल्यास व उमेदवाराची इच्छुकता असल्यास त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील.

४.६ या योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.

४.७ या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थीना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दिले जाईल. सदर विद्यावेतनाचे विवरण खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन रु. |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | रु.६,०००/- |
| २. | आय.टी.आय / पदविका | रु.८,०००/- |
| ३. | पदवीधर / पदव्युत्तर | रु.१०,०००/- |

४.८ या योजनेंतर्गत उपरोक्त तत्क्यात नमूद दरमहा विद्यावेतन रक्कम शासनाद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना अदा करण्यात येईल. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना / उद्योग ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येईल. सदर ऑनलाइन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (DBT) ऑनलाइन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल.

४.९ विद्यावेतनामध्ये सबंधित उद्योजकामार्फत जाहीर केलेली सुट्टी व अनुज्ञेय रजा याचा अंतर्भाव राहील. उद्योजक उमेदवारांना सदर विद्यावेतना व्यतिरिक्त अधिकचे विद्यावेतन देऊ इच्छित असेल तर सदरची वाढीव रक्कम उमेदवारांना अतिरिक्त स्वरूपात देऊ शकेल.

४.१० या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर संबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही.

४.११ प्रशिक्षणार्थीने वरील अटीची पूर्तता केली असली; परंतु सदर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही.

४.१२ या योजनेचा दर २ वर्षांनी आढावा घेऊन आवश्यकता असल्यास योजनेत सुधारणा करणेबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

४.१३ या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षणार्थीस कायम / नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

४.१४ या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS / MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत.

४.१५ एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.

४.१६ या योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना / उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १०% व सेवा क्षेत्रासाठी २०% इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय / निमशासकीय या आस्थापना / उद्योग / महामंडळ या मध्ये मंजूर पदाच्या ५% इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी घेता येतील. आस्थापना / उद्योग यांनी त्यांच्याकडील कार्यरत मनुष्यबळाची माहिती अचूक दर्शविणे आवश्यक राहील. चुकीची मनुष्यबळ संख्या दर्शवून अथवा चुकीच्या पद्धतीने गणना करून या योजनेंतर्गत मनुष्यबळ उपलब्ध करून घेतल्यास त्यासाठी सबंधित कार्यालयाचा कार्यालय प्रमुख / प्राधिकृत अधिकारी जबाबदार राहील.

४.१७ राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०-(NEP-२०२०) अंतर्गत नवीन अभ्यासक्रम आराखडयाची अंमलबजावणी सर्व स्वायत्त महाविद्यालये आणि विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सुरू करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासक्रम आराखडा राज्यातील अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनाही लागू करण्यात आला आहे. नवीन अभ्यासक्रम आराखडयांतर्गत एकूण ६ व्हर्टिकल्स पैकी ५ व्या आणि ६ व्या व्हर्टिकल्समध्ये कौशल्य आधारित अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) आणि Apprenticeship या नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे. युवकांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, सॉफ्टस्किल ट्रेनिंग, लाईफस्किल ट्रेनिंग, तांत्रिक प्रशिक्षण देऊन तरुणांची रोजगारक्षमता वाढविणे तसेच शिक्षण घेताना कामाच्या ठिकाणी कामाशी संबंधित कार्यकौशल्य आत्मसात करणे या उद्देशाने ज्या अभ्यासक्रमात कमीत कमी ६ महिन्यांचा ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) किंवा Apprenticeship अंतर्भूत आहे, अशा अभ्यासक्रमांतील विद्यार्थीदेखील मुख्यमंत्री युवा 'कार्यप्रशिक्षण योजनेसाठी पात्र ठरतील.

५. या योजनेचे नियमित संनियंत्रण व आढावा खालीलप्रमाणे घेण्यात येईल.

५.१ या योजनेसाठी राज्यस्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे. सदर समिती योजनेचा आढावा तसेच योजनेमध्ये धोरणात्मक सुधारणा / बदल बाबतचा निर्णय घेईल. समितीची बैठक दर ४ महिन्यांनी अथवा आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर

समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, उद्योग व कामगार, उच्च व तंत्र शिक्षण, वित्त विभाग, सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बहुजन कल्याण विभाग, अल्पसंख्यांक विभाग, आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ३ | महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | सदस्य |
| ४ | नामांकित उद्योग क्षेत्रातील एकूण चार प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, उच्चशिक्षण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ७ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ८ | क्षेत्रीय संचालक, कौशल्य विकास व उद्योजकता महासंचालनालय, भारत सरकार, मुंबई | सदस्य |
| ९ | संचालक, बोर्ड ऑफ ॲप्रेंटिसशिप अँड ट्रेनिंग, वेस्टर्न रिजन, मुंबई | सदस्य |
| १० | औद्योगिक संघटनाचे प्रतिनिधी (Goe. ASSOCHAMd, CREDAI, CII, FICCI, MCCI, NASSCOMd, PHDCCI इ.) | सदस्य |
| ११ | मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | संचालक, राष्ट्रीय शिकाऊ प्रोत्साहन योजना (एन.ए.पी.एस.) | सदस्य |
| १३ | संचालक, महाराष्ट्र शिकाऊ प्रोत्साहन योजना (एम.ए.पी.एस.) | सदस्य |
| १४ | आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | सदस्य सचिव |

५.२ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचा शासन निर्णय कौविउ- २०२१/प्र.क्र.३८/उद्योजकता ( कौ. १), दिनांक १७ जून, २०२२ अन्वये स्थापन केलेली जिल्हास्तरीय कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता जिल्हा कार्यकारी समिती या योजनेचा वेळोवेळी आढावा घेईल. तसेच, योजनेसंबंधित स्थानिक स्तरावरील अडी-अडचणीचे निराकरण करेल. सदर समितीची बैठक दर महिन्यास घेण्यात येईल.

५.३ या योजनेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांची राहील.

५.४ जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता हे या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी राहतील.

५.५ सदर योजनेच्या संनियंत्रणासाठी लागणारे राज्य व जिल्हास्तरीय मनुष्यबळ (नोडल अधिकारी व समन्वयक) यांची नियुक्तीबाबत स्वतंत्र मागदर्शक सूचना विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल.

५.६ योजनेचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना व्हावा याकरिता या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शासनाच्या विविध विभागांचा सहभाग आवश्यक असल्याने अशा विभागांना सामविष्ट करून विभागनिहाय जबाबदारी **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केल्या आहेत.

६. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिद्धी करणे व जास्तीत जास्त नागरिकांना योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी योजनादूत नेमण्याची घोषणा सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतसाठी १ व शहरी भागात ५,००० लोकसंख्येसाठी १ याप्रमाणे एकूण ५०,००० योजनादूत प्रस्तुत योजनेअंतर्गत नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे. योजनादूतांचे विद्यावेतन या योजनेमधून अदा करण्यात येईल. याबाबतचे स्वतंत्र आदेश माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत निर्गमित करण्यात येतील.

७. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंमलबजावणी करणे करिता आवश्यक निधी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणारा प्रशासकीय खर्च, प्रचार व प्रसिद्धी इत्यादीसाठी एकूण खर्चाच्या ३% निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७.१ या योजनेतील थेट लाभाची रक्कम (DBT) वितरित करण्यासाठी आयुक्त, (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता) आयुक्तालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

७.२ आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सहाय्यक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता) आयुक्तालय हे राहतील.

७.३ विद्यावेतनासाठी आवश्यक निधी शासनाकडून प्राप्त करून घेऊन विहित कालावधीत लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये (DBT) जमा करण्याची जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांची राहील.

८.योजनेसाठीचा निधी झेडए - २, २२३० - कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्व्हेक्षण व सांख्यिकी, (०१) (०१) सेवायोजन रोजगार उपलब्धता विषयक माहिती व युवक रोजगार विषयक सेवा (२२३०११०७), ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षाकरिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि. ०८ जुलै, २०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक - २०२४०७०९१७०१२२३९०३ असा आहे.





### केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, जगातील पहिल्या १० बंदरांपैकी एक ठरणार

# वाढवण येथे ७६,२०० कोटी रुपयांचे ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट बंदर

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळील वाढवण येथे ७६,२२० कोटी रुपये मूल्याचे बारमाही ग्रीनफिल्ड डीपड्राफ्ट प्रमुख बंदर उभारण्यास मंजुरी दिली. जगातील पहिल्या दहा बंदरांपैकी एक म्हणून हे बंदर उभे राहील. या प्रकल्पाची अंमलबजावणी जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) आणि महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) यांच्या सहकार्याने स्थापन केलेल्या वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) द्वारे करण्यात येणार आहे. यातून सुमारे १० लाख नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. - प्रिया गंध्रे**



**मा.श्री.एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

केंद्रीय मंत्रिमंडळाने १९ जून २०२४ रोजी मंजुरी दिलेल्या वाढवण बंदराचे काम जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) आणि महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) यांनी अनुक्रमे ७४ % आणि २६% समभागांद्वारे स्थापन केलेली स्पेशल पर्पस व्हेईकल (एसपीव्ही), वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) द्वारे पूर्ण केले जाईल. वाढवण बंदर हे महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वाढवण येथील बारमाही ग्रीनफिल्ड डीप ड्राफ्ट प्रमुख बंदर म्हणून विकसित केले जाईल. केंद्र सरकारच्या एकूण ७६,२२० कोटी रुपये खर्चाच्या नवीन बंदर प्रकल्पामुळे भारताचा जागतिक एक्सिम व्यापार प्रवाह सुधारेल. आयएमईईसी (इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर) आणि आयएनएसटीसी (इंटरनॅशनल नॉर्थ साउथ ट्रान्सपोर्टेशन कॉरिडॉर) द्वारे या बंदराची क्षमतावाढ, आंतरराष्ट्रीय व्यापाराला भक्कम पाठबळ देणारा ठरेल.

**असे असेल वाढवण बंदर :** बंदरात १००० मीटर लांबीचे ९ कंटेनर टर्मिनल्स, ४ लिक्विड कार्गो बर्थ, १ रो-रो बर्थ, एक तटरक्षक धक्का आणि ४ बहुउद्देशीय धक्के यांचा समावेश आहे. यासोबतच १४४८ हेक्टर क्षेत्राचे पुनर्वसन, १०.१४ किमी ऑफशोअर ब्रेकवॉटर आणि कंटेनर/कार्गोद स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम करण्यात येणार आहे. प्रकल्पामुळे प्रत्येक वर्षी २९८ दशलक्ष मेट्रिक टन (एमएमटी) संचयी हाताळणी क्षमता आणि २३.२ दशलक्ष TEUs कंटेनर हाताळणी क्षमता निर्माण होईल. हा बंदर प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) ला प्रोत्साहन देऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करेल आणि सुदूर पूर्व, युरोप, मध्य पूर्व, आफ्रिका आणि अमेरिकासारख्या देशांमध्ये जलमार्गाने जाणाऱ्या मोठ्या जहाजांना हाताळण्यास सक्षम असेल. वाढवण बंदर पूर्ण झाल्यानंतर जगातील पहिल्या १० बंदरांपैकी एक म्हणून ओळखले जाईल, ज्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय सागरी व्यापार क्षमतेला एक नवा आयाम मिळेल. यातून सुमारे १० लाख नवीन रोजगार निर्माण होणार आहेत.

**रेल्वे मार्गाशी जोडणी :** या प्रकल्पांतर्गत बंदर आणि राष्ट्रीय महामार्गांदरम्यान रस्ता कनेक्टिव्हिटीची स्थापना आणि विद्यमान रेल्वे नेटवर्कशी जोडणी केली जाईल. यासोबतच, रेल्वे मंत्रालयाद्वारे आगामी समर्पित रेल्वे फ्रेट कॉरिडॉरही विकसित केला जाईल. या प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन घटकाचा समावेश आहे. हा प्रकल्प पीएम गतीशक्ती कार्यक्रमाच्या उद्दिष्टांशी अनुरूप आहे. या प्रकल्पामुळे जागतिक EXIM व्यापाराला चालना मिळणार असून, सुमारे दहा लाख व्यक्तींसाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधीही निर्माण होतील, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मजबूत आधार मिळेल.

*(या लेखाच्या लेखिका मुक्त पत्रकार असून विविध विषयांवर लिखाण करतात. त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१६८०६७००६ हा आहे.)*



**महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा शिखर**
**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय मंत्रिमंडळाने वाढवण येथील बारमाही ग्रीनफिल्ड डीप-ड्राफ्ट प्रमुख बंदराच्या विकासाला मंजुरी दिली. हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे नवीन शिखर ठरणार आहे. पूर्ण झाल्यावर हे बंदर जगातील टॉप १० बंदरांपैकी एक असेल. यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि सुमारे १० लाख नवीन रोजगार संधी निर्माण होणार आहेत.



**राज्याच्या विकासासाठी महत्त्वाची बाब**
**- संजय बनसोडे, बंदरे विकास मंत्री**

वाढवण येथे बंदर उभारणी ही राज्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. जगातील १० मोठ्या बंदरांपैकी देशातील वाढवण हे एकमेव मोठे बंदर असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे १२ लाख रोजगारनिर्मिती होईल. वाढवण परिसरामध्ये राहणाऱ्या स्थानिक लोकांना, मत्स्यव्यवसाय करणारे व या व्यवसायाशी संबंधित सर्व घटकांचे पुनर्वसन तसेच योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त कौशल्य विकास कार्यक्रम राबवून रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. वाढवण बंदरामुळे राज्याच्या तसेच स्थानिक नागरिकांच्या आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार आहे.




जलाशयांवर सौरऊर्जा प्रकल्प,
जमिनीची आवश्यकता नाही,
बाष्पीभवनही कमी

# फ्लोटिंग सोलरमध्ये संधीसह अडथळेही भरपूर

**आजवर सौरऊर्जा म्हटले तर इमारतींवरील रूफटॉप सोलर किंवा जमिनीवर उभारलेले ग्राउंड माउंटेड सौरऊर्जा प्रकल्प डोळ्यासमोर येतात; परंतु गेल्या काही वर्षात जलाशयातील पाण्यावर तरंगणारे सौरऊर्जा प्रकल्प (फ्लोटिंग सोलर प्रोजेक्ट) नावारूपाला आले आहेत. या प्रकल्पासाठी जमिनीची आवश्यकता भासत नाही, तर सौर पॅनलमुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. या जमेच्या बाजू असल्या तरी हे प्रकल्प पाण्यातील जैवविविधतेवरच घाला घालत असल्याचा पर्यावरणवाद्यांचा आरोप आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणच्या जायकवाडी धरणातील प्रस्तावित तरंगता सौरऊर्जा प्रकल्प अशाच आरोपांच्या फेऱ्यात अडकला आहे.**

**- महेश जोशी**

जगभरात कार्बन उत्सर्जन करणारे जिवाश्मांवर आधारित इंधन-पेट्रोल, डिझेलचे साठे मर्यादित आहेत. हे इंधन जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलासाठी कारणीभूत ठरतात. पर्यावरणाचा ऱ्हास करतात. यामुळे सर्वत्र सौर, जल, घनकचरा आणि समुद्रांच्या लाटांपासून निर्माण होणाऱ्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन दिले जात आहे. ही पुनर्निर्मित होणारी स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जा आहे. पंतप्रधान मोदी यांनी २०१९ मध्ये ग्लासगो येथे झालेल्या जागतिक हवामान बदल परिषदेत (कॉप-२६) २०३० पर्यंत अपारंपरिक ऊर्जा स्रोतातून ५०० गिगावॅट ऊर्जा निर्मिती आणि २०७० पर्यंत निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट जाहीर केले. नंतर हे उद्दिष्ट ४५० गिगावॅट करण्यात आले. ते साध्य करण्यासाठी प्रामुख्याने सौरऊर्जेकडे आशेने बघितले जात आहे. राज्यात ३६५ पैकी किमान ३०० दिवस चांगला सुर्यप्रकाश असतो. यामुळेच राज्य अपारंपरिक स्रोतातून वीज निर्मितीकडे मोठ्या अपेक्षेने बघत आहे. आजवर प्रामुख्याने रूफटॉप किंवा ग्राउंड माउंटेड सोलर प्रकल्पांबाबत चर्चा होत असत. गेल्या दशकापासून फ्लोटिंग सोलर किंवा फ्लोटोव्होल्टेइक (FSPV) तंत्रज्ञान उदयास आले आहे. देशात २०२४-२५ पर्यंत २.१ गिगावॅट एफएसपीव्ही प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. ६०० मेगावॅट क्षमतेचा मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर जलाशय सध्या सर्वात मोठा तरंगता सौरऊर्जा प्रकल्प आहे.

**सौरऊर्जा प्रकल्पाचे प्रकार :** रूफटॉप सोलर म्हणजे निवासी, व्यावसायिक इमारती किंवा कारखान्याच्या छतावर बसवलेले सौर पॅनल्स. या पॅनलमार्फत सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती केली जाते. शासनातर्फे यासाठी अनुदान दिले जाते, तर रूफटॉपच्या विरुद्ध जमिनीवर स्थापन केलेल्या सौर प्रकल्पांना ग्राउंड माउंटेड सोलर पॉवर प्रोजेक्ट म्हणतात. काही ग्राउंड-माउंट सोलर पॅनेल सूर्यासोबत फिरू शकतात. यामुळे दररोज जास्तीत जास्त सूर्यप्रकाश मिळवून ऊर्जा निर्मिती करता येते. याच मालिकेतील तिसरा प्रकार म्हणजे जलाशयांवर लावले जाणारे तरंगते सौर प्रकल्प म्हणजेच फ्लोटिंग सोलर प्रोजेक्ट.

**फ्लोटिंग सोलर पीव्ही तंत्रज्ञान :** तलाव, धरण, तळे, कालवे अशा जलाशयांवर बसविण्यात येणाऱ्या सौरऊर्जा प्रकल्पांना तरंगते सौरऊर्जा प्रकल्प किंवा फ्लोटोव्होल्टेइक (फ्लोटिंग सोलर पीव्ही) म्हटले जाते. या जलाशयांवर फ्लोटोव्होल्टेइक पॅनेल बसवले जातात. ग्राउंड माउंटेड सौर प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात जमिनीची आवश्यकता भासते. जमिनीचे दर बघता यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढतो. तसेच भूसंपादनाशी संबंधित अडथळ्यांमुळे तरंगत्या सौर प्रकल्पांकडे मोठ्या अपेक्षेने बघितले जात आहे. फ्लोटिंग सोलर प्रकल्प हे जमिनीवर आधारित प्रकल्पांपेक्षा १५-३० टक्के अधिक खर्चिक असतात. मात्र, या प्रकल्पांची क्षमता जमिनीवरील प्रकल्पांपेक्षा १० टक्के अधिक आहे. यामुळेच गेल्या वर्षी जूनमध्ये, केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने सोलर पार्क्स आणि अल्ट्रा मेगा सोलर पार्क प्रकल्पांच्या विकासासाठीची योजना २०२६ पर्यंत वाढवली आहे. फ्लोटिंग सोलर आणि हायब्रिड पॉवरचा समावेश करण्यासाठी सोलर पार्कची व्याप्ती देखील वाढवली.

**भारतात ३०० गिगावॅटची क्षमता :** जागतिक बँकेच्या 'इंडिया-अनलॉकिंग दी पोटेन्शिअल ऑफ फ्लोटिंग सोलर पावर' या अहवालानुसार जगात २००७ मध्ये जपानमध्ये पहिला तरंगता सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला. मात्र, अशा प्रकल्पांना २०१६ नंतर खऱ्या अर्थाने गती आली. आता जगभरात हे तंत्रज्ञान पोहोचले आहे. दक्षिण आशियात भारतासह मालदिव्ज आणि बांग्लादेशात असे प्रकल्प आहेत. पाकिस्तान आणि श्रीलंकेत एकही प्रकल्प नाही. भारतातील विविध जलाशयांमध्ये २८० ते ३०० गिगावॅट ऊर्जा निर्मिती करू शकतील अशा तरंगत्या सौरा प्रकल्पांची क्षमता आहे. मात्र, प्रत्यक्षात केवळ १७० मेगावॅटचे प्रकल्प सुरू असून १.८ गिगावॅटची प्रस्तावित आहेत. हे प्रकल्प मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, केरळ, तेलंगाना, बिहार व राजस्थानमध्ये आहेत. तेलंगानातील रामागुंडम, केरळातील कायामकुलम, आंध्र प्रदेशातील सिंहाद्री तसेच मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर हे देशातील प्रमुख तरंगते सौरऊर्जा प्रकल्प आहेत.

**...तर सर्वात मोठा प्रकल्प जायकवाडीत :** मध्य प्रदेशच्या खंडवा जिल्ह्यातील ओंकारेशवर येथील ६०० मेगावॅटचा प्रकल्प जगातील सर्वात मोठा तरंगता सौरऊर्जा प्रकल्प आहे. मात्र, यापेक्षा दुप्पट क्षमतेचा सुमारे १२०० मेगावॅटचा प्रकल्प महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण येथील जायकवाडी धरणावर आणण्यासाठी राज्यसभा सदस्य आणि माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड प्रयत्न करत आहेत. डॉ. कराड यांनी मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्षपद स्वीकारताच ऑगस्ट २०१८ मध्ये जायकवाडीत तरंगत्या सौर प्रकल्पाची घोषणा केली. प्रकल्पाची उभारणी राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ (नॅशनल थर्मल पावर कॉर्पोरेशन-एनटीपीसी) करणार आहे. सुरुवातीची क्षमता १२०० मेगावॅट तर भविष्यात १०,००० मेगावॅटपर्यंत वाढेल. पॅनलसाठी सुरुवातीला ६००० एकर तर भविष्यात ५०,००० एकर जागा लागेल. पहिल्या टप्प्यात १० ते १२ हजार कोटी तर पुढील टप्प्यात सुमारे ४०

हजार कोटीचा खर्च येईल, असे डॉ. कराड यांनी सांगितले. एनटीपीसीच्या एका पथकाने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये धरणाची पाहणी केली. त्यासाठी वन खात्याच्या नागपूर मुख्यालयाने एनटीपीसीला परवानगी दिली. पथकाने वेगवेगळ्या ठिकाणांवर धरणाची तळापासून खोली मोजली.

**उपमुख्यमंत्र्यांकडून पाठपुराव्याची ग्वाही :** प्रकल्पाबाबत चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत एक बैठक बोलावली. यास डॉ. कराड यांच्यासह वन, पर्यावरण, उद्योग, महावितरण व जलसंपदा खात्याचे अधिकारी उपस्थित होते. फडणवीस यांनी प्रकल्पासाठी एनटीपीसी आणि महाराष्ट्र शासनामध्ये सामंजस्य करार, पर्यावरणाबाबत सर्वेक्षणासाठी तातडीने एजन्सी नेमणे तसेच स्थानिक पातळीवरील अडचणी सोडण्याच्या सूचना केल्या. याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर केंद्राकडे पाठविणे आणि पर्यावरणविषयक परवानगीसंदर्भात पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

**पर्यावरणाचा प्रकल्पाला विरोध :** पैठणचे जायकवाडी धरण हे पक्षी अभयारण्य आणि इको सेन्सिटिव्ह झोन आहे. यामुळे पर्यावरणप्रेमी यास विरोध करत आहेत. मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक म्हणाले, सौर पॅनलमुळे सूर्याची किरणे पाण्याखाली जाणार नाही. पाण्यातील जीव आणि पक्ष्यांची अंडी घालण्याचे ठिकाण नष्ट होईल. ही अंडी पक्ष्यांचे अन्न आहे. अन्न नसल्याने स्थलांतरीत पक्षी येणार नाहीत, तरंगत्या पॅनलचा धोका वाटून त्यांची संख्या कमी होईल. पक्ष्यांच्या अधिवासाची जागा घटून धरणातील जैवविविधता नष्ट होईल. धरण उथळ आहे. १००% पाणी असताना ४०% पाणी मधोमध असते. सध्या पाणी नसल्याने धरण कोरडे पडले आहे. अशी परिस्थिती उद्भवली तर पॅनल मातीत कोसळतील. मग प्रकल्पाचा फायदा काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केलाय.

**कायदा काय सांगतो :** इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये हवा, पाणी आणि भूमी प्रदूषण करणारे उद्योग, नवीन जलविद्युत किंवा सिंचन प्रकल्प, पर्यटनासाठी विमानसेवा किंवा हॉट एअर बलून सेवा सुरू करणे, १ किलोमीटर परिसरात हॉटेल, रेस्टॉरेंट, घरे बांधणे आदीवर बंदी असते. हे पानथळीचे धरण असून फार तर मधला एक चौरस किलोमीटरचा भाग खोल आहे. काठावर कमरेपर्यंतही पाणी नाही. अशा परिस्थितीत सौर पॅनल कसे उभारता येतील, असा प्रश्न डॉ. पाठक यांनी उपस्थित केला आहे.

**१९८६ मध्ये पक्षी अभयारण्य :** जायकवाडी धरणात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, पैठण तर अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव, नेवासा तालुक्यातील ११८ गावांतील ३४,१०५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. सुमारे ५५ किलोमीटर लांब आणि २७ किलोमीटर रुंद जलाशयाचा सपाट जमिनीवर विस्तार आहे. १० ऑक्टोबर १९८६ रोजी हे क्षेत्र पक्षी अभयारण्य म्हणून घोषित झाले. याचे संरक्षित क्षेत्र ३३९.७९ चौरस किलोमीटर आहे. महाराष्ट्रातील पाणपक्ष्यांचे सर्वांत मोठे पक्षी अभयारण्य म्हणून जायकवाडी ओळखले जाते.

**२०१७ पासून इको सेन्सिटिव्ह झोनही :** जलाशयातील जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतरंगत १२ जुलै २०१७ रोजी या परिसरासाठी केंद्राच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणजेच इको सेन्सिटिव्ह झोनची अधिसूचना प्रसिद्ध केली. हे झोन छत्रपती संभाजीनगर ते अहमदनगर जिल्ह्यातील १०० गावांत १४१.०५ चौरस किलोमीटर परिसरात असून अभयारण्याच्या सीमारेषेपासून ५०० मीटरपर्यंत याची सीमा आहे.

**माशांच्या ५० प्रजाती :** नाथसागर जलाशयात माशांच्या ५० पेक्षा अधिक प्रजाती, १२ प्रजातीचे साप, कायम वास्तव्यास असलेल्या २०० प्रजातींच्या पक्ष्यांशिवाय ७० स्थलांतरीत पक्षी तसेच ३७ प्रजातीची फुले आढळतात, तर पाणमांजर, भेकर, मुंगूस, ससे, उदमांजर, काळवीट यासारख्या अन्य वन्यजीवांचा वावर असतो. सौर पॅनल किंवा जलपर्यटनामुळे जैवविविधता धोक्यात येण्याची भीती इशारा डॉ. पाठक यांनी वर्तवली आहे.

**मच्छिमारांचा विरोध :** प्रकल्पामुळे माशांची संख्या घटेल. यामुळे आमची उपजीविका धोक्यात येईल, अशी भीती परिसरातील मच्छिमारांना वाटतेय. यामुळे प्रकल्पाला विरोध करण्यासाठी २५ हजार मच्छिमारांनी आजवर ४ वेळेस मोर्चे काढले आहेत.

**तरंगत्या सौर प्रकल्पाचे फायदे :** बाष्पीभवन घटेल - सौर पॅनलमुळे जलाशयातून नैसर्गिकरीत्या होणारे पाण्याचे बाष्पीभवन घटेल. यामुळे पाण्याचा साठा अधिक काळ टिकेल.

**झाडे वाचतील -** जमिनीवर प्रकल्प टाकण्यासाठी मोकळी जागा लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करावी लागते. शिवाय जमिनीचे दरही अधिक आहे. पाण्यातील प्रकल्पामुळे झाडे वाचतील, किंमतही आटोक्यात येईल.

**पाणी थंड होईल -** जागतिक तपमानवाढीमुळे जलाशयातील पाण्याचे तापमान वाढण्याची भीती वर्तवली जात आहे. अशा प्रकल्पांमुळे किमान पॅनलखालील पाण्याची तपमान घटेल. रूफटॉप किंवा ग्राउंड माउंटेड पॅनलच्या तुलनेत पाण्यातील पॅनलद्वारे १२.५ टक्के अधिक ऊर्जा निर्माण होते.

**प्रकल्पासमोरील आव्हाने :** अतिरिक्त खर्च - पाण्यात सौर पॅनल उभे करणे व ते ऐकमेकांना जोडण्यासाठी अतिरिक्त खर्च लागतो. यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होते.

**गंजण्यांची भीती :** सतत पाणी, आर्द्रता, शुष्क वातावरण आणि खारट पाण्यामुळे पॅनलचे लोखंडी भाग, चौकटी गंजतात. हे टाळण्यासाठी विशेष उपाययोजनांसाठी अधिक खर्च लागतो.

**ऊर्जेच्या उत्पादनात सातत्य नाही :** उन्हाच्या तीव्रतेवर ऊर्जेचे उत्पादन अवलबून असते. अधिक कडक उन्हात अधिक तर पावसाळी, ढगाळ वातावरणात कमी विजेचे उत्पादन होते.

**देखभालीवर खर्च :** पाण्याखालील जमीन आणि त्यातील वनस्पतींचा अभ्यास आवश्यक. अन्यथा पॅनल व त्याच्या स्ट्रक्चरचे नुकसान होण्याची भीती. यासोबतच प्रकल्पाची दुरुस्ती, देखभाल आणि निगराणीवर मोठा खर्च लागतो.

## पर्यावरणीय आव्हाने

**जैवविविधतेला धोका :** सातत्याने सौर पॅनल पाण्यात तरंगत राहिल्यास पाण्याखालील जैवविविधता धोक्यात येण्याची शक्यता पर्यावरणाचे अभ्यासक व्यक्त करतात. मात्र, याबाबत अजून सखोल अभ्यास झाला नसल्याने अचूक नुकसान सांगणे कठीण आहे.

**तपमानात बदल :** दिवसभर सौर पॅनल पाण्यावर असल्याने थेट सूर्याची किरणे पाण्याखाली जाणार नाहीत. यामुळे पाण्याच्या तपमानात घट होईल. किरणाच्या अभावी पाण्याखालील वनस्पतीचे उत्पादन घटेल. वनस्पती नसल्याने पाण्यात ऑक्सिजनची निर्मिती थांबेल. त्याचा पाण्याखालीज जीवांवर पडेल.

**पक्षी घटतील :** सर्वच जलाशयांवर वर्षभर स्थानिक तर हिवाळ्यात स्थलांतरीत पक्षी येतात. सौर पॅनलवरील प्रकाश परिवर्तीत झाल्याने त्यांना भीती वाटून ते येथे येणे बंद करतील. यामुळे पाण्यातील लाइफसायकल बाधित होईल. हे जलाशय अनेक पक्षी, कीटकांचा अधिवास आहे. तो नष्ट होईल.

*(लेखक छत्रपती संभाजीनगर येथे दैनिक दिव्य मराठीमध्ये विशेष प्रतिनिधी पदावर कार्यरत असून पर्यावरण, ऊर्जा, उद्योग, सामाजिक विकास या विषयांवर लिखाण करतात.)*



### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना

# कृषी पंपांना वीज; शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीची तजवीज

**सौरऊर्जा ही काळाची गरज आहे. जिवाश्मावर आधारित इंधनाचे साठे मर्यादित आहेत. ते संपण्याचा धोका आहेच. शिवाय ते मोठ्या प्रमाणात प्रदूषण करतात. यामुळे जगात सर्वत्र अपारंपरिक ऊर्जा स्रोतांकडे बघितले जात आहे. यात प्रामुख्याने सौर, पवन ऊर्जेचा समावेश आहे. देशात मोठ्या प्रमाणात सूर्यप्रकाश उपलब्ध असल्याने सौरऊर्जा प्रकल्पांना चांगली संधी आहे. ही बाब लक्षात घेऊन 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेविषयी...**

**- प्रतिनिधी**

सौरऊर्जेपासून वीजनिर्मिती होताना कार्बन उत्सर्जन होत नाही. सुदैवाने आपल्या देशात सूर्यप्रकाश भरपूर उपलब्ध आहे. त्यामुळे राज्यातील ऊर्जानिर्मिती क्षेत्रात सौरऊर्जेचा भक्कम पर्याय देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अकोला जिल्ह्यात या योजने अंतर्गत सौरऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी २१० एकर जमिनीचे अधिग्रहण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना १.० अंतर्गत जिल्ह्यात बार्शीटाकळी तालुक्यात पिंपळखुटा येथे १.७५ मेगावॅट क्षमतेचा सौरप्रकल्प उभारून कार्यान्वितही करण्यात आला आहे. या अंमल बजावणीमुळे कृषिपंपांना दिवसाचे १२ तास वीज पुरवठा मिळणार असून साहजिकच शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीची तजवीज यातून होणार, हे नक्की.

या योजनेत जास्तीत जास्त फीडर सौरऊर्जेवर कार्यान्वित करण्यात येणार आहेत. यात प्रामुख्याने भर हा शेतीसाठी वीज पुरवठ्यावर दिला जात आहे. या योजनेच्या कार्यान्वयनामुळे शेतीला दिवसा १२ तास वीजपुरवठा तर करता येणारच आहे शिवाय उद्योगांसाठी करावयाच्या वीज पुरवठ्यावरील क्रॉस सबसिडीचा भारही कमी होणार आहे.याच अंतर्गत गावांतील विविध सुविधा, कार्यालये पूर्णपणे सौरऊर्जेवर आणण्याचा निर्धार आहे. शिवाय ग्रामीण भागामध्ये सौरऊर्जेच्या संदर्भातली परिसृष्टी साकारण्याचा उद्देश आहे.

अपारंपरिक ऊर्जावापरासाठी २०३० पर्यंत ४५० गिगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. विजेच्या मागणीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. राज्यातील वीज पंपांची संख्या ४५ लाख आहे. एकूण वीज वापरापैकी २२ टक्के वापर हा शेतीसाठी होतो. त्याअनुषंगाने डिसेंबर २०२५ पर्यंत ३० टक्के कृषी वीजपुरवठा सौरऊर्जेवर आणण्याचा प्रयत्न आहे. 'मिशन २०२५'च्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची वेगाने व व्यापक अंमलबजावणी करण्याचे वेगवान प्रयत्न होत आहेत. या प्रकल्पांसाठी जमीन भाडेपट्ट्याने द्यायला तयार असणाऱ्या शेतकऱ्यांना दर हेक्टरी एक लाख २५ हजार रुपये प्रतिवर्ष इतका मोबदला देण्याची तरतूद आहे, महावितरणच्या सब स्टेशनजवळ उपलब्ध जमिनींमध्ये असे प्रकल्प उभे राहतील. सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मोठ्या उद्योजकांनीही तयारी दर्शवली आहे. असे प्रकल्प उभे राहिलेल्या ग्रामपंचायतींना देखील पहिली तीन वर्षे पाच लाख रुपये प्रति वर्ष असे अनुदान दिले जाणार आहे. योजनेमुळे सौरऊर्जेबाबत आवश्यक कौशल्यांचा विकास होऊन ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी तयार होणार आहेत.

अकोला जिल्ह्यात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अत्यंत पोषक भौगिलिक परिस्थिती, भरपूर सूर्यप्रकाश, समतल जमीन उपलब्ध आहे. त्यादृष्टीने जिल्ह्यात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सौर प्रकल्प उभारणीसाठी २१० एकर जमिनिचे अधिग्रहण करण्यात आले आहे. लवकरच या जमिनीवर सौर प्रकल्प उभारणीच्या कामाला सुरुवात होईल. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना १.० अंतर्गत जिल्ह्यात बार्शीटाकळी तालुक्यात पिंपळखुटा येथे १.७५ मेगावॅट क्षमतेचा सौरप्रकल्प उभारून कार्यान्वित करण्यात आला आहे.

ऊर्जा ही विकासाची जननी असल्याने शेतकऱ्यांना खात्रीशीर वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणच्या उच्चदाब वितरण प्रणाली योजना (HVDS),पायाभूत सुविधा निर्माण वर्ष २०२२-२३ मध्ये जिल्ह्यात ३९९ नवीन रोहित्रे कार्यान्वित कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसेच या काळात जिल्ह्यात 'कृषिपंप वीज जोडणी धोरण २०२०' या योजनेत ४५ कोटी रुपये खर्च करून २ हजार ५४७ कृषिपंपाना नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

'मागेल त्याला वीज पुरवठा' करण्यासाठी महावितरणकडून प्रयत्न करण्यात येतो. परिणामी मागील वर्षभरात जिल्ह्यातील घरगुती वर्गवारीतील १० हजार ७३७, वाणिज्यिक वर्गवारीतील २ हजार ३४५ आणि औद्योगिक वर्गवारीतील २८० ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्तीत वीज यंत्रणा कोलमडल्यावर ती किमान वेळेत पूर्ववत करण्याचे काम ही वितरण यंत्रणेने केले आहे. पारस येथे एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीत मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर यांच्या मार्गदर्शनात अधीक्षक अभियंता पवनकुमार कछोट यांच्या नेतृत्वात कोलमडलेली यंत्रणा ४८ तासात पूर्ववत केली, याबाबत जिल्ह्यात कौतुक होत आहे.



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा'', असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा.**

**- संतोष बोर्डे**



**मा.श्री. उदय सामंत**
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

### Chief Minister Employment Generation Programme

### स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!

**उद्देश :** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात

स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :** राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :** उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादीमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजुर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :** योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा; - शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे; - आधार कार्ड; - नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल; - जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी); - विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक); - वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना; - स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :**

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.

अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजुर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

**सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | --- | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनलायच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरिता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरिता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षांची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योगक्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय :**

**हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ -** www.maha-cmegp.gov.in
www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*




## सेल्सफोर्स : स्टार्टअप कम्युनिटी

# डिजिटल परिवर्तनाला सेल्सफोर्सचे साह्य

**पुणे शहर हे गतीशील माहिती तंत्रज्ञान केंद्र (आयटी) म्हणून आकारास येत आहे. सीआरएम क्षेत्रातील नामांकित कंपन्यांपैकी एक असणारी सेल्सफोर्स कंपनीने डिजिटल परिवर्तनासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत डिजिटल कर्ज प्रदानाचे उत्पादन सादर केले आहे.**

**- प्रतिनिधी**

पुणे, सीआरएम क्षेत्रातील जागतिक अग्रणी कंपन्यांपैकी एक असलेल्या सेल्सफोर्सने भारतातील डिजिटल परिवर्तनासाठी आपली कटिबद्धता आणखी बळकट केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि स्वयंचलन (ऑटोमोशन) यांचा लाभ घेत सर्व आकाराच्या आणि उद्योगातील व्यवसायांमध्ये प्रयोगशीलता आणण्याचे लक्ष्य सेल्स फोर्सने बाळगले आहे. त्यातून ग्राहकांशी संवादात क्रांती घडून येईल आणि भरीव प्रमाणात व्यावसायिक मूल्य खुले होतील.

सेल्स फोर्सच्या भागीदार आणि स्टार्टअप इकोसिस्टिमच्या दृष्टीने पुणे हे महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे आले आहे. सेल्स फोर्सने निश्चित केलेल्या उभरत्या सर्वोच्च दहा उगवत्या शहरांमध्ये २५ टक्के भागीदार हे पुण्यात आहेत. याशिवाय सेल्सफोर्स स्टार्टअप कम्युनिटीतील सर्वाधिक सक्रिय केंद्रांपैकी पुणे हे एक असून २० स्टार्टअप या शहरात जोमात सुरू आहेत. या शहरातील अनेक स्वयंपूर्ण, बीएफएसआय आणि उत्पादन व्यवसायांशीही सेल्सफोर्सने सहकार्य केले आहे. सर्व क्षेत्रांतील ग्राहकांच्या अनुभवाची पुनर्व्याख्या करण्याचे तिचे लक्ष्य आहे.

माध्यमांशी बोलताना सेल्स फोर्स इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य यांनी सेल्स फोर्सच्या विकासाच्या धोरणातील पुण्याचे महत्त्व अधोरेखित केले. 'अलीकडच्या वर्षांमध्ये भारतात तंत्रज्ञानाचा स्वीकार लक्षणीय आहे. पुणे हे गतिशील आयटी केंद्र म्हणून पुढे आले असून तंत्रज्ञानाचा स्वीकार, प्रयोगशीलता आणि डिजिटल परिवर्तन याबाबतीत ते अग्रेसर आहे. ही उगवती स्टार्टअप इकोसिस्टिम ही या शहरात चाल ना मिळत असलेल्या प्रयोगशीलतेची निदर्शक आहे. सर्व क्षेत्रांतील व्यवसाय हे डिजिटल परिवर्तनासह बदलांचे नेतृत्व करत आहेत आणि या शहरात आमची उपस्थिती सुदृढ करत असताना त्यांच्या या प्रवासाचा भाग बनल्याबद्दल आम्हाला आनंद आहे', असे त्या पुढे म्हणाल्या.

सेल्स फोर्सच्या तंत्रज्ञानाने नागरिकांचा अनुभव समृद्ध करण्याकरिता परिवर्तनाला चालना देण्यासाठी, सरकारी संस्था व सार्वजनिक उद्यमांचे सशक्तीकरण करण्यासाठी सेल्स फोर्सने नुकतेच भारतात सार्वजनिक क्षेत्र विभागाची घोषणा केली आहे. याशिवाय सेल्स फोर्सने भारतासाठी पहिल्यांदाच बनविलेले डिजिटल कर्ज प्रदानाचे उत्पादन सादर केले आहे. हैदराबाद, बेंगलुरू, मुंबई, गुरुग्राम, पुणे आणि जयपूर येथे असलेल्या ११,००० कर्मचाऱ्यांसह सेल्स फोर्स भारतात आपली उपस्थिती व प्रभाव वाढवत आहे.


एआयमुळे वाढीला कशी चालना मिळते, ग्राहकांशी संबंध कसे सुधारतात आणि कर्मचाऱ्यांची उत्पादकता यांना कसे पोषक वातावरण मिळते हे या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आले. त्यातून पुण्यातील प्रयोगशीलता व डिजिटल परिवर्तन यासाठी सेल्स फोर्सची कटिबद्धता अधोरेखित झाली.

सेल्स फोर्स अधिक माहितीसाठी भेट द्या : www.salesforce.com

*(या लेखाचे लेखक मुक्त पत्रकार असून त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३००५४४८ असून ई-मेल prasad.ghare@gmail.com आहे.)*

## महाराष्ट्र राज्याचे इलेक्ट्रॉनिक्स धोरण- २०१९

# इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला संजीवनी



**चीनहून येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स मालावर मोठ्या प्रमाणात बंधने आली. अनेक मोठ्या उद्योगांनी चीनमधील उत्पादन थांबवले, तर अनेक उद्योगांनी त्यांची उत्पादने भारतात हलवण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रात त्यांचे स्वागत करण्यासाठी उद्योग विभाग कामाला लागला. यात मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांचा समावेश आहे. २०२५ पर्यंत ४०० बिलियन यूएस डॉलर्सची बाजारपेठ विस्तारणाऱ्या या क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यातच राज्याचे इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१९ संजीवनी ठरणार आहे याविषयी. - संतोष बोर्डे**



**मा.श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह,**
विकास आयुक्त (उद्योग)

सध्या चर्चेत असलेल्या कोरोना व्हायरसमुळे भारतीय उद्योजकांना एक नवीन संजीवनी प्राप्त झालेली आहे. उद्योग क्षेत्रातल्या बऱ्याचशा क्षेत्रांत कोरोनानंतर बऱ्याच मोठ्या संधी येऊ घातल्या. त्यापैकी सर्वात जास्त संधीची द्वारे कुठल्या क्षेत्रात येऊ घातल्या आहेत, असे जर कुणी विचारले तर सर्वांचे उत्तर एकच येईल ते म्हणजे इलेक्ट्रॉनिक.

आपण सगळेजण सोशल मीडियावर, वृत्तपत्रात, इलेक्ट्रॉनिक मीडियावर ऐकत असतो की, कोरोनानंतरच्या जगात ज्या जागतिक स्तरावर उत्पादित करणाऱ्या कंपन्या ज्यांची उत्पादननिर्मिती चीनमध्ये होते त्यातल्या बऱ्याच कंपन्यानी त्यांची उत्पादननिर्मिती भारतात हलविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यापैकी बऱ्याचशा मोबाईल फोन उत्पादन करणाऱ्या कंपन्या आहेत. ते आपली उत्पादने सुरू करत आहेत. सर्वसाधारणपणे वेगवेगळ्या जागतिक स्तरावर काम करणाऱ्या कंपन्यांचे अंदाज बघता २०२५ पर्यंत इलेक्ट्रॉनिक बाजारपेठ ४०० बिलियन यू.एस. डॉलर्सचे असणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दृष्टीकोनातून इलेक्ट्रॉनिक्स प्रणाली डिझाईन आणि उत्पादन (ESDM) हे क्षेत्र राज्याच्या आर्थिक प्रगतीला गती देणारे क्षेत्र असल्यामुळे पायाभूत सुविधा विस्तार, प्रगत तंत्रज्ञान वाढ, नावीन्यपूर्ण कौशल्य विकास याद्वारे शासन या क्षेत्राच्या विकासाला मदत करीत आहे.

**दृष्टिकोन :** राज्याची एकूण अर्थव्यवस्था आणि समृद्धीमध्ये योगदान देण्याच्या दृष्टीकोनातून राज्यामध्ये जागतिक स्पर्धेत टिकाव धरू शकतील असे इलेक्ट्रॉनिक्स प्रणाली डिझाईन आणि उत्पादन (ESDM) उद्योग निर्माण करणे, ज्यायोगे राज्यामध्ये रोजगाराच्या भरपूर संधी निर्माण होतील आणि आंतरराष्ट्रीय बाजारात एक भक्कम पाया प्राप्त होईल.

**अभियान :**

- गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्याकरिता अनुकूल वातावरण निर्माण करून इलेक्ट्रॉनिक वस्तूचे उत्पादन करण्यास चालना देणे.

- राज्यातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राची रचना व अभियांत्रिकी यात नावीन्यपूर्ण संकल्पना आणून राज्यात संशोधन व विकास प्रणालीच्या निर्मितीसह इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचा विकास करण्यास सक्रियपणे सहाय्य करणे.

- इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योगाशी संबंधित कौशल्यवृद्धी आणि प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे.

- राज्यात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक घटक स्थापन करण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करणे.

- इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योगांच्या दृष्टीने एक



मा.श्री. उदय सामंत
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

अग्रेसर स्थान म्हणून महाराष्ट्र राज्याचे नाव जागतिक स्तरावर प्रसिद्ध करणे.

**उद्दिष्टे :**

- सन २०२० पर्यंत ३०० कोटी डॉलर्स गुंतवणुकीच्या योगे १२०० कोटी डॉलर्सची उलाढाल आणि १ लाख लोकांना इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात रोजगार.

- सन २०२० पर्यंत इलेक्ट्रॉनिक उद्योग क्षेत्रातील निर्यात २०० कोटी डॉलर्स इतकी वाढविणे.

- इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील गुंतवणूकदारांच्या सक्रिय सहयोगाने या क्षेत्राकरिता कुशल मनुष्यबळाची उपलब्धता वाढविण्यासाठी उपाययोजना करणे.

- इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग आणि नॅनो इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील संशोधन व विकासासाठी अधिक निधी उपलब्ध करून या क्षेत्रात बौद्धिक मालमत्ता निर्मितीस चालना देणे.

- इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी शासनामध्ये विशेष प्रशासन रचना तयार करणे.

- ई-कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीचा वापर करणे.

तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम्स डिझाईन व मॅन्युफॅक्चरिंग या तंत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ होईल. भारतामध्ये असलेले ५०० मिलियन मोबाईलधारक व त्यानंतर डिजिटल इकॉनॉमीमध्ये झालेली वाढ अशा अनेक कारणांमुळे केंद्र सरकारने 'एन.पी.ई.-२०१९' आणलेली आहे. एन.पी.ई.-२०१९ म्हणजे नॅशनल पॉलिसी ऑन इलेक्ट्रॉनिक्स-२०१९. या पॉलिसीमध्ये भारताचे ई.एस.डी.एन.मध्ये जगाचे एक हब बनवण्याचे स्वप्न व व्हिजन आहे. या पॉलिसीमध्ये डोमेस्टिक उत्पादन, निर्यातदार व पूर्ण व्हॅल्यू चेन या क्षेत्राला प्रमोद व प्राधान्य देण्यात आलेले आहे. कोरोनानंतरच्या काळात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ज्या संधी येऊ घातल्या आहेत, त्यासाठी केंद्र सरकारने बऱ्याचशा योजना घोषित केल्या. त्यामध्ये प्रॉडक्शन लिंक्ड इंटेन्सिव्ह स्कीम, स्कीम फॉर प्रमोशन ऑफ मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रॉनिक कॉम्पोनंट्स व सेमीकंडक्टर्स, मॉडिफाईड इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर्स या योजनांचा अंतर्भाव आहे. या स्कीमच्या मदतीने ५ लाख प्रत्यक्ष व १५ लाख अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीचे लक्ष आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात ई.एस.डी. एन. सेक्टरच डिजिटल इंडिया, स्टार्टअप इंडिया व मेक इन इंडियाला गती देईल. स्ट्रॅटेजिक ग्रोथसाठी इलेक्ट्रॉनिक्स उद्योग हे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक उद्योग प्रमोट करणे ही एक काळाची गरज आहे. कारण आता येणारा काळ हा ५ जी तंत्रज्ञानाचा आहे. त्यामुळे जगाच्या बाजारपेठेत ५ जी तंत्रज्ञानाकरिता जे जे काही इलेक्ट्रॉनिक उत्पादने लागतील तशा प्रकारच्या उद्योगांना व उद्योजकांना जगासाठी या उत्पादनांची निर्मिती करण्यास प्रवृत्त करणे व प्रोत्साहन देणे खूप महत्त्वाचे ठरणार आहे. मागच्या ४ वर्षांमध्ये इलेक्ट्रॉनिक कॉम्पोनंट्स मॅन्युफॅक्चरिंग उद्योग ४ बिलियनने वाढलेला आहे. जागतिक बाजारपेठ इलेक्ट्रॉनिक कॉम्पोनंट्स उत्पादनाची ही जवळपास १००० बिलियन यू.एस. डॉलर्सची असेल. यामध्ये भारतीय उद्योगाचे व उद्योजकांचे कॉन्ट्रिब्युशन खूप महत्त्वाचे असेल.

आता सध्या भारतीय बाजारपेठ इलेक्ट्रॉनिक वस्तूसाठीही एकूण १३० बिलियन यू.एस. डॉलर्सची आहे. यामध्ये आपण जर मार्केट सेगमेंटचा विचार केला, तर मोबाइल झोन्स २४ टक्के, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स २२ टक्के, स्ट्रॅटेजिक इलेक्ट्रॉनिक्स १२ टक्के, कॉम्प्युटर हार्डवेअर ७ टक्के, एल.ई.डी. २ टक्के व इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स ३ टक्के.

मागच्या ४ वर्षांमध्ये डोमेस्टिक इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने वाढून २९ बिलियनने वाढून ७० बिलियनपर्यंत गेले. मोबाइल डिव्हाईसचे उत्पादन दुपटीने वाढले.

इलेक्ट्रॉनिक्स उद्योग वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स उद्योग प्रमोट करण्याकरिता केलेल्या योजना. दुसरे म्हणजे लार्ज कझ्युमर बेस. सर्वसाधारणपणे १.२ बिलियन ग्राहकवर्ग, होणारे शहरीकरण, डिमिटायझेशन व इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे वाढणारे पेनिटेशन. तिसरे कारण म्हणजे जगातली तिसरी स्टार्टअप इकोसिस्टीम्स. यामध्ये नवनवीन इनोव्हेशन, डिझाईन्स, वाढते डिमिटायझेशन. चौथे म्हणजे येणाऱ्या काळातले तंत्रज्ञान जसे - ५ जी, इंटरनेट ऑफ थिंगजचा औद्योगिक वापर. पाचवे कारण मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया इनिशिएटिव्ह. सहावे कारण म्हणजे रोबस्ट रिसर्च व डेव्हलपमेंट इकोसिस्टीम. केंद्र सरकारच्या प्रॉडक्शन लिंक्ड इंटेन्सिव्हमध्ये पुढच्या ५ वर्षांसाठी ४०,९५१ कोटी दिलेले आहेत. यामध्ये खालील इलेक्ट्रॉनिक उद्योग उत्पादने यांचा अंतर्भाव आहे -

१) मोबाईल फोन्सची उत्पादननिर्मिती, २) स्पेसिफाईड इलेक्ट्रॉनिक कॉम्पोनंट मेडिकल इलेक्ट्रॉनिक्ससह, ३) एस.एन.टी. कॉम्पोनंट्स, ४) डिस्क्रीट सेमीकंडक्टर डिव्हाईस यामध्ये ट्रांझिस्टर, डायोड्स, थायराईस्टर्स इ., ५) पॅसिव्ह कॉम्पोनंट्स यामध्ये रेझिस्टर्स कॅपॅसिटर्स इ., ६) प्रिंटेड सर्किट बोर्ड्स, पी.सी. बी. लॅमिनेटर्स, प्रीफेज, फोटो पॉलिस्टर फिल्म्स, ७) पी.सी.बी. प्रिंटिंग इंक, ८) सेन्सर्स, ट्रान्सड्युअर्स, ॲक्युएडर्स, क्रिस्टल्स इ., ९) मायक्रो इलेक्ट्रोमेकॅनिकल सिस्टीम्स व नॅनो इलेक्ट्रोमेकॅनिकल सिस्टीम्सला लागणारे मायक्रो/नॅनो इलेक्ट्रोकॉम्पोनंट्स.

त्या खालोखाल कोव्हिड-१९ व्या साथीच्या रोगानंतर जागतिक बाजारपेठेत खालील उत्पादनांना खूप मोठ्याा प्रमाणात मागणी वाढण्याची शक्यता आहे व या सगळ्या उत्पादनांना व्यवस्थितपणे उद्योजकांद्वारे चालवून व प्रोत्साहन देण्यासाठी एन.पी.ई. पॉलिसी-२०१९ कार्यक्रम आखलेला आहे.

१) कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स व आय.टी. हार्डवेअर

२) रिमोट बेस्ट कस्टमर केअर सर्व्हिसेस

३) कॉन्टॅक्टलेस/आय.ओ.टी. बेस्ड सर्व्हिस सोल्युशन

४) सर्व्हिलन्स व मॉनिटरिंग

५) डी.आय.वाय. बेस्ड लर्निंग सोल्युशन

**मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स :**

१) व्हेंटिलेटर्स, मिनी आय.सी.यू./सॅनिटायझेशन चेंबर्स/एनेल्स थर्मल स्कॅनर्स इत्यादी उत्पादित करणे, सर्व्हिसिंग करणे.

३) ई.एम. गव्हर्नन्स सर्व्हिस देणे इ. लायब्ररीद्वारे.

४) आय.ओ.टी. (बिग डेटा ॲनालिसीस, एमिटस कम्युनिकेशन स्क्वॉड सिस्टीम्स.

ऑटोमेशन इंडस्ट्री व स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग, मशीन सेफ्टरी थ्रू ऑटोमेशन, आर ॲण्ड डी. इन मॅन्युफॅक्चरिंग.

या सगळ्यांवरील गोष्टींचा अभ्यास केल्यानंतर असे जाणवेल की, इलेक्ट्रॉनिक्स हे येणाऱ्या काळात खूप मोठे सनराईज सेक्टर असेल. या सनराईज सेक्टरचा, या संधीचा आपल्या मध्यम व छोट्या उद्योजकांना लाभ घेता यावा व ही संधी सुटता कामा नये, म्हणून केंद्र सरकारने ए.पी.ई.-२०१९ पॉलिसी घोषित केली. जसे केंद्र सरकारने पॉलिसी घोषित केली, तसेच महाराष्ट्रातल्या सरकारने त्यांच्या मध्यम व लघुउद्योजकांना या संधीचा फायदा घेता यावा म्हणून २०१६ साली महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ घोषित केले. या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

१) जास्तीत जास्त गुंतवणूकदारांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी एक अनुकूल वातावरण निर्माण करणे. त्याद्वारे इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन करण्यास चालना देणे.

२) इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राशी निगडीत अभियांत्रिकी व संशोधन व विकास क्षेत्राला जास्तीत जास्त बळकट करणे व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यास सक्रियपणे सहाय्य करणे.

३) या उत्पादनाकरिता लागणारा कुशल मनुष्यबळ तयार करणे व त्याकरिता योग्य प्रशिक्षण केंद्र स्थापित करणे व त्या धोरणाची लक्ष्य हे खालीलप्रमाणे आहेत -

पुढच्या पाच वर्षांत इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाची गुंतवणूक ३०० कोटी डॉलर्स व उलाढाल १२०० कोटी डॉलर्स इतकी ठेवून त्याच्याकरिता या क्षेत्रात १ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करणे व २०० कोटी डॉलर्सचे आयात पर्यायी उत्पादने उत्पादित करणे. या धोरणाअंतर्गत खालील प्रकारचे प्रोत्साहन देण्याचे प्रयोजन आहे -

१) आर्थिक प्रोत्साहन देणे, २) लिथियम आयर्न बॅटरी व एल.ई.डी.चे प्रकल्प उभारणीकरिता सुविधा, २) करप्रणालीचे सुसूत्रीकरण करणे, ४) तंत्रज्ञान हस्तांतरण, संशोधन व विकास, बौद्धिक मालमत्ता हक्क निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे, ५) पुरवठादार व विक्रेते यांच्यातील संपर्क व्यवस्था विकसित करण्यासाठी औद्योगिक संस्था/संघटनांना प्रोत्साहन देणे, ६) अखंड चोवीस तास वीज पुरवठा उपलब्ध करून देणे, ७) इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली/उत्पादक उद्योग क्षेत्रासाठी विकासनिधी निर्माण करणे.

आर्थिक प्रोत्साहनामध्ये जी.एस.टी.वर सवलत ही त्या त्या राज्यांनी केलेल्या वर्गवारीप्रमाणे असलेल्या तिथल्या सूक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या औद्योगिक उपक्रमांना दिलेली आहे.

**व्याज अनुदान :** सर्व नवीन/विस्तारित उद्योगांना स्थिर मालमत्ता खरेदीसाठी बँकेकडून, सार्वजनिक वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या मुदत कर्जावर व्याज अनुदान मिळाण्यास पात्र असतील. या योजनेमध्ये जास्तीत जास्त ५ टक्के व्याजावर सूट मिळू शकेल.

**वीज आकार/अनुदान :** नवीन इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादन उद्योग घटकांना अ.ब.क वर्गवारी क्षेत्रात तीन वर्षाकरिता व राज्याच्या इतर क्षेत्रांत ५ वर्षांकरिता प्रति युनिट १ रु.प्रमाणे वीज आकार प्राप्त होईल.

**वीज शुल्क माफी :** सर्व नवीन इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादन उद्योग घटकांना १५ वर्षांसाठी वीज शुल्कातून सूट देण्यात येईल.

**मुद्रांक शुल्क :** नवीन उद्योगांना उद्योग सुरू करण्यासाठी एखादी स्थावर मालमत्ता भाडेतत्त्वावर घेण्यासाठी मुद्रांक शुल्कामध्ये ५० टक्के सवलत मिळेल. कर्ज घेण्यासाठी गहाणखत व हायपोथिकेशनसाठी मुद्रांक शुल्कामध्ये १०० टक्के सूट मिळेल.

तसेच उद्योगाला लागणाऱ्या मूलभूत सुविधा त्या त्या उगमस्थानापासून फॅब घटक उद्योगाच्या ठिकाणापर्यंत पुरविल्या जातील. या धरणापासून उद्योगापर्यंत पाईपलाइन टाकून पाण्याची व्यवस्था केली जाईल.

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*



*मा.डॉ.विलास सपकाळ, कुलगुरू, महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना उद्योजक मासिक भेट देताना डॉ. अभिराम डबीर, मालमत्ता विभाग प्रमुख, एमसीईडी दिसत आहेत. यावेळी श्री. देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर उपस्थित होते.*




## पुस्तक परिचय : सायबर अटॅक

# सायबर साक्षर होण्यासाठी

**सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढत चालले आहे. गाव-खेड्यापासून ते शहरामध्ये राहणारे अनेकजण त्याला सहजपणे बळी पडत आहेत. सायबर गुन्ह्यांपासून आपला बचाव कसा करायचा, त्यापासून सतर्क कसे राहायचे, याचा नेमका मार्ग दाखवणारे पुस्तक मराठी प्रकाशन व्यवसायात अग्रेसर असणाऱ्या राजहंस प्रकाशनाने वाचकांच्या भेटीला आणले आहे. - प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढत चालले आहे. गाव-खेड्यापासून ते शहरामध्ये राहणारे अनेकजण त्याला सहजपणे बळी पडत आहेत. सायबर गुन्ह्यांपासून आपला बचाव कसा करायचा, त्यापासून सतर्क कसे राहायचे, याचा नेमका मार्ग दाखवणारे पुस्तक मराठी प्रकाशन व्यवसायात अग्रेसर असणाऱ्या राजहंस प्रकाशनाने वाचकांच्या भेटीला आणले आहे. या पुस्तकात सायबर गुन्ह्याचे प्रकार, त्यापासून बचाव करण्याच्या टिप्स याची योग्य माहिती लेखक डॉ. संजय तुंगार आणि सुधीर साबळे यांनी दिली आहे.

सायबर गुन्ह्याचा प्रकार हा या पुस्तकामध्ये कथेच्या स्वरूपात मांडण्यात आला आहे, इतकेच नाही तर प्रत्येक कथेच्या माध्यमातून ते जाणून घेताना आपल्याला त्यामधून वेगळा अनुभव येतो. अगदी सोप्या भाषेत या कथांची मांडणी करण्यात आल्यामुळे त्या वाचताना आपली उत्सुकता वाढत जाते. शेअरच्या गुंतवणुकीमध्ये अनेकजण लाखाचे बारा हजार करून घेतात. सायबर विश्वात हा प्रकार कसा घडतो, हे लेखकाने उत्तम उदाहरणांच्या माध्यमातून पटवून दिले आहे. कार्डद्वारे होणारे घोटाळे, कर्ज देण्याचे कारण पुढे करून होणारी फसवणूक, विविध प्रकारच्या ॲपच्या माध्यमातून होणारी आर्थिक फसवणूक, प्री-पेड टास्कच्या माध्यमातून गंडा घालण्याचे होणारे प्रकार, हनी ट्रॅप, कार्ड क्लोनिंग, सोर्स कोडची चोरी, सायबर दहशतवाद, करन्सी फ्रॉड अशा अनेक प्रकरणांच्या माध्यमातून लेखकांनी सायबर गुन्ह्यांचे प्रकार कोणते आणि ते घडतात कसे, याची माहिती रंजक कथांच्या माध्यमातून वाचकांना करून दिली आहे. याच्याबरोबरच सायबर स्मार्ट होण्याच्या टिप्स, त्याच्याजोडीला देश-विदेशातील सायबर गुन्ह्यांचे हॉटस्पॉट, सायबर गुन्ह्यात पैसे गमावल्यानंतर ते पुन्हा मिळवण्याचे मार्ग, याची माहिती या पुस्तकामध्ये देण्यात आली आहे.

आजच्या घटकेला घरटी एकतरी व्यक्ती सायबर गुन्ह्याला बळी पडत आहे. आपण ठेवत असणाऱ्या आंधळ्या विश्वासामुळेच सायबर गुन्ह्यांना बळी पडणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. सायबर गुन्ह्यामध्ये फसल्याच्या अनेक घटना आपल्या कानावर आल्या देखील असतील; पण यापासून बचाव कसा करायचा, सायबर साक्षर होऊन आपण शहाणे कसे व्हायचे, याचे धडे आपल्याला 'सायबर अटॅक' या पुस्तकामध्ये मिळतात. राजहंस प्रकाशनाने पुस्तकाची उत्तम निर्मिती केली आहे. नीलेश जाधव यांनी तयार केलेले मुखपृष्ठ आणि आतमधील चित्रे यांनी पुस्तक आकर्षक झाले आहे. पुस्तकाचे संपादन डॉ. सदानंद बोरसे यांनी केले आहे. पुस्तकाची अंतर्गत मांडणी तृप्ती देशपांडे यांनी केली आहे.

एकूणच काय तर आपण दररोज घाम गाळून जे काही कष्टाने कमावतो ते जर सुरक्षित ठेवायचे असेल, सायबर चोरट्यांच्या चक्रात फसायचे नसेल, सायबर साक्षर व्हायचे असेल तर त्याचा मार्ग तुम्हाला या पुस्तकामध्ये निश्चितपणे सापडू शकतो.

**पुस्तकाचे नाव :** सायबर अटॅक

**लेखक :** डॉ. संजय तुंगार आणि सुधीर साबळे

**प्रकाशक :** राजहंस प्रकाशन, पुणे

**किंमत :** २९० रुपये

माहिती तंत्रज्ञानातील नवीन प्रवाह

# डेटा ॲनालिटिक्समध्ये संधी अनलिमिटेड!



**विज्ञान, माहिती तंत्रज्ञान आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात आजकाल सर्वाधिक कानावर पडणारा शब्द म्हणजे 'डेटा ॲनालिटिक्स'. जगभरात आजघडीला 'डेटा' ला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. मोठमोठाल्या कंपन्या डेटासाठी वाटेल ती किंमत मोजायला तयार आहेत, तर आलेल्या डेटाचे विश्लेषण करून त्यातून आपल्या कामाची माहिती संकलित करण्याच्या कामाला मोठा वेग आला आहे. काय आहे 'डेटा ॲनालिटिक्स'. या क्षेत्रात भारताचे स्थान कोठे आहे, याबाबत ही सविस्तर माहिती. - प्रतिनिधी**



**मा.डॉ.हर्षदीप कांबळे**
प्रधान सचिव, उद्योग

डेटा ॲनालिटिक्स म्हणजे दिलेल्या माहितीबद्दल निष्कर्ष काढण्यासाठी कच्च्या डेटाचे विश्लेषण करणे किंवा त्याचे परीक्षण करण्याचे शास्त्र. आज जवळपास प्रत्येक व्यवसायात, मग ते एखादं स्टार्टअप असो की हजारो उत्पादनं आणि करोडो रुपयांची जगभर उलाढाल करणारी बहुराष्ट्रीय कंपनी; त्यांच्या निर्मिती, विपणन, संशोधन, ग्राहक सेवा, मनुष्यस्रोत अशा प्रत्येक कामाचं मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झालेलं आहे. केवळ बिलं बनवणं, मालाची इन्व्हेन्टरी ठेवणं, त्यांच्या विक्रीची नोंद ठेवणं या संगणकीकरणाच्या पलीकडे जात त्यांच्या बेसिक माहितीवरून व्यवसायाला स्केल आणि स्पीड प्रदान करण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या व्यावसायिक माहितीचं विविध दृष्टीनं विश्लेषण करणं, त्याआधारे कंपनीला उपयुक्त होईल, अशा सूचना करणं हे काम डेटा ॲनालिसिसद्वारे होते.

कंपनीची विक्री कमी किंवा जास्त झाली असेल, तर त्यामागची कारणे शोधण्यास मदत करणे, कोणत्या वस्तूचा आउटलेटमध्ये तुटवडा आहे व नजीकच्या काळात तुटवडा होईल ते आधीच सांगणे, खपावर परिणाम न होता वस्तूची किंमत जास्तीत जास्त कितीपर्यंत वाढवता येईल, कोणत्या किमतीस खप जास्तीत जास्त होईल, कोणकोणत्या वस्तू ग्राहक एकत्र घेतील, याचे विश्लेषण करण्याचे काम यात अभिप्रेत असते. ऑनलाइन व असंख्य छोट्या-मोठ्या दुकानांतून घरोघरी विकल्या जाणाऱ्या वस्तू - यापैकी कुठल्या मार्गाने किती विक्री होते, ऑनलाइन विक्री होत असेल तर त्यापैकी मोबाइलवरून किती, संगणकाच्या साह्याने किती, सोशल मिडियावर कंपनीच्या उत्पादनाविषयी काय कॉमेंट्स आहेत, किती लाइक्स आहेत, या सगळ्यांचे अचूक विश्लेषण डेटा ॲनालिटिक्स करून देतात.

भारतात 'डेटा ॲनालिटिक्स' म्हणजेच डेटा विश्लेषण व्यवसाय गेल्या दशकभरात वेगाने वाढला आहे. एका अहवालाप्रमाणे २०२५ पर्यंत सुमारे ९०० दशलक्षाहून अधिक लोक इंटरनेट वापरतील. २०१५ च्या तुलनेत ही संख्या दुप्पट असेल. २०२१-२२ मध्ये डेटा ॲनालिटिक्सच्या बाजारपेठेत लक्षणीय वाढ झाली होती. २०२०-२१ च्या तुलनेत यात २६.५ टक्क्यांची वाढ होऊन ती ४५.४ अब्ज अमेरिकी डॉलर्सवर पोहोचली.

कंपन्यांना त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी कमी खर्चात अधिकाधिक विश्वासार्ह डेटाची आवश्यकता असते. हा डेटा मिळविण्यासाठी कंपन्या स्वतः सर्वेक्षण करतात किंवा तयार डेटा विकत घेतात. यातून कंपन्यांना विस्तारासाठी पोषक बाजारपेठ शोधण्यात मदत होते. मिळालेला डेटा सुरक्षित ठेवणे, त्याचा गैरवापर टाळणे आवश्यक असते. मिळालेल्या डेटाचे विश्लेषण करून एक मॉडेल तयार करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रक्रियेला 'डेटा ॲनालिटिक्स' म्हणजेच डेटा विश्लेषण म्हणतात. या क्षेत्रात काम करण्यासाठी तज्ज्ञ व कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यांना डेटा ॲनालिसिस, विश्लेषण, संभाव्यता, मोठा डेटा, प्रशासन आणि आयटी गेल्या तीन दशकांमध्ये, भारतात आउटसोर्सिंगमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. व्यवसाय विश्लेषणाच्या विशेष क्षेत्रात बिग डेटा, संख्याशास्त्रज्ञ, विश्लेषण, संभाव्यता तज्ज्ञ आणि प्रशिक्षणासाठी आयटी व्यावसायिकांची आवश्यकता आहे. भारतातील डेटा विश्लेषणाची व्याप्ती उज्ज्वल आहे.

### डेटा विश्लेषणाचे महत्त्व

एखाद्या संस्थेला विविध मार्गांनी डेटा विश्लेषणाचा फायदा होऊ शकतो. यात व्यवसायाची जोखीम ओळखणे आणि ती कमी करणे इथपासून संभाव्य ग्राहकांसाठी व्यवसायाचे मेसेज पाठविण्याचा समावेश आहे. 'डेटा ॲनालिटिक्स'चे पाच महत्त्वाचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत -

### पर्सनलाइझ्ड क्लायंट एक्सपिरिअन्स

सोशल मीडिया, पारंपरिक रिटेल आणि ई-कॉमर्ससह विविध मार्गांच्या वापरातून ग्राहकांची माहिती गोळा केली जाते. यातून ग्राहकांच्या वर्तणुकीचा अंदाज येतो. उदाहरणार्थ, एखादा ग्राहक नेमक्या कोणत्या वस्तूचा शोध घेतोय, त्याचे बजेट किती आहे, त्याचा आवडीचा ब्रँड कोणता, त्याची विशिष्ट आवड कोणती, याचा अंदाज घेऊन त्यास या चौकटीत बसणाऱ्या साहित्य किंवा सेवेच्या जाहिराती पाठवल्या जातात. यातून ग्राहक जोडला जातो.

### व्यावसायिकांच्या फायद्यासाठी

आपल्या एखाद्या उत्पादनाला बाजारात मागणी आहे का, त्याचे प्रतिस्पर्धी कोण आहेत, याबाबतचा डेटा 'डेटा ॲनालिटिक्स' देऊ शकतो. कंपनीचे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी व्यावसायिकांना 'डेटा ॲनालिटिक्स' चा फायदा होतो. उदाहरणार्थ, ऑफरमधील बदल ग्राहकांच्या मागणीवर कसा परिणाम करेल हे सांगण्यासाठी कंपनी नेमके कोणते मॉडेल वापरू शकते, याचा अंदाज 'डेटा ॲनालिटिक्स'तून येतो.

### प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी

डेटा विश्लेषण संस्थांना ऑपरेशनल परिणामकारकता वाढविण्यात मदत करू शकते. उत्पादनातील अडथळे किंवा व्यत्यय ओळखण्यात मदत करण्यासाठी तसेच भविष्यात उद्‌भवू शकणाऱ्या समस्यांचा अंदाज घेण्यासाठी पुरवठा साखळीचा डेटा संकलित केला जाऊ शकतो. त्यामुळे सणासुदीच्या दिवसांत व्यावसायिकांना मालाचा पुरवठा करण्याचा अंदाज येऊन उत्पादनातील विलंब टाळता येऊ शकतो.

### तोटे आणि जोखीम कमी करण्यासाठी

व्यवसायात जोखीम भरपूर आहेत. त्यामध्ये ग्राहक किंवा कर्मचाऱ्यांची फसवणूक, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि सुरक्षितता यांचा समावेश होतो. जोखमीचे अधिक अचूक मूल्यांकन करण्यासाठी आणि सावधगिरीचे उपाय करण्यासाठी, कंपनी 'डेटा ॲनालिटिक्स' नियुक्त करू शकते.

### डेटा ॲनालिटिक्सचे फायदे

**सुधारित ग्राहक सेवा -** 'डेटा ॲनालिटिक्स'चा वापर करून, ग्राहक सेवेत सुधारणा करू शकता. ग्राहकांच्या गरजेनुसार त्यांना सुविधा प्रदान करता येते. प्राधान्य, समस्या आणि उपाययोजना यांचा अंदाज येतो.

**प्रभावी ऑपरेशन्स -** उत्पादनक्षमतेत सुधार करता येतो. डेटा विश्लेषणाचा वापर करून ऑपरेशन्सची मांडणी सुव्यवस्थितरीत्या करता येते. ग्राहकांना नेमके काय हवे आहे याचे चांगले आकलन करून, त्यांना आकर्षित करणाऱ्या जाहिराती आणि साहित्य निर्मितीसाठी अधिक वेळ व श्रम खर्च करता येते.

**यशस्वी मार्केटिंग -** डेटा विश्लेषणाद्वारे आपल्या उत्पादनांची परिणामकारकरीत्या जाहिरात करता येते. यातून संभाव्य ग्राहकांच्या गरजा, त्यांच्या आवडी, त्यांची क्षमता याचा अंदाज घेऊन आपल्या उत्पादनांना त्यांच्यापर्यंत पोहोचवू शकता.

### डेटा विश्लेषणाची प्रक्रिया

ग्राहकाने वस्तू खरेदी केल्याचा डेटाबेस तयार होत राहतो. माल वितरीत करण्यासाठी किती वेळ लागला हे लक्षात येते. उत्पादनांची वर्गवारी, उत्पादन परतावा इत्यादींबद्दल अतिरिक्त डेटा मिळतो. त्यानंतरच्या तिमाहीत विक्री आणि कमाई निश्चित करता येते.

### 'डेटा ॲनालिटिक्स' होण्यासाठी आवश्यक कौशल्ये

'डेटा ॲनालिटिक्स' होण्यासाठी काही कौशल्ये आवश्यक आहेत. यात प्रामुख्याने गणित आणि आकडेवारी तसेच विश्लेषणाची, सांख्यिकीय आणि समस्या सोडवण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. कोडिंगचे काही कौशल्य फायद्याचे ठरतात. डेटाचे व्हिज्युअलायझेशन आणि प्रभावीपणे संवाद साधण्याची क्षमता महत्त्वाच्या ठरतात. Java, Perl, Python, C / C++ यासारख्या प्रोग्रामिंग लॅंग्वेजेसवर उत्कृष्ट कमांड असायला हवी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता आवश्यक आहे.

### करिअरच्या संधी आणि डेटा ॲनालिटिक्सची भारतातील व्याप्ती

बिग डेटा ॲनालिटिक्समध्ये भारत आघाडीवर आहे. बहुसंख्य कंपन्यांना डेटा मिळविण्यासाठी मोठ्या 'डेटा ॲनालिटिक्स'ना गुंतवून ठेवणे महत्त्वपूर्ण झाले आहे. भारतातील डेटा ॲनालिटिक्सची व्याप्ती प्रचंड आहे आणि भविष्यात ती केवळ वेगाने वाढत आहे. डेटा ॲनालिटिक्सचा प्रयोग बँकिंग, कायद्याची अंमलबजावणी, आरोग्यसेवा, दूरसंचार, ई-कॉमर्स, एनर्जी, उत्पादन, रिटेल इंडस्ट्री, माहिती आणि तंत्रज्ञान आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापन यासारख्या उद्योगांमध्ये होतो. डेटा विश्लेषकांच्या जबाबदाऱ्यांमध्ये प्रोसिजर सेटिंग, रिपोर्ट रायटिंग, कोलॅबोरेशन यांचा समावेश आहे. भारतात 'डेटा ॲनालिटिक्स'ला वार्षिक १० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज मिळते, तर १० ते १२ वर्षे अनुभव असणाऱ्यांना २५ लाखांहून अधिकचे पॅकेज मिळू शकते.

ॲनालिटिक्स इंडिया मॅगझिनच्या अभ्यासानुसार भारतात 'डेटा ॲनालिटिक्स'च्या बाजारपेठेत लक्षणीय वाढ झाली आहे. इंटरनेट वापरकर्त्यांच्या वाढीमुळे ही वाढ झाली आहे. जागतिक बँकेच्या मते, भारतातील इंटरनेट वापरकर्ते २०१८ मध्ये २० % वरून २०१९ मध्ये ४१% पर्यंत दुप्पट झाले. २०२५ पर्यंत ९०० दशलक्ष नागरिक इंटरनेट वापरतील. या वाढीमुळे 'डेटा ॲनालिटिक्स'ची मागणी वाढणार आहे.

याव्यतिरिक्त कोरोनामुळे कंपन्यांचे व्यवसाय मॉडेल लक्षणीय बदलले आहेत. टेक्नॉलाजीवर आधारित सोल्यूशन्सच्या मागणीमुळे या उद्योगांचे डिजिटायझेशन होत आहे. त्याचप्रमाणे, एआयवर आधारित उद्योगांत वाढ झाली. पुढे, ज्या कंपन्यांनी रिमोट वर्किंग मॉडेलचा अवलंब केला त्यांना 'डेटा ॲनालिटिक्स'ची मोठी आवश्यकता भासत आहे. या वाढीमुळे 'डेटा ॲनालिटिक्स' उद्योगाला डेटा संकलनात लक्षणीय वाढ होण्यास मदत झाली आहे.

'डेटा ॲनालिसिस' हे आयटी क्षेत्रात एक जोमाने पुढे येत असलेले क्षेत्र आहे. व्यवसायाच्या नेमक्या विश्लेषणातून जगातील फक्त व्यापार-उद्योगच नव्हे, तर आपल्या देशाचं एकूणच चित्रदेखील नकळतपणे बदलवून टाकण्यास समर्थ आहे. हा लेख लिहिण्याचा उद्देश असा आहे की, आयटी म्हणजे फक्त बॅक ऑफिस आउटसोर्सिंग नव्हे आणि ई-कॉमर्स म्हणजे फक्त ऑनलाइन वस्तू विकणे नव्हे! तर आपल्या तरुणांनी त्यापुढे जाऊन डेटा ॲनॅलिसिस या विषयाकडे गांभीर्याने बघणं गरजेचं आहे. अजूनही हे क्षेत्र फारच नवीन आहे आणि १३० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात हजारो मूलभूत प्रश्न आहेत... करण्यासारखं पुष्कळ आहे.

# डेटा सायन्स, बिग डेटा, ॲनालिटिक्समध्ये वाव

# करिअरची आकडेमोड



**आपल्या दररोजच्या आयुष्यात आपण किती आकडेमोड करतो? आलेला पैसा, त्याचे नियोजन, बँकेचे हप्ते, शाळा-कॉलेजमधील मार्क, ऑफिसमधील हिशेब असे कितीतरी आकडे नित्यनियमाने आपल्या भेटीला येतात. मग मोठाल्या कॉर्पोरेट कंपन्या, बँका, सरकारी कार्यालये यांना किती आकडेमोड करावी लागत असेल? पूर्वी हे काम मॅन्युअली चालायचे. मात्र, आधुनिक युगात आता ही सगळी आकडेमोड संगणकावर केली जात आहे. यातूनच डेटा सायन्स हे नवीन शास्त्र उदयाला आले आहे. काळानुरूप याचा विस्तार होत आहे, तर यात काम करण्यासाठी डेटा सायंटिस्ट, डेटा ॲनालिस्ट यासारख्या तज्ज्ञ व कुशल मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली आहे. - प्रतिनिधी**

डेटा सायन्स म्हणजे काय? डेटा सायन्सला भारतात भविष्य आहे का? डेटा सायन्स एक डिमांडिंग करिअर आहे का? सद्यःस्थितीत भारतात याला वाव आहे का? डेटा सायंटिस्ट म्हणून तुम्ही आयुष्यात पुढे कुठे जाऊ शकता? आजच्या तरुणांच्या मनात असणाऱ्या या व अशा अनेक प्रश्नांची एक कोर्पोरेट ट्रेनर या नात्याने या लेखाच्या माध्यमातून उत्तर देण्याचा माझा प्रयत्न राहील!

आपण आपले दररोजचे आयुष्य जर लक्षात घेतले तर पहा, डेटा सर्वत्र आहे. तुमची पेमेंट ऑनलाइन करणे, इंटरनेट सर्फ करणे, ऑनलाइन वस्तू खरेदी करणे, YouTube व्हिडिओ पाहणे, इन्स्टाग्राम किंवा फेसबुक स्क्रोल करणे, सेल्फी क्लिक करणे, व्हॉट्सॲप मेसेज शेअर करणे, आणि ई-मेलसाठी Gmail वापरणे. या व अशा अनेक गोष्टींसाठी तुम्ही डेटा वापरत आहात, डेटा तयार करत आहात आणि डेटावर अवलंबून आहात.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या एका रिपोर्टनुसार असा अंदाज आहे की २०२५ पर्यंत, जागतिक स्तरावर दररोज ४६३ एक्साबाइट डेटा तयार केला जाईल. हे प्रमाण प्रतिदिन २१,२७,६५,९५७ DVD च्या समान आहे! हा एवढा प्रचंड डेटा इंटरनेटवर जात आहे आणि हा डेटा वाढतच आहे!

आणि म्हणूनच आज आपल्यासमोर २ मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. १. एवढ्या प्रचंड डेटाला ठेवायचं कुठे? कुठे स्टोर करायचा हा डेटा? या प्रश्नाचे उत्तर आहे क्लाउड. म्हणून क्लाउड कॉम्प्युटिंग एक असं करिअर आहे जिथे पण खूप वाव आहे. २. या डेटाचं करायचं काय? आणि इथे सुरुवात होते डेटा सायन्स. या डेटाचा वापर करून, कंपन्यांना आपला बिझिनेस वाढवता येईल का?

एखाद्या व्यवसाय अथवा ॲप्लिकेशनला वापरताना वा इंटरनेट चालू असताना तयार होत जाणाऱ्या माहितीचा वापर करून त्या व्यवसायास अथवा ॲप्लिकेशनला वृद्धिंगत करणे म्हणजे डेटा सायन्स. एखादे सोपे उदाहरण द्यायचे झाल्यास, समजा तुम्ही एक हॉटेल चालवता. काही दिवस हॉटेल चालवून तुमच्या लक्षात येते की तुमचे हॉटेल फक्त दुपारी १२ ते ३ व रात्री ७ ते ९ चालते; कारण तीच साधारण सर्वांची जेवणाची वेळ असते आणि सुट्टी सुद्धा; पण इतर वेळी ते म्हणावे असे चालत नाही. आता या माहितीचा वापर करून तुम्ही चपाती बनवणाऱ्या काकूंना दिवसभर रोजगार देण्याऐवजी फक्त दिवसात ५ तास काम दिले, भाज्या गरम करण्याचा कालावधी ठरवला, विजेचा वापर योग्य वेळेत केला, भांडी घासण्यासाठी काकू फक्त सकाळी बोलावल्या. हे सर्व उपाय केल्यावर तुम्ही तुमचा खर्च (ऑपरेटिंग कॉस्ट) कमी झाला व परिणामी तुमचा नफा वाढला. अशाच पद्धतीने इतर व्यावसायिक समस्या देखील डेटा सायन्सचा वापर करून सोडवल्या जाऊ शकतात.

डेटा प्रोफेशनल अशी व्यक्ती आहे जी डेटाच्या सर्व भागांचा अभ्यास करते आणि माहितीचा उलगडा करण्यासाठी त्याचे विश्लेषण करते. माहितीचा वापर जगभरातील विविध क्षेत्र आणि प्रक्रियांद्वारे केला जातो. मूलभूतपणे, डेटाचा अभ्यास महत्त्वपूर्ण माहितीमध्ये रूपांतरित करण्यासाठी केला जातो, ज्यामुळे अधिक डेटा तयार होतो. आणि हा डेटा कंपन्यांद्वारे त्यांचा ग्राहक वर्ग तयार करण्यासाठी (टार्गेट

ऑडियन्स) आणि ग्राहकांना विविध उत्पादने आणि सेवा विकण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरला जातो.

सध्या कोणतेही क्षेत्र डेटा सायन्सच्या प्रभावापासून वंचित राहिलेले नाही. विमानचालनापासून उत्पादनापर्यंत, किरकोळ विक्रीपासून ते औषध निर्मितीपर्यंत, गेमिंगपासून ते शिक्षणापर्यंत, प्रत्येक विभाग आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी डेटा सायन्सचा उपयोग करत आहे.

**डेटा सायन्स इंडस्ट्रीमध्ये स्कोप :**

डेटा सायंटिस्टची गरज सर्वच क्षेत्रांत आहे आणि भविष्यात देखील असणार आहे. बरं असेही नाही की डेटा सायन्स नवीन क्षेत्र आहे. डेटा सायन्स हे एक सतत विकसित होत असलेले क्षेत्र आहे. प्रत्येक क्षणी प्रचंड प्रमाणात डेटा संकलित केल्यामुळे, येणाऱ्या काळात डेटा वैज्ञानिकांची मागणी वाढतच जाणार आहे. त्यामुळे या क्षेत्राशी संबंधित लोकांसाठी आश्चर्यकारक करिअरची संधी असणार आहे.

LinkedIn ने आपल्या एका अहवालात दावा केला आहे की, डेटा सायन्स हे जागतिक स्तरावर सर्वात वेगाने वाढणारा रोजगारनिर्मितीचे क्षेत्र म्हणून उदयास आले आहे. या क्षेत्राची २०१२ पासून ६५०% पेक्षा जास्त वाढ झाली आहे.

भारतातील बँकिंग, सायबर सुरक्षा, वित्तीय संस्था, शिक्षण आणि आरोग्य सेवा क्षेत्रे यासारख्या मोठ्या संस्था असोत किंवा लहान संस्था, उद्योग असोत जवळपास सर्वच क्षेत्रांत डेटा सायन्सचा वापर करण्यास मोठा वाव आहे. येणाऱ्या वर्षांमध्ये यामध्ये अजून वृद्धी बघायला मिळेल. ब्यूरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्सनुसार, डेटा सायन्समधील नोकऱ्या २०२६ पर्यंत २७.९% वाढतील.

त्याचप्रमाणे, ॲनालिटिक्स इनसाइट्सच्या मते, भारत जगभरातील ३२% हून अधिक डेटा बाजारपेठेवर कब्जा करेल आणि २०२६ पर्यंत USD20 अब्ज निर्माण करेल. AIM रिसर्चच्या दुसऱ्या अहवालात असे सूचित करण्यात आले आहे की एकूण जागतिक विश्लेषक नोकरीच्या संधींमध्ये भारताचे योगदान ९.४% आहे, जे ७.२% वरून वाढले आहे. जानेवारी २०२०.

सध्या, डेटा वैज्ञानिकांची मागणी भारतात सर्वकालीन उच्च पातळीवर आहे. एकट्या भारतात २०२६ पर्यंत डेटा सायन्समध्ये सुमारे ११ दशलक्ष नोकऱ्या मिळण्याचा अंदाज विश्लेषकांनी वर्तवला आहे.

ऑडिओ, व्हिडिओ, प्रतिमा आणि आलेखांचे कोणतेही स्वरूप डेटा मानले जाते. त्यामुळे व्यवसायांना अधिक मजबूत आणि स्केलेबल बनवण्यात डेटा महत्त्वाची भूमिका बजावतो. डेटा सायन्स सध्या पुढील भारतीय क्षेत्रांमध्ये वापरले जाते -

**बँकिंग आणि फायनान्स -** सध्या ग्राहकांचे मागण्या पूर्ण करण्यासाठी व्यवहाराचे नमुने समजून घेणे हे एक महत्त्वाचे मेट्रिक आहे. हे ग्राहकांसोबत अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यात आणि ग्राहकांच्या समस्यांचे योग्य निराकरण करण्यात मदत करते.

फसवणुकीचे धोके कमी करण्यासाठी, क्रेडिट आणि डेबिटच्या व्यवहाराचे नमुने समजून घेण्यासाठी, इंटरनेट बँकिंग डेटा आणि त्यांच्या क्लायंटद्वारे प्राधान्य दिले जाणारे संवादाचे साधन यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान वापरण्याचे महत्त्व बँकिंग क्षेत्रांनी हळूहळू स्वीकारले आहे.

**हेल्थकेअर -** हेल्थकेअर इंडस्ट्रीने डेटा सायन्सचा अवलंब खूप पूर्वी केला आहे; कारण दैनंदिन आधारावर गोळा केलेल्या डेटाच्या वाढत्या भागांमुळे. वैद्यकीय आणि बिलिंग इतिहास आणि क्लिनिकल सिस्टीम्सचे आजकाल नवीनतम तंत्रज्ञान वापरून परीक्षण केले जाते.

डेटा सायन्स रुग्णाचा इतिहास किंवा पेटंट आरोग्य समजून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचा वापर तज्ज्ञांद्वारे जुनाट आजार टाळण्यासाठी किंवा तो बरा करण्यासाठी केला जाऊ शकतो आणि पाहिल्या गेलेल्या डेटा पॅटर्नच्या आधारे रुग्णांना तज्ज्ञ सल्ला देखील प्रदान करू शकतात.

कोविड-१९ साथीच्या आजारादरम्यान, जगभरातील हजारो लोकांनी टेलिमेडिसिनचा वापर केला. टेलिमेडिसिन हे तंत्रज्ञान, डेटा-केंद्रित प्लॅटफॉर्म आहे ज्याने लॉकडाऊन दरम्यान अनेक लोकांना डॉक्टरांच्या भेटी आणि सल्लामसलत ऑनलाइन करण्यात मदत केली. त्यामुळे आरोग्यसेवा क्षेत्रे आधीपासूनच डेटा-समर्थित विज्ञान आणि सुरळीत कामगिरीसाठी साधने लागू करण्याच्या प्रगत टप्प्यात आहेत.

**ई-कॉमर्स आणि किरकोळ -** डेटा विश्लेषणे आणि ग्राहक संपादन आणि टिकवून ठेवण्यासाठी भविष्यसूचक विश्लेषण वापरण्याच्या बाबतीत ई-कॉमर्स हे सर्वात प्रगत क्षेत्रांपैकी एक आहे. Amazon आणि Flipkart सारख्या ई-कॉमर्स दिग्गज यशस्वी व्यवसाय मोहिमा चालवण्यासाठी डेटा-बॅक्ड पद्धती वापरतात. जाहिराती पुन्हा लक्ष्यित करण्यासाठी आणि ग्राहकांच्या पसंती समजून घेण्यासाठी या क्षेत्रांद्वारे मशीन लर्निंगचा वापर वाढत्या प्रमाणात केला जातो.

**कृषी -** भारतीय अर्थव्यवस्था चालवणारे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे कृषी. हे भारतातील १.३ अब्ज लोकांना अन्न सुरक्षा प्रदान करते. AI आणि डेटा सायन्स अनेक कृषी समस्यांचे निराकरण करण्यात मदत करू शकतात, जसे की हवामान परिस्थिती, पिकांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे आणि पिकांच्या सामान्य रोगांवर उपाय सुचवणे.

खरं तर, सध्या हवामानाच्या परिस्थितीनुसार कोणती पिके घेतली जाऊ शकतात हे सुचविणारे तंत्रज्ञान आहे. शेतकऱ्यांना माहिती नसलेल्या क्षेत्रात प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संदर्भात समर्थन मिळवण्यासाठी डेटा सायन्स उपयुक्त ठरू शकते.

**वाहतूक आणि लॉजिस्टिक्स -** एआय आणि डेटा सायन्सचा वापर ट्रॅफिक कोंडीचा अंदाज लावण्यासाठी आणि ट्रॅफिकशी संबंधित मृत्यू टाळण्यासाठी केला जाऊ शकतो. समुदाय-आधारित पार्किंग, बुद्धिमान वाहतूक प्रणाली आणि प्रवास आणि रूट ऑप्टिमायझेशन पद्धती हे काही इतर संभाव्य क्षेत्र आहेत.

**शिक्षण -** शैक्षणिक क्षेत्रातील अनेक समस्या आहेत ज्या डेटा सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित साधने आणि पद्धती वापरून सोडवल्या जाऊ शकतात. उदाहरणार्थ, ऑनलाइन शिक्षण ही संकल्पना शिक्षण क्षेत्रात कमालीची बदल करत आहे. ग्रामीण

पार्श्वभूमीतील लोकांना प्राथमिक शालेय पायाभूत सुविधांशिवाय शिक्षण मिळणे शक्य झाले आहे. AI मध्ये प्रत्येक मुलाच्या गरजा समजून घेण्यात शिक्षकांना मदत करण्याची क्षमता आहे. यामुळे मुलांच्या शिकण्याच्या शैलीवर आधारित प्रभावी अध्यापन आणि शिक्षण साहित्य विकसित करण्यात मदत होते.

**ऊर्जा** - भारतातील बऱ्याच घरांमध्ये इलेक्ट्रिक वाहने हळूहळू पोहोचत आहेत. नवीकरणीय ऊर्जा स्रोतांबद्दल जागरूकता वाढल्याने, नूतनीकरणयोग्य ऊर्जेची साठवण आणि वितरणाची मागणी आहे, जी कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे शक्य आहे.

### भारतातील डेटा सायंटिस्टचा पगार किती आहे?

भारतात, तुम्हाला डेटा सायंटिस्ट म्हणून काम करण्याचा अनुभव असल्यास, तुम्ही इतर भूमिकांकडे जाऊ शकता जसे की -

डेटा आर्किटेक्ट
डेटा अभियंता
डेटा विश्लेषक
बिझिनेस ॲनालिस्ट
डेटाबेस प्रशासक

PayScale अहवालानुसार, भारतातील डेटा वैज्ञानिकांचा सरासरी पगार सुमारे INR 8 LPA आहे. यात बोनस आणि नफा वाटणीचाही समावेश आहे. एंट्री-लेव्हल डेटा सायंटिस्टचा पगार जवळपास ५ ते ६ LPA असतो आणि करिअरच्या सुरुवातीचा डेटा सायंटिस्ट (१ ते ४ वर्षांचा अनुभव) जवळपास ७ LPA मिळवू शकतो. एक नवीन डेटा सायंटिस्ट सुमारे १.३८ LPA कमावण्याची अपेक्षा करू शकतो आणि ५ वर्षांपेक्षा जास्त अनुभवासह, डेटा सायंटिस्ट जवळपास १०.७३ LPA कमवू शकतो.

डेटा सायंटिस्टच्या पगारावर प्रभाव टाकणारी कौशल्ये म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, डीप लर्निंग इ.

Amazon, Mu Sigma, Google, Mircosoft, Apple, Phonpe, JP Morgan आणि Accenture या काही सुप्रसिद्ध कंपन्या आहेत ज्या दरवर्षी जगभरात मोठ्या संख्येने डेटा सायंटिस्टना नियुक्त करतात.

नीती आयोगाच्या अहवालानुसार, अर्थव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे जागतिक योगदान २०३५ पर्यंत अंदाजे १ ट्रिलियन असेल. या विघटनकारी तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जीवन आणि उद्योगांमध्ये लवकरच परिवर्तन घडेल असा अंदाज आहे. इतकेच नाही तर EY आणि NASSCOM च्या अभ्यासातून असे सूचित होते की २०२३ पर्यंत, सुमारे ४६% कर्मचारी पूर्णपणे नवीन नोकऱ्यांमध्ये सामील होतील ज्या आज अस्तित्वात नाहीत.

म्हणून, जसे आपण पाहू शकतो, डेटा सायन्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता लोकांच्या जीवनावर अधिकाधिक वर्चस्व गाजवत आहे. विशेषतः डेटा-आधारित संशोधनामध्ये विविध क्षेत्रांसाठी असंख्य संधी आहेत. सर्वच प्रकारचे उद्योग या संधीचा फायदा घेऊ शकतात आणि अर्थव्यवस्थेच्या फायद्यासाठी त्यांचे व्यवसाय मॉडेल बदलू शकतात.

## शी र्षा स न



- मोठ्या प्रमाणावर मोठेपण मिळविण्यासाठी इतरांना थोडाफार मोठेपणा द्यायला काहीच हरकत नाही.
- साहेबांची दिशाभूल करून आपण चांगले मार्क मिळविले अशी बऱ्याच जणांची गोड समजूत असते; पण जेव्हा साहेबाकडून त्याची दिशाभूल झाल्याचे लक्षात येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते.
- आपणच फार हुशार आहोत असे काहीजण भासविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. या प्रयत्नाला इतरांनी चांगलाच प्रतिसाद दिल्यास ती व्यक्ती फारच हुशार असल्याचे सिद्ध होते; पण सत्य ओळखून प्रतिसाद न दिल्यास स्वतःची दिशाभूल होते.
- आपण फारच प्रामाणिकपणे काम करतो हे दाखविण्याचा काही कर्मचारी नाहक प्रयत्न करतात; कारण त्याच्या अविरत कामाचा निष्कर्ष साहेबाच्या हातात असतो.
- आपले म्हणणे खरे असेल तर साहेबाच्या चटकन लक्षात येते; पण वारंवार खोटे सांगून खरे करण्याचा प्रयत्न साहेबाच्या लगेच लक्षात येतो.
- साहेबाचा आपल्यावर किती विश्वास आहे हे दाखविण्यासाठी काही महाभाग अनेक क्लृप्त्या वापरतात. आपले काम इतरांना देऊन स्वतः फिरत असतात.
- सहायकाला सतत बोलून बरेच अधिकारी स्वतःलाच त्रास करून घेतात. कारण काय तर मी फार मोठा साहेब या न्यूनगंडाने त्याला ग्रासलेले असते.
- कामावरील कर्मचाऱ्याच्या फारच सुट्या वाढल्या तर तो खरोखरीच अडचणीत असावा अथवा त्याला काम आवडत नसावे अथवा त्याच्याकडे पुरेसे काम नसावे किंवा त्याला साहेबाचा स्वभाव आवडत नसावा असा अर्थ होतो.
- शहाण्या माणसाला तो शहाणा असल्याची जाणीव करून देण्याची गरज नसते. नाही तर तो तुमची गिणती अतिशहाण्यामध्ये करतो.
- कर्मचाऱ्याच्या चांगल्या कामाचे मूल्यमापन साहेब व्यवस्थित करतो तर सहकारी चांगले अवमूल्यन करतो.
- स्वतःच्या प्रती निष्ठा असलेली व्यक्ती पैशामागे धावते, कामावर निष्ठा असलेल्यांच्या त्याच्यामागे काम धावते तर संस्थेच्या प्रती निष्ठा असलेली व्यक्ती कामामागे धावते तर पैसा त्यांच्या मागे धावते.
- एखादा कर्मचारी कार्यालयात अतिशय त्रस्त आणि कामात सतत मग्न असल्याचे दाखवत असेल तर तो आपल्याकडे अतिरिक्त काम येऊ नये याची पूर्व तयारी करत असतो.
- कामसू (कमिटेड) कामाला प्राधान्य देतात, कर्तव्यदक्ष वेळेला, मेहनती कर्मचारी कार्यरत राहण्याला तर अतिहुशार श्रेय घेण्यावर लक्ष ठेवतात.
- एखादा कर्मचारी सहकाऱ्यांना आपल्या अनुभवांचे बोल दिवसातून अनेक वेळा ऐकवत असेल तर सदर कर्मचारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर आलेला आहे असे खुशाल समजावे.



अन्न प्रक्रिया उद्योग

# अन्न उद्योगात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका

**अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. अन्न साखळीत मानवासाठी आरोग्य, रोजगार या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. अन्न उद्योगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थातच एआयची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे. अन्न उत्पादनात शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देऊन त्यांची गुणवत्ता व पौष्टीकता वाढविणे काळाची गरज आहे.**

- शेख मोहम्मद सोहेल खलील

एक उद्योगपती म्हणून, स्पर्धात्मक राहण्यासाठी आणि सतत विकसित होत असलेल्या ग्राहकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अन्न उद्योगात AI समजून घेणे आणि त्याचा लाभ घेणे महत्त्वाचे आहे.

### उद्योगांमध्ये AI चा अर्थ काय आहे?

**AI म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सोप्या भाषेत AI म्हणजे :**

'एक मशीन जी माणसाप्रमाणे विचार आणि काम करू शकते; परंतु माणसाच्या तुलनेत जलद आणि अधिक अचूकपणे'. ज्याप्रमाणे तुम्ही एखाद्या मुलाला गोष्टी करायला शिकवू शकता, त्याचप्रमाणे AI ला सूचना आणि डेटा देऊन कार्ये करण्यास शिकवले जाते.

### अन्न उद्योगांमध्ये AI चे फायदे :

**अन्न ओळख :** AI प्रतिमा किंवा व्हिडीओच्या आधारे खाद्यपदार्थ ओळखू शकते आणि पौष्टिक माहिती प्रदान करू शकते.

**फूड सेफ्टी मॉनिटरिंग :** AI सेन्सर्स आणि कॅमेरे वापरून रिअल टाइममध्ये अन्न सुरक्षा परस्थितीचे परीक्षण आणि विश्लेषण करते.

**उत्पादन विकास :** AI नवीन उत्पादने विकसित करण्यासाठी संवेदी डेटा आणि ग्राहक प्राधान्यांचे विश्लेषण करते, AI ग्राहकांच्या ट्रेंडचे विश्लेषण करून आणि भविष्यातील मागणीचा अंदाज घेऊन नवीन खाद्य उत्पादने तयार करण्यात मदत करते.

**सुधारित अन्न सुरक्षा :** AI दूषित अन्न शोधण्यात आणि ग्राहकापर्यंत पोहोचणाऱ्या असुरिक्षत पदार्थांचे प्रमाण कमी करण्यात मदत करते.

**ऑटोमेशन :** AI अन्न पॅकिंगमधील अनेक कार्ये स्वयंचलित करू शकते, ज्यामुळे मॅन्युअल श्रमाची गरज कमी होते.

**पुरवठा साखळी व्यवस्थापन :** AI पुरवठा साखळी व्यवस्थापन सुरळीत ठेवते तसेच, स्टॉकआउट्स आणि ओव्हरस्टॉकिंग कमी करण्यात मदत करते.

**ग्राहक अनुभव :** AI ग्राहकांचा अनुभव वैयक्तिकृत करण्यात, अनुकूल शिफारसी प्रदान करण्यात आणि ग्राहकांचे समाधान सुधारण्यात मदत करते.

**उत्पादनाचे नुकसान कमी करते :** AI पॅकेजिंग कार्यक्षमता सुधारते आणि अन्न उत्पादनांचे वर्गीकरण, एकत्रीकरण आणि आयोजन यासारख्या कार्य स्वयंचलित करून उत्पादनाचे नुकसान कमी करते.

### AI अन्नप्रकिया उद्योगाच्या भविष्याला कसा आकार देत आहे?

**स्मार्ट फार्मिंग (शेती) :** AI शेतीतील पिकाचे उत्पादन अंदाज सुधारते, जमिनीतील पोषक पातळीचे निरीक्षण करते, कीटकांचा प्रादुर्भाव किंवा रोगांची चिन्हे शोधते आणि संसाधनांचे वाटप इष्टतम करते, ज्यामुळे शेती अधिक कार्यक्षम आणि टिकाऊ बनत आहे.

**AI सप्लाय इंटिग्रेशन :** AI मुळे कचरा कमी करण्यासाठी पुरवठा साखळी सुधारते, गुणवत्ता नियंत्रण सुधारते आणि अन्न उद्योगाच्या विविध क्षेत्रांमध्ये एकूण कार्यक्षमता वाढते.

**वैयक्तिकृत पोषण :** AI व्यक्तींच्या आरोग्याची उद्दिष्टे, प्राधान्ये आणि पोषणविषयक गरजांवर आधारित वैयक्तिकृत आहार योजना तयार करण्यात मदत करते.

**फूड सेफ्टी मॉनिटरींग :** AI सेन्सर्स आणि इतर स्रोतांकडील डेटाचे विश्लेषण करून अन्न दूषित होण्याचा शोध घेते आणि प्रतिबंधित करते.

**AI शाश्वत अन्न उत्पादन :** AI संसाधन वाटप ऑप्टिमाइझ करते, ऊर्जा वापर कमी करते आणि अन्न उत्पादनातील शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देते.

**फूड फ्रॉडची माहिती :** AI घटक सोर्सिंग, उत्पादन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनावरील डेटाचे विश्लेषण करून अन्न फसवणूक शोधते आणि प्रतिबंध करते.

**स्मार्ट पॅकेजिंग :** AI सक्षम पॅकेजिंग रियल-टाइममध्ये अन्न ताजेपणा, सुरक्षितता आणि गुणवत्तेचे निरीक्षण करते.

**रोबॉटिक्स आणि मशीन लर्निंग :** AI चलित रोबोट अन्न प्रकिया, पॅकेजिंग आणि तपासणी कार्ये अनुकूल करते. ■■




संस्कृती मसाले

संस्कृती महिला बचतगट, ओझर्डे, सातारा

# संस्कृतीकडून समृद्धीकडे

छोटी बचत, मोठी स्वप्ने

**प्राचीन काळापासून मसाल्याच्या पदार्थांसाठी प्रसिद्ध असलेल्या भारत देशात मसाल्यांचं वैविध्य दिसतं. विविध जातिसमूहांनी, समाजांनी, स्थलांतरितांनी ही परंपरा आणखीनच चविष्ट बनवली आहे. मन तृप्त करण्यास आणि एखादा पदार्थ पोटभर खाण्यास उद्युक्त करण्यासाठी पदार्थाला रंग, सुवास आणि चव बहाल करणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे मसाला होय. सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील ओझर्डे गावच्या महिलांनी तब्बल १७ प्रकारचे मानिनी ब्रॅण्डचे संस्कृती मसाले बाजारपेठेत आणले आहेत. मसाला निर्मितीतून सबलीकरणाकडे अशी वाटचाल संस्कृती महिला बचत गटाची सुरू आहे.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

सातारा जिल्ह्यातील वाई हे गाव अठराव्या व एकोणिसाव्या शतकामध्ये महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी होते त्याच्या खुणा आजही जागोजाग पहायला मिळतात. कृष्णेच्या तीरावर वसलेले वाई ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध आहे. एके काळी ते इथल्या वैशिष्ट्यपूर्ण घाटांसाठी आणि मंदिरांसाठीही प्रसिद्ध होते. याच वाईतील ओझर्डे हे एक गाव. ओझर्डे हे गाव सदनशील गाव आहे. येथील हवामानात खूप चांगली पिके उत्पादित करता येतात. पावसाळ्यात भरमसाठ पाऊस पडतो. हिवाळ्यात भरपूर थंडी असते. ओझर्डे या गावाच्या पश्चिमेकडून कृष्णा नदी पूर्वेकडे वाहत गेली असल्याने संपूर्ण गावातील जमिनी बागायती आहेत. येथील प्रमुख पीक म्हणजे ऊस, हळद, सोयाबीन, गहू, ज्वारी तसेच स्ट्रॉबेरी सुद्धा पिकवली जाते. याच गावातील संस्कृती महिला बचत गट आहे.

सुशिक्षित महिलांनी एकत्र येत २०१७ रोजी बचत गटाची स्थापना केली. प्रारंभी १०० रुपये बचत दर महिना केली जात होती. चौदाव्या वित्त आयोगातून गावात विविध प्रकारचे प्रशिक्षण देणारी कार्यशाळा पार पडली.यामध्ये मसाला निर्मितीबद्दल प्रशिक्षण देण्यात आले. घरगुती मसाले तयार करण्यात हातखंडा असलेल्या महिलांनी सर्व मसाले घरी तयार करून पाहिले. कुटुंबीयांनाही त्याची चव आवडली तेव्हा मसाला निर्मितीत बाजारपेठेत उतरावे हा विचार बचतगटाच्या सदस्यांनी केला. भांडवलसाठी प्रत्येकीने तीन हजार रुपये दिले. काही रुपयांचे कर्ज काढले.तज्ञांचे मार्गदर्शन घेतले. बाजारपेठेचा अभ्यास काही सदस्यांनी केला. जमलेल्या रक्कमेतून कच्चा माल,वजन काटा, मसाला ग्राइंडर खरेदी केले. सुरुवातीला प्रत्येक सदस्यांनी घरातच मसाले तयार केले आणि विक्री सुरू केली. पुढे अन्न परवाना व रितसर नोंदणीही केली. चवीमुळे मसाल्यांना प्रतिसाद मिळत होता पण मागणी मर्यादित होती. नातेवाईक, गावातील लोक, ओळखीच्या लोकांमध्ये मसाल्याबाबत चर्चा होत होती.

**वाणात दिले मसाले :** सुरुवातीला ओझर्डे गावामध्ये स्टॉल लावून संस्कृती महिला बचत गटाच्या महिलांनी मसाले विकले; परंतु पाहिजे तेवढी विक्री होत नव्हती. मग संक्रातीच्या सणाला संस्कृती बचत गटाने मोठ्या प्रमाणात हळदी-कुंकूचा कार्यक्रम आयोजित करून तेथे महिलांना वाणात वेगवेगळे मसाल्याचे पॅकेट वाटले



**आत्मविश्वास दुणावला**

मानिनी संस्कृती मसाल्याने बाजारपेठेत नाव मिळवले आहे. या माध्यमातून आम्हालाही नवी ओळख मिळाली आहे. केवळ चूल आणि मूल पुरते अस्तित्व असणाऱ्या आम्ही सामान्य महिला होतो; पण या उद्योगाने यशाचे पंख दिले. आत्मविश्वास दुणावला आहे. प्रत्येक महिलेने आपल्यातील सुप्त गुण ओळखून त्यांना विकसित करायला हवे सोबतच समूह ताकद असेल तर यश मिळवणे कठीण नाही.

**- मीना फरांदे, अध्यक्ष,**
संस्कृती महिला बचत गट

आणि येथून सुरू झाला मसाल्यांचा विक्रीचा प्रवास. वाणात दिलेल्या मसाल्यांची चव महिलांना आवडल्याने गावात मसाल्यांची मागणी वाढली.

**नफ्याच्या रक्कमने वाढवले भांडवल :** संस्कृती बचत गट पंचायत समितीला या उद्योजक महिलांनी जोडला, यामुळे बचत गटाची नोंदणी ऑनलाइन झाली. यामुळे जिथे जिथे सरकार तर्फे बचत गटाचे स्टॉल आयोजित केले गेले, तेथे तेथे या महिलांनी संस्कृती बचत गटाचा स्टॉल लावून मसाले विक्री सुरू केली. यामाध्यमातून कधी-कधी दिवसाला १० हजार रुपयांची सुद्धा मसाला विक्री व्हायची. व्यवसाय वृद्धीच्या हेतूने दिड वर्षात नफ्यांतून जमलेली सगळी रक्कम महिलांनी पुन्हा व्यवसायात गुंतविली.

**प्रदर्शनातून वाढली विक्री :** पहिल्यांदा लोणंद येथे बचतगटाने स्टॉल लावला.आपला माल कसा विकावा, कशी जाहिरात करावी यांचे जुजबी ज्ञान या ठिकाणी महिलांना मिळाले. दरवर्षी नायगाव येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित प्रदर्शनात गटात फेर् मसाला विक्री केली जाते. सातारा शहरातील मानिनी जत्रा, वाई आणि लोणंद मधील कृषी प्रदर्शन, पुणे शहरातील भिमथडी जत्रेमध्ये प्रदर्शन गटाचे असते. उमेदच्या माध्यमातून नेरुळ येथील महालक्ष्मी सरस प्रदर्शनात गटाच्या मसाल्यांना चांगली मागणी असते. नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रर्दशनासाठी आजीविका मेळाव्यातून निवड होऊन दिल्ली येथील महालक्ष्मी सरस प्रदर्शनात तब्बल एक लाखांची मसाला विक्री करण्याची संधी गटाला मिळाली. वर्षाकाठी ५०० किलोपर्यंत मसाल्यांची विक्री बचतगटामार्फत केली जाते.

**आकर्षक पॅकेजिंग :** बाजारपेठेतील इतर उत्पादित मसाल्यांची विक्री ही आकर्षक पॅकेजिनमध्ये होत होती ही बाब महिला जाणून होत्या. विक्री वाढायला लागल्या नंतर महिलांनी मसाल्यांचे पॅकेजिंग आकर्षक करण्याकडे भर दिला. बचतगटाच्या सदस्यांनी सुरुवातीला साध्या प्लास्टिकच्या पिशवीला स्टिकर लावून मसाला विक्री केला नंतर सिल्वर रंगाची पिशवी वापरली. पुढे प्लास्टिक बंदीने अनेक प्रश्न उभे केले. यावेळी कृषी विज्ञान केंद्र बोरगाव यांच्या मदतीने पर्यावरणपूरक पाऊचमध्ये मसाले विक्रीस आणले. सोबतच मार्केटिंग आणि पॅकेजिंगचे प्रशिक्षण घेतले. यासाठी महाराष्ट्र बँकेकडून १ लाख रुपयांच कर्ज घेतलं. संस्कृती मसाल्याचे आकर्षक पॅकेजिंग आणि ब्रँड तयार झाल्यानंतर या मसाल्यांची विक्री झपाट्याने वाढली. प्रत्येक मसालयाचे कव्हर वेगळे करण्यात आले. मुंबई येथील दोन डिस्ट्रीब्यूटर बचतगटास मिळाले, त्यामुळे नफा महिन्याला लाखो रुपयांपर्यंत पोहचला होतो.बचतगटाच्या या कार्याचा गौरव ग्रामविकास मंत्र्याच्याहस्ते ही करण्यात आला आहे.

**डिजिटल मार्केटिंगवर भर :** प्रदर्शनाशिवाय समूह माध्यमांचा वापर करत फेसबुक ॲमेझान, फिल्पकार्ड या ऑनलाइन व्यासपीठावरही संस्कृती मसालेनी जाहिरात दिली. पुढे जाऊन व्यवसाय वृद्धी करण्यासाठी गुगल ट्रेनिंग ही महिलांनी घेतले आहे.

**कांदा-लसूणची चटणीही विक्री :** १७ प्रकारचे चविष्ट असे मसाले ग्राहकांच्या पसंतीस उतरू लागल्याने मागणी वाढली. त्यानंतर महिलांनी परत महाराष्ट्र बँकेकडे १० लाख रुपयांच्या कर्जासाठी अर्ज केला. त्यापैकी त्यांनी साडेसात लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. कोरोना काळात मात्र लॉकडाऊन मुळे उद्योग करताना अनेक अडचणी वाढल्या. त्यामुळे या महिलांनी मसाल्याच्या सोबतीला हळद आणि कांदा-लसूणची चटणी विक्री देखील सुरू केली. आतापर्यंत या महिलांनी साडेसात लाखांपैकी जवळपास अर्धे कर्ज चुकते केले आहे. सीए नेमून व्यवसायांचे आर्थिक व्यवस्थापनही भक्कम केले आहे.

**वैविध्यपूर्ण मसाले :** संस्कृती मसाले १७ प्रकारात बाजारपेठेत उपलब्ध आहेत. मसाल्यांमध्ये गोडा मसाला, मटन आणि चिकन मसाला, मालवणी मसाला, बिरयाणी मसाला, पुलाव मसाला, अंडा करी मसाला, गरम मसाला, पाव भाजी मसाला, पनीर मसाला, सबजी मसाला, छोले मसाला, मिसळ मसाला, सांबार मसाला, काजू करी मसाला, काळा मसाला, अख्खा मसूर, यासारख्या मसाल्यांचा समावेश आहे. दहा ग्रॅम मसाला दहा रुपये, २५ ग्रॅम वीस रुपये, ५० ग्रॅम चाळीस रुपये, १०० ग्रॅम ऐंशी रुपये या दराने विक्री होते.

**संस्कृती बचत गटाचे सदस्य :** संस्कृती बचत गटाच्या अध्यक्ष मीना फरांदे, उपाध्यक्ष गौरी पिसाळ, सचिवपदी अंजली सुतार आहेत. सुनंदा अण्णासो फरांदे, उमा राजेंद्र निकम, निरुपमा विक्रमसिंह पिसाळ, सुनंदा अशोक फरांदे, सुरेखा संजय पिसाळ या सदस्य आहेत.

*(या लेखाच्या लेखिका उद्योजक मासिकामध्ये कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) म्हणून कार्यरत असून त्यांना मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा सतरा वर्षांचा अनुभव आहे.)*



मनुष्यबळ व्यवस्थापन

# दोन शब्द कौतुकाचे, परिणाम लाखमोलाचे

**कार्यक्षम, कार्यनिपुण कर्मचारी ही संस्थेची संपदा असते. वैभव असते. त्यांना उत्तम कामासाठी प्रेरणा, प्रोत्साहन मिळणे गरजेचे असते. संवेदनशील, गुणग्राही कार्य संस्कृती प्रत्येक कार्यस्थळी निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी 'कर्मचारी प्रशंसा दिवस' साजरा केला जातो. या निमित्ताने कर्मचाऱ्यांच्या अमूल्य योगदानाचे, वचनबद्धतेचे आणि संस्थेप्रतीच्या निष्ठेचे महत्त्व व गरज अधोरेखित करण्यात येते.**

**- जीवन मुळे**

'A person who feels appreciated wiò always do more than what is expected'

मनुष्यबळ व्यवस्थापनाच्या संदर्भात एक वाक्य कायम बोलले जाते, 'People don't leave companies, they leave bad bosses'. आजकाल कार्यक्षम, हुशार कर्मचाऱ्यांचे कंपन्या, कार्यक्षेत्र सोडून जाण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलेले दिसते. त्यासाठी 'वाढीव पॅकेज' हे जेवढे महत्त्वाचे कारण आहे. तेवढेच महत्त्वाचे कारण आहे, वरिष्ठांकडून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेला व कौशल्याला दाद न मिळणे, त्यांना योग्य तो आदर न मिळणे आणि/किंवा उत्तम कामाची योग्य वेळी योग्य ती दखल सर्वांसमक्ष न घेणे. कर्मचाऱ्यांना उत्तम कामासाठी वेळोवेळी प्रेरणा, प्रोत्साहन देणे हे वरिष्ठांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामगिरीत सुधारणा तर होतेच, शिवाय त्यांना वरिष्ठ, कंपनीबद्दल आपलेपणाची भावना निर्माण होते. असे कर्मचारी अधिक उत्पादन, सेवा देतात.

**कर्मचारी प्रशंसा दिन :** संवेदनशील, गुणग्राही कार्यसंस्कृती प्रत्येक कार्यस्थळी निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी 'कर्मचारी प्रशंसा दिवस Employee Appreciation Day' साजरा केला जातो. या निमित्ताने कर्माचाऱ्यांच्या अमूल्य योगदानाचे, वचनबद्धतेचे आणि संस्थेप्रतीच्या निष्ठेचे महत्त्व व गरज अधोरेखित करण्यात येते. कर्मचाऱ्यांना कामासाठी, स्वविकासासाठी अधिक पोषक वातावरण, संधीसाठी प्रयत्न केले जातात. मनमोकळेपणाने कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामाची स्तुती करणे, बढती, आर्थिक पुरस्कार आदी माध्यमातून संस्थेत उच्च, आदर्श कार्यसंस्कृतीला चालना देण्यात येते. कर्मचाऱ्यांचा 'फीडबॅक' याकामी उपयुक्त ठरतो.

**गरज आणि महत्त्व :** Abraham Maslow's pyramidal 'Hierarchy of Needs' (अमेरिकन मानसशास्त्रज्ञ अब्राहम मास्लो यांनी विकसित केलेली 'आवश्यकता अधिश्रेणी') या प्रेरक सिद्धांतावर आधारित मानवी अत्यावश्यक गरजांचे पांच-स्तरीय पिरॅमिड मॉडेल अभ्यासन्यायोग्य आहे. या पिरॅमिडमध्ये उच्चस्थानी 'सन्मान (आदर/गौरव/कौतुक/Esteem)' आणि सर्वोच्चस्थानी 'आत्म-वास्तविकता (Self-actualisation)' आहे. पदानुक्रमांचे इतर तीन निम्न-स्तर शारिरीक गरजा (Physiological or Basic), सुरक्षितता (Safety) आणि सामाजिक गरजा (Social) आहेत. माणसाला कोणत्या गोष्टीमुळे चांगले काम करण्याची प्रेरणा मिळू शकते याबद्दलचा हा सिद्धांत आहे. मानवाच्या आवश्यक गरजाची त्यांचे महत्त्व विचारात घेऊन ही 'चढती क्रमवारी' तयार झाली आहे. या गरजा अपूर्ण राहिल्यास व्यक्तीला ताण-तणाव जाणवू शकतो. त्याचा थेट परिणाम कार्यक्षमता, उत्पादकता घटण्यावर होऊ शकतो.

**शाबासकी देणारे हात :** आपल्या ज्ञानाचे, कौशल्याचे, उत्तम कामाचे कौतुक झाल्यावर माणसाला वाटणारे समाधान ही सर्वोच्च गरज असते, हेच या सिद्धांतातून सिद्ध होते. एखाद्या कर्मचाऱ्याला आपल्या कामाची, परिश्रमाची कार्यस्थळी वरिष्ठांकडून कदर व्हावी असं वाटणं, ही मानवसुलभ भावना आहे. या नैसर्गिक भावनेचा अनादर होणार नाही, यांची दक्षता व्यवस्थापनाने घेतली पाहिजे. त्यामुळे कर्मचारांचा उत्साह शतपटीने वाढतो. प्रतिष्ठा आणि आदर हे आत्म-सन्मानाचे बिंदू जोपासण्यासाठी व्यवस्थापनाने उचित कृती केली पाहिजे.

कौतुकाची गरज आणि महत्त्व माहीत असूनही अनेक वरिष्ठ व्यवस्थापक चांगल्या कामाचे कौतुक करताना विनाकारण हात आखडता घेतात. याबाबत वरिष्ठ पदावरील व्यक्तीने आपल्या मनाचा मोठेपणा दाखवून या कार्यपद्धतीपासून दूर राहिले पाहिजे.

उपाययोजना : कार्यक्षम, कार्यनिपुण कर्मचारी ही संस्थेची संपदा, पुंजी आणि वैभव असते. त्यांना उत्तम कामासाठी प्रेरणा, प्रोत्साहन मिळावे

म्हणून तातडीने काही उपाययोजना कराव्या लागतात. नमुन्यादाखल खाली काही उपाययोजना सुचवल्या आहेत. या यादीत गरजेनुसार भर घालणे शक्य आहे.

उत्तम सेवेचा समारंभपूर्वक सन्मान करा. समर्पणवृत्तीचा लिखित, मौखिक गौरव करा. कामाबाबत, निर्णय घेण्यासाठी आवश्यक तेवढे, मर्यादित स्वातंत्र्य द्या. त्यांच्या सर्जनशील विचारांचे, कृतीचे स्वागत करा. कार्यपोषक नव-कल्पनांना व्यासपीठ द्या. त्यावर बौद्धिक विचारमंथन घडवून आणा.

उत्साहवर्धक, क्रियाशीलता पोषक वातावरण निर्मितीसाठी पुढाकार घ्या. त्यासाठी कर्मचाऱ्यांच्या मागणीची वाट पाहू नका. त्यामुळे कर्मचारी अधिक ऊर्जा, उत्साहाने कार्यरत होतील. कर्मचाऱ्यांना योग्यवेळी त्यांच्या कार्याचे श्रेय द्या.शिकण्याची, अद्ययावत ज्ञान प्राप्त करण्याची संधी देणे. प्रशिक्षण देणे. कर्मचाऱ्यांच्या 'वर्क-लाईफ बॅलेन्स' विचार करून कार्यसंस्कृतीमध्ये अनुरूप बदल प्रस्तावित करा.

**चोख कामाची रोख पावती :** आपल्या चोख, उत्तम कामाची तत्परतेने पावती मिळावी अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी बाळगण्यात गैर काहीच नाही. वरिष्ठांनी स्वप्रेरणेने मनापासून केलेले कौतुक, प्रशंसा अधिक परिणामकारक आणि प्रभावी ठरते. त्यामुळे कार्यस्थळी 'प्रशंसा कार्यसंस्कृती' विकसित होईल. अशा कार्यसंस्कृतीतून निर्माण होणारा प्रतिसाद, उत्साह आणि आनंद अलौकिक आणि दूरगामी टिकणारा असेल. एक स्नेहशील, कार्यपोषक आणि शाश्वत विकासाचे वातावरण वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक जीवनाला बळकट करणारे असेल. हे सकारात्मक वातावरण इतरांनाही अधिक चांगले काम करण्यास प्रेरणा देईल. तुमचे कौतुकाचे फक्त 'दोन शब्द', सर्वांसाठी प्रोत्साहनपर 'लाखमोलाचे शब्द' सिद्ध होतात.

**समारोप :** मानवी जीवनात 'प्रशंसा' अतिशय महत्त्वाची भूमिका बाजावते. प्रशंसा अर्थात Appreciation ला Learning Appetiser (शिकण्याची भूक वाढवणारे, क्षुधावर्धक) असंही म्हणतात. कारण आपण केलेल्या कामाचे योग्य कौतुक, प्रशंसा झाल्यास माणसाला आणखी काम करांवसं वाटतं, अर्थात कामाची, शिकण्याची भूक वाढते.

कर्मचारी हा त्यांच्या कार्यरत संस्थेचा मौलिक राजदूत (ब्रँड अम्बॅसडर) असतो. स्वतःच्या विशेष कामाणे, वागण्याने, सर्जनशीलतेने तो आपला ब्रँड निर्माण करतो. आशा कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ आपल्या कंपनीत टिकवणे हे आजकाल व्यवस्थापणा समोरील फार मोठे आव्हान आहे. कारण उद्योग विश्वात कर्मचारी उलाढालीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु असे चांगले कर्मचारी केवळ वाढीव 'पॅकेज' साठी कंपनी सोडतात, हे म्हणणे अयोग्य आहे. यातील बहुतेक कर्मचारी वरिष्ठांच्या 'कोत्या', नकारात्मक, अपारदर्शक, पक्षपाती दृष्टीकोनामुळे आणि वागणूक मिळण्यामूळे नोकरी बदलतात. त्यांची संस्थेबद्दल तक्रार नसते, ते वरिष्ठांच्या किमान कौतुकापासूनही वंचित होतात. त्यासाठी आपल्या संस्थेत चांगल्या कामाला न्याय देण्यासाठी प्रशंसा दिनासारखे उपक्रम साजरे करा. चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर केलेला खर्च हा 'खर्च' नसून खऱ्या अर्थाने ती 'गुंतवणूक' असते. त्यांचे लाभ, परिणाम लाखमोलाचे असतात हे कायम लक्षात ठेवा. शुभेच्छा!

*(या लेखाच्या लेखकांनी लिहिलेली उद्योजकता, व्यवस्थापन यासह इतर विषयांवरील एकूण १० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. लेखक शासकीय तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आहेत. त्यांचा मो. क्र. ९८२३२३९३४० असून ई-मेल jeevanmuley@gmail.com आहे.)*

■■




*महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजी नगर येथे MITL AURIC पुरस्कृत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी श्री.शैलेश धाबेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक; MITL AURIC श्री.अतुल बनगिनवार, उद्योजक, अन्नप्रक्रिया उद्योग यांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी उद्योजक मासिक भेट देण्यात आले. याप्रसंगी मालमत्ता विभाग प्रमुख डॉ. अभिराम डबीर व श्रीमती भारती सोसे, कनिष्ठ प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर दिसत आहेत.*



सांस्कृतीक विविधतेतून रोजगार

# महाराष्ट्रातील खाद्य व कृषी पर्यटनातील संधी

**महाराष्ट्र हे वैविध्याने भरलेले आहे. निसर्गासह खाद्य पदार्थांमधील विविधता पर्यटकांना आकर्षित करत असते. ग्रामीण भागातील शेती, माती, संस्कृती, पारंपरिक सण, उत्सव, खेळ, बैलपोळा, बैलगाडी, लोककला, शेतीतील उत्पादने, फळे, पिके, पशुधन यांसह खाण्यापिण्याची, निवासाची सोय करून पर्यटकांना ग्रामीण संस्कृती, गावगाडा याची भुरळ पाडता येऊ शकते. शहरी भागात वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना काही काळ आनंदाचे, समाधानाचे क्षण या माध्यमातून अनुभवता येतात. कृषी पर्यटन व पाक पर्यटनाच्या याच माध्यमातून उद्योजक, अभ्यासक, शेतकरी यांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, सहज शक्य आहे. - निलाक्षी पवार**

महाराष्ट्र ही ऐतिहासिक स्थळे आणि निसर्गरम्य विपुल भूमी आहे; परंतु ती सांस्कृतिक विविधतांनीही समृद्ध आहे. स्वादिष्ट अन्नाची खरी सोन्याची खाणही आहे. राज्य हे कृषी पर्यटन आणि खाद्य पर्यटनासाठी एक सर्वोच्च गंतव्यस्थान आहे. कारण तेथील खाद्य हे तिथल्या गतिमान संस्कृतीचे आणि वैविध्यपूर्ण कृषी भूदृश्यांचे प्रतिबिंब आहे. या उद्योगातील वैविध्यपूर्ण संभावनांचा या भागामध्ये परीक्षण केला जाईल, ज्यामध्ये महाराष्ट्राच्या विशिष्ट चवींवर विशेष लक्ष दिले जाईल, त्याचा गौरवशाली कृषी इतिहास आणि विस्तारित खाद्य पर्यटन चळवळ आणि हालचालींवर तपशीलवार अभ्यास करेल. हा निबंध महाराष्ट्र, भारतातील कृषी पर्यटन आणि खाद्य पर्यटनाच्या वाढत्या संभावनांचा अभ्यास करतो. समृद्ध पाककलेचा वारसा, वैविध्यपूर्ण कृषी भूदृश्ये आणि सांस्कृतिक रीतिरिवाजांमुळे खऱ्याखुऱ्या खाद्यान्नाचा अनुभव आणि प्रादेशिक शेतीशी जवळचा संबंध शोधणाऱ्या प्रवाशांसाठी महाराष्ट्र हा सर्वोत्तम पर्याय आहे.

स्वयंपाकासंबंधी पर्यटन, ज्याला काहीवेळा खाद्य पर्यटन म्हणून संबोधले जाते, हा पर्यटन व्यवसायाचा वाढता उपसमूह आहे. यात पर्यटकांना भेट देण्याची ठिकाणे शोधत असतात जिथे ते प्रादेशिक पाककृतींचे नमुने घेऊ शकतात, स्थानिक पाककलेबद्दल जाणून घेऊ शकतात आणि स्थानिक जीवनशैलीत पूर्णपणे मग्न होऊ शकतात. आपल्या समृद्ध पाककलेच्या वारशामुळे महाराष्ट्र कृषी पर्यटन आणि खाद्य पर्यटन या दोन्हीसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देतो.

या निबंधात महाराष्ट्राच्या खाद्य संस्कृतीचे वैशिष्ट्य असलेल्या वेगळ्या चवींचा शोध घेण्यात आला आहे. मिठाई, मसाले, धान्ये, सीफूड आणि स्ट्रीट फूडच्या विविधतेने तयार केलेली राज्याची पाककृती ही चवीची आकर्षक टेपेस्ट्री कशी आहे यावर बोलते. राज्याचा समृद्ध पाककला वारसा पारंपरिक मसाले, तृणधान्ये आणि ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांसारख्या धान्यांच्या वापरातून दिसून येतो.

राज्याच्या पर्यटन क्षेत्राचा एक महत्त्वाचा पैलू असल्याचे मान्य करून महाराष्ट्राने पाक पर्यटनाच्या प्रगतीसाठी पुढाकार दाखविला आहे. राज्य सरकारच्या स्थानिक सरकार आणि व्यवसाय मालकांसोबतच्या सहभागाचे उद्दिष्ट राज्याच्या गॅस्ट्रोनॉमिक विविधतेवर प्रकाश टाकणारे वातावरण स्थापित करणे आहे. महाराष्ट्रातील पाककृती ही अनेक भिन्न प्रभावांसह अद्‌भुत आहे, ज्यामध्ये भरपूर चव, घटक आणि पद्धती आहेत.

**महाराष्ट्रातील खाद्य पर्यटनावर भर :** महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांमध्ये रुचकर आणि गोड पदार्थांचे एक स्वादिष्ट मिश्रण आहे. स्वादिष्ट पुरणपोळी, मिसळ पाव आणि वडा पावापासून ते स्वादिष्ट श्रीखंड, आमरस आणि पेढ्यांपर्यंत विविध टाळूंसाठी विविध प्रकारची मिठाई आणि चवदार पदार्थ राज्यात उपलब्ध आहेत.

**मसाले आणि मसाले :** पारंपरिक महाराष्ट्रीयन मसाल्यांचे मिश्रण, असा गोडा मसाला, जेवणाला एक विशिष्ट आणि स्वादिष्ट वळण देतात. आजकाल, नारळ, गूळ आणि तांबे हे इतर अनेकदा वापरले जाणारे पदार्थ आहेत जे चवीची खोली वाढवतात.

**धान्यांची विविधता :** महाराष्ट्र विविध प्रकारच्या धान्यांसाठी प्रसिद्ध आहे आणि पारंपरिक पाककृतींमध्ये ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांचा समावेश होतो. ही धान्ये राज्याच्या पाक संस्कृतीसाठी आवश्यक आहेत आणि आरोग्यदायी पर्याय देतात.

**समुद्री खाद्यपदार्थ :** महाराष्ट्राचे किनारी जिल्हे त्यांच्या समुद्री खाद्यपदार्थ पाककृतीसाठी प्रसिद्ध आहेत, ज्यात विविध प्रकारचे करी, तळलेले आणि अनोखे पदार्थ असतात. कोळंबी, खेकडे आणि बोंबील हे काही प्रकारचे शेलफिश आहेत जे सामान्यतः महाराष्ट्रीयन स्वयंपाकात वापरले जातात.

**रस्त्यावर मिळणारे खाद्य :** पदार्थांच्या शौकीनांना मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रातील इतर शहरांच्या गजबजलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट फूडच्या पर्यायांचा संपूर्ण इंद्रधनुष्य मिळेल. वडा पाव, पावभाजी, भेळ पुरी, आणि पाणीपुरी हे स्ट्रीट फूडच्या सर्वात जास्त आवडीचे पदार्थ आहेत.

प्रचलित मिष्ठान्न : महाराष्ट्रीयन मिष्ठान्न, जसे की सुप्रसिद्ध पुरणपोळी, एक आनंददायी पदार्थ आहे. चणाडाळीपासून बनवलेल्या आणि जायफळ आणि वेलचीच्या चवीनुसार बनवलेल्या या मिठाईचा वापर सुट्टीच्या दिवशी आणि इतर कार्यक्रमांमध्ये केला जातो.

**कृषी पर्यटन आणि कृषी विविधता :** महाराष्ट्राची चव त्याच्या समृद्ध शेतीमध्ये दृढपणे गुंतलेली आहे. राज्याचा वैविध्यपूर्ण भूगोल, जो हिरवागार किनाऱ्याच्या भागांपासून ते वाळवंटाच्या अंतर्भागापर्यंत आहे, विविध प्रकारची पिके, फळे आणि भाजीपाला उत्पादनाची तरतूद करतो. ही कृषी विविधता महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा पाया आहे, जिथे अभ्यागत स्थानिक उत्पादनांबद्दल जाणून घेऊ शकतात, शेतीच्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होऊ शकतात आणि ताजे जेवण खाऊ शकतात. महाराष्ट्र कृषी पर्यटनाची काही वैशिष्ट्ये येथे आहेत :

**नाशिक वाइन यार्ड्स :** नाशिक, महाराष्ट्राला 'भारताची वाईन कॅपिटल' म्हणून ओळखले जाते. वाइन मर्मज्ञ आणि अभ्यागतांना प्रदेशातील द्राक्षबागांकडे आकर्षित केले गेले आहे, जे लहरी टेकड्यांच्या लँडस्केपच्या विरुद्ध आहे. अभ्यागत वाइन यार्ड्सला फेरफटका मारू शकतात, वाइन बनवण्याच्या प्रक्रियेचे निरीक्षण करू शकतात आणि वाइन टेस्टिंग सत्रांमध्ये भाग घेऊ शकतात, ज्यामुळे अविस्मरणीय कृषी पर्यटन अनुभव मिळेल.

**फळबागा :** महाराष्ट्रातील फळबागा द्राक्षे, डाळिंब आणि संत्री यासारखी विविध प्रकारची फळे देतात. राज्यातील अनेक शेततळे पर्यटकांना स्वतःची फळे निवडण्याची परवानगी देतात, फळांच्या वाढीबद्दल जाणून घेतात आणि ग्रामीण भागात आराम करताना ताजी तोडलेली, पिकलेली फळे खातात.

**पालशेत गाव :** कृषी पर्यटनामध्ये एक झलक महाराष्ट्रातील पालशेत गाव हे राज्याच्या कृषी वारशाचा प्रसार करणारे कृषी पर्यटनाचे एक प्रमुख उदाहरण आहे. हा समुदाय हिरवाईने भरलेली भातशेती, निसर्गरम्य दृश्ये आणि मैत्रीपूर्ण रहिवाशांसाठी प्रसिद्ध आहे. पालशेत गावातील अभ्यागत तांदूळ लागवडीबद्दल जाणून घेऊ शकतात, पारंपरिक शेती उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतात आणि स्थानिक पातळीवर तयार केलेल्या पदार्थांनी बनवलेले खरे महाराष्ट्रीय जेवण खाऊ शकतात. पालशेतच्या कृषी पर्यटनातील सर्वात प्रमुख पैलूंपैकी एक म्हणजे अभ्यागतांना स्थानिक कुटुंबांसोबत राहण्याची, प्रदेशाच्या दैनंदिन जीवनात आणि संस्कृतीत मग्न होण्याची शक्यता आहे. हे पाहुण्यांना ग्रामीण महाराष्ट्राचा एक प्रकारचा, अस्सल अनुभव देते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेतही योगदान देते.

**आव्हाने आणि संधी :** महाराष्ट्रात कृषी पर्यटन आणि खाद्य पर्यटन अशा दोन्ही संधी उपलब्ध आहेत; परंतु अनेक समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे.

**पायाभूत सुविधांचा विकास :** स्वयंपाकासंबंधी पर्यटनाची क्षमता पूर्णतः साकार करण्यासाठी अधिक निवास, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.

**बाजारपेठेत प्रवेश :** पाक पर्यटनाद्वारे प्रादेशिक पाककृतींना प्रोत्साहन देऊन, विशिष्ट, प्रादेशिक पदार्थांची मागणी निर्माण होऊ शकते. शेतकरी आणि कारागीर यांना या संधींशी जोडणे आवश्यक आहे.

**गुणवत्ता नियंत्रण :** प्रादेशिक खाद्यपदार्थ आणि भाज्यांची सत्यता आणि गुणवत्ता टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. अभ्यागतांना प्रत्यक्ष अनुभव मिळेल



**मा.श्री.जलज शर्मा**
जिल्हाधिकारी, नाशिक

याची हमी देण्यासाठी नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे असणे महत्त्वाचे आहे.

**शाश्वतता :** खाद्य पर्यटन आणि कृषी पर्यटन यांच्या दीर्घकालीन व्यवहार्यतेची हमी देण्यासाठी, पर्यावरणपूरक प्रवास आणि शाश्वत शेती पद्धतींचा प्रचार करणे आवश्यक आहे.

प्रादेशिक प्रकल्प आणि उपलब्धी

**महाराष्ट्र फूड फेस्टिव्हल :** दरवर्षी होणाऱ्या महाराष्ट्र फूड फेस्टिव्हलद्वारे राज्याचा स्वयंपाकाचा वारसा दाखविण्याचे समर्पण दिसून येते. हा कार्यक्रम खाद्य उत्साही, आचारी आणि खाद्य व्यापारी यांना एकत्र आणून राज्यातील उत्कृष्ट गॅस्ट्रोनॉमिक विविधता प्रदर्शित करतो.

**रेस्टॉरंट्स थेट शेतातूनच अन्न देतात :** महाराष्ट्रातील अनेक भोजनालये फार्म-टू-टेबल चळवळीचा अवलंब करत आहेत, त्यांची उत्पादने जवळपासच्या शेतातून मिळवत आहेत. हे स्थानिक शेतकऱ्यांना मदत करते आणि ताजे, हंगामात आणि अस्सल अन्नाची हमी देते.

**पाककला वर्ग :** बरेच शेतकरी आणि रहिवासी स्वयंपाकाचे धडे देतात जेणेकरून अभ्यागतांना पारंपरिक महाराष्ट्रीयन पाककृती कशी बनवायची हे शिकता येईल. या व्यावहारिक अनुभवातून फूड टुरिझमला एक संवादात्मक घटक मिळतो.

**सारांश :** समृद्ध कृषी वारसा, वैविध्यपूर्ण पाक परंपरा आणि खाद्य आणि कृषी पर्यटन यावर भर दिला जाणारा महाराष्ट्र हा खाद्यप्रेमींसाठी आणि प्रवाशांसाठी एक आनंददायी प्रवास आहे. आर्थिक वाढीला प्रोत्साहन देण्यासोबतच, राज्याच्या कृषी पद्धती, स्थानिक खाद्यपदार्थ आणि खाद्यसंस्कृतीचे प्रदर्शन करण्यावर भर दिल्याने या प्रदेशाच्या विशिष्ट चवींचे जतन आणि ठळकीकरण होते.

महाराष्ट्राचा कृषी पर्यटन आणि स्वयंपाकासंबंधी पर्यटनावरचा वाढता भर अधोरेखित करून, त्याला खाद्यप्रेमी आणि पर्यटकांसाठी एक आकर्षक साहस म्हणून स्थान देऊन लेखाचा समारोप करण्यात आला आहे. गॅस्ट्रोनॉमिक आणि सांस्कृतिक अनुभव शोधत असलेल्या अभ्यागतांसाठी, राज्य त्याच्या विशिष्ट चव, समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविध कृषी पद्धतींमुळे एक स्वादिष्ट गंतव्यस्थान आहे. अस्सल आणि तल्लीन अनुभव शोधणाऱ्यांना महाराष्ट्राचे खाद्य, संस्कृती आणि चालीरीती शोधण्याची, साजरी करण्याची आणि त्याचा आस्वाद घेण्याची संधी आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात पाक पर्यटन आणि कृषी पर्यटन वाढत असल्याने उद्योजक, स्थानिक शेतकरी आणि अभ्यागतांना भरपूर संधी आहेत. विविध पाककृतींचे नमुने घेण्यासोबतच, या गॅस्ट्रोनॉमिक प्रवासाचा उद्देश राज्याच्या विविध पाककृती परंपरा, संस्कृती आणि कृषी रीतिरिवाजांच्या द्वारे ज्ञान देणे हा आहे. गॅस्ट्रोनॉमिक आणि सांस्कृतिक सहलीच्या शोधात असलेल्या लोकांसाठी महाराष्ट्र हे एक अतिशय रमणीय ठिकाण आहे, ज्याच्या फ्लेवर्स फक्त शोधण्यासाठी, आस्वाद घेण्यास आणि कौतुक करण्याची विनंती करतात.

*(या लेखाच्या लेखिका कार्यालयीन कार्यकारी, एमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई येथे कार्यरत असून त्यांचा भ्रमणध्वनी ९९३०९४०४९० आहे.)*



## गूळ बनवण्याचा प्रक्रिया उद्योग

# उसापासून गोल्डन ब्लॉक्सपर्यंत

**गूळ हा भारतीय स्वयंपाकघरातील महत्त्वाचा खाद्यपदार्थ होय. गुळास आयुर्वेदिक मोलही आहे. उसाच्या रसापासून गूळ बनविण्याच्या सगळ्या प्रक्रियेमध्ये एक श्रम केंद्रित हस्तकला आहे. आधुनिक तंत्रज्ञानासह पारंपरिक शहाणपणाची जोड या सगळ्या प्रक्रियेस देणे गरजेचे आहे.**

**- ऋषिकेश बारगजे**




**राहुल रेखावार**
जिल्हाधिकारी, कोल्हापूर


गूळ हा उसाच्या रसापासून बनविला जातो. हे सामान्यतः दक्षिण आशियाई आणि आफ्रिकन पाककृतींमध्ये गोड आणि चवीसाठी वापरले जाते. गुळाला सोनेरी-तपकिरी रंग समृद्ध, कॅरॅमलसारखी चव असते.

गूळ बनवण्याच्या प्रक्रियेत उसाचा रस काढला जातो, जो नंतर तो घट्ट होईपर्यंत उकळला जातो. रस सामान्यतः उकळण्याआधी अशुद्धता काढून टाकण्यासाठी फिल्टर केला जातो. एकदा द्रव एका विशिष्ट सुसंगततेवर पोहोचल्यानंतर, ते थंड आणि कडक होण्यासाठी मोल्डमध्ये ओतले जाते, परिणामी गुळाचे ठोके किंवा शंकू तयार होतात.गूळ त्याच्या पौष्टिक फायद्यांसाठी ओळखला जातो कारण तो ऊस काही नैसर्गिक खनिजे आणि जीवनसत्त्वे टिकवून ठेवतो. त्यात लोह, कॅल्शियम, फॉस्फरस आणि इतर महत्त्वपूर्ण खनिजे असतात. परिष्कृत साखरेच्या तुलनेत, गूळ हा एक आरोग्यदायी पर्याय मानला जातो; कारण त्यावर कमी प्रक्रिया केली जाते आणि त्यामध्ये केमिकल्सचा वापर केला जातो.

पाककृतींमध्ये, गूळ वेगवेगळ्या स्वरूपात वापरला जातो, ज्यामध्ये किसलेले, चूर्ण केलेले किंवा घनदाट ब्लॉक्स म्हणून वापर केला जातो. हे मिठाई आणि पारंपरिक पदार्थांमध्ये त्याच्या वेगळ्या चवीसाठी वापरला जातो. गूळ काही पेयांमध्ये देखील वापरला जातो, जसे की मसालेदार चहा आणि हर्बल मिश्रण.

त्याच्या स्वयंपाकासंबंधी वापराव्यतिरिक्त, गूळ कधीकधी आयुर्वेदिक औषधांमध्ये आणि त्याच्या संभाव्य आरोग्य फायद्यांसाठी पारंपरिक उपायांमध्ये वापरला जातो. असे मानले जाते की ते पचनास मदत करते, ऊर्जा पातळी वाढवते आणि खोकला आणि सर्दीपासून आराम देते. तथापि, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की हे दावे पारंपरिक पद्धतींवर आधारित आहेत आणि त्यांचे समर्थन करण्यासाठी भक्कम वैज्ञानिक पुरावे नाहीत.

### गुळामधील पोषक घटकांचे प्रमाण

| पोषक | रचना (प्रति १०० ग्रॅम) |
|---|---|
| ऊर्जा | ३८३ किलोकॅलरीज |
| कर्बोदके | ९८ ग्रॅम |
| साखर | ६५ ग्रॅम |
| प्रथिने | ०.४ ग्रॅम |
| चरबी | ०.१ ग्रॅम |
| कॅल्शियम | ४० मिग्रॅ |
| मॅग्नेशियम | ७० मिग्रॅ |
| फॉस्फरस | २० मिग्रॅ |
| पोटॅशियम | ६०० मिग्रॅ |

### गूळ तयार करण्याची प्रक्रिया

**उसाची निवड आणि काढणी :** गुळाचा प्रवास उसाची काळजीपूर्वक निवड आणि तोडणीपासून सुरू होतो. शेतकरी कच्चा माल निवडताना विविधता, परिपक्वता आणि गुणवत्ता या घटकांचा विचार करतात. कापणीचा आदर्श वेळ ऊस किंवा रसाच्या गोडपणाद्वारे निर्धारित केला जातो आणि तो अनेकदा साखरेचे प्रमाण त्याच्या शिखरावर असतानाच्या कालावधीशी जुळतो.

**रस काढणे :** ऊस किंवा खजूर कापणी झाल्यावर रस काढण्याची प्रक्रिया सुरू होते. पारंपरिकपणे, यामध्ये देठ ठेचणे आणि दाबून रस काढला जातो. आधुनिक पद्धतींमध्ये जास्तीत जास्त रस काढण्यासाठी मशीनचा वापर केला जातो. वापरलेल्या पद्धतीची पर्वा न करता, नैसर्गिक शर्करा

समृद्ध रस प्राप्त करणे हे ध्येय आहे.

**रसाचे शुद्धीकरण :** काढलेल्या रसाती अशुद्धता आणि घन कण काढून टाकण्यासाठी, स्पष्टीकरणाची प्रक्रिया आवश्यक आहे. आधुनिक पद्धतींमध्ये, स्पष्ट आणि स्वच्छ रस मिळविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या गाळण्याच्या पद्धतीचा वापर केला जातो.

**रस घट्ट करणे :** स्पष्ट केलेला रस, आता अशुद्धतेपासून मुक्त आहे, यामध्ये पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी रस मोठ्या, पॅनमध्ये उकळला जातो व पाण्याचे प्रमाण कमी केले जाते. हे करताना तो जळू नये म्हणून व प्रक्रियेदरम्यान रसाचे काळजीपूर्वक निरीक्षण केले जाते आणि ढवळले जाते. एकाग्रता स्टेजमुळे रसाचे हळूहळू जाड, चिकट सिरपमध्ये रूपांतर होते.

**सिरप चाचणी आणि सुसंगतता :** सिरप एकाग्रतेच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर पोहोचत असताना, त्याची घनता आणि साखर एकाग्रतेचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे. पारंपरिक तंत्रांमध्ये मॅन्युअल चाचण्या आणि व्हिज्युअल संकेतांचा समावेश होतो, जसे की थ्रेडची सुसंगतता तपासणे किंवा जेव्हा सिरप थंड पाण्यात टाकला जातो तेव्हा मऊ गोळे तयार होतात. आधुनिक पद्धतींमध्ये साखरेची पातळी अचूकपणे मोजण्यासाठी हायड्रोमीटर आणि रिफ्रॅक्टोमीटर सारखी उपकरणे वापरली जातात.

**ओतणे आणि थंड करणे :** एकदा इच्छित सुसंगतता प्राप्त झाल्यानंतर, एकवटलेले सिरप मोल्ड किंवा कंटेनरमध्ये ओतले जाते. पारंपरिक साच्यांमध्ये मातीची भांडी, लाकडी चौकटी आणि ताडाची पाने यांचा समावेश होतो, तर आधुनिक साचे बहुतेकदा धातूचे किंवा ट्रेचे बनलेले असतात. ओतलेले सरबत नैसर्गिकरीत्या थंड होण्यासाठी सोडले जाते, ज्यामुळे ते घट्ट होऊ शकते आणि गुळाच्या ब्लॉक किंवा शंकूचा इच्छित आकार धारण करू शकते.

**वाळवणे आणि घट्ट करणे :** ओतल्यानंतर, गूळ सुकण्याच्या आणि घनतेच्या टप्प्यातून जातो. पारंपरिकपणे, गूळ उन्हात वाळवला जातो. आधुनिक पद्धतींमध्ये, सतत कोरडे करण्याची प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी नियंत्रित कोरडे वातावरण किंवा ओव्हनचा वापर केला जातो. आर्द्रता आणि तापमान यासारख्या घटकांवर अवलंबून कोरडे होण्याचा कालावधी बदलू शकतो.

**पॅकेजिंग आणि स्टोरेज :** गुळाचे ठोके किंवा शंकू कडक आणि घट्ट झाल्यावर ते व्यावसायिक वितरणासाठी पॅकेज केले जातात. ओलावा शोषण टाळण्यासाठी काळजी घेतली जाते, ज्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता आणि त्याला दीर्घकाळ टिकण्यासाठी मदत होते. वाहतूक आणि साठवणुकीदरम्यान गुळाची अखंडता राखण्यासाठी अत्याधिक उष्णता किंवा आर्द्रतेपासून संरक्षणासह योग्य साठवणूक पद्धती महत्त्वाच्या आहेत.

**सांस्कृतिक महत्त्व आणि पाककृती वापर :** जगभरातील विविध प्रदेशांमध्ये गुळाचे सांस्कृतिक महत्त्व आहे. हे पारंपारिक पाककृती आणि उत्सव साजरे यांचा अविभाज्य भाग आहे. मिष्टान्न आणि शीतपेये गोड करण्यापासून ते चवदार पदार्थ वाढवण्यापर्यंत, गूळ स्वयंपाकाच्या निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान देतो. वेगवेगळ्या पाककृतींमध्ये गुळाची अष्टपैलूता त्याची सांस्कृतिक प्रासंगिकता आणि स्थानिक पाक परंपरांची कलात्मकता दर्शवते.

**निष्कर्ष :** गूळ बनवण्याची प्रक्रिया ही एक श्रम-केंद्रित हस्तकला आहे जी आधुनिक तंत्रांसह पारंपारिक शहाणपणाची जोड गरजेची आहे. ऊस किंवा खजुराच्या निवडीपासून ते कापणीपासून ते अंतिम उत्पादनाचे ओतणे, थंड करणे आणि पॅकेजिंग करण्यापर्यंत, आपल्याला गूळ म्हणून ओळखले जाणारे सोनेरी ठोकळे किंवा शंकू तयार करण्यासाठी प्रत्येक पायरी महत्त्वपूर्ण आहे. या प्राचीन स्वीटनरमागील प्रक्रिया समजून घेऊन आणि त्याचे कौतुक केल्याने, आपणास गुळाचे सांस्कृतिक महत्त्व आणि ही परंपरा जतन करणाऱ्या कारागिरांशी सखोल संबंध जोडता येईल.

*(या लेखाचे लेखक या क्षेत्रातील तज्ज्ञ असून हा लेख लिहिण्यासाठी त्यांना डॉ. भानुदास पाटील, डॉ. राजेश क्षीरसागर, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे कार्यरत असून त्यांचा भ्रमणध्वनी ९४२३४६९८७० आहे.)* ■■




*उद्योजक मासिकाच्या माहे जून २०२४ विशेष अंकाचे प्रकाशन श्री. बी. टी. यशवंते, उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून श्री. किरण जाधव उद्योग उपसंचालक छत्रपती संभाजीनगर, श्री. संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक तथा उद्योजक मासिक विभाग प्रमुख व श्री. विवेक तोंडरे, समन्वय विभाग प्रमुख दिसत आहेत.*



यशोगाथा :

## रामदास सोनटक्के, आर्ट ऑफ ड्रायव्हिंग

# वाहन चालक ते ड्रायव्हिंग स्कूलचा मालक

**बेंबळी जिल्हा धाराशिव येथील रामदास सोनटक्के यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांच्या वडिलांचा स्वर्गवास झाला. आईने जिद्दीने पाच भावंडांचा सांभाळ केला. पाच भावंडांपैकी दोघे वारले. एकामागून एक संकटे आली. त्यातून मार्ग काढत वाहन चालविण्याचे प्रशिक्षण घेतले. यातूनच त्यांनी आर्ट ऑफ ड्रायव्हिंग स्कूलच्या नावे संस्था काढली. वाहन चालक ते ड्रायव्हिंग स्कूलचा मालक पर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे.**

**डॉ. उमेश कणकवलीकर**

माझे नाव श्री. रामदास सुमन विश्‍वनाथ सोनटक्के. माझा जन्म १ जुलै, १९८० रोजी बेंबळी, धाराशिव येथे झाला. माझ्या घरची आर्थिक परिस्थिती बिकट होती. त्यात आम्ही एकूण पाच भावंडं. वडील व्यसनाधीन आणि बेरोजगार होते. मी दहावीत असताना ते स्वर्गवासी झाले. माझे दोन भाऊ वारले आणि तिसरा बेपत्ता आहे. माझी आई मला आणि माझ्या बहिणीला घेऊन मुंबईला आली. त्या वेळेस माझी आत्येबहीण, बेबी सरवदे हिने आम्हाला आधार दिला. ती सरकारी इस्पितळात नोकरीला होती. माझ्या आईच्या जिद्दीचे आणि धैर्याचे गोडवे गावे तेवढे कमीच आहेत कारण एका मागोमाग एक असे दुःखाचे डोंगर सर करून ती आम्हाला आधार देत होती. तिने बेलापूर, नवी मुंबई येथे दहा बाय दहाची खोली भाड्याने घेतली. रस्त्यावर भाजी विक्री करून आमचा उदरनिर्वाह चालू होता. शिक्षणापेक्षा आम्हा तिघांचे जगणे महत्त्वाचे झाले होते, म्हणून मी स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा निर्णय घेतला. माझे बालपण मी कधी जगलोच नाही.

मी पानाची एक छोटीशी टपरी सुरू केली. पान-सिगारेट विकणे हे मनाला रुचले नाही, म्हणून मी सातशे रुपयांची नोकरी करू लागलो. माझा भाऊ स्व. बालाजी याने मला कार चालवायला शिकवली होती. एकदा गाडी शिकताना माझ्याकडून गंभीर स्वरूपाची तांत्रिक चूक झाली. माझ्या भावाने माझी चांगलीच कानउघडणी केली. त्यानेही मला माफ केले आणि त्याच रात्री मी ड्रायव्हिंगमध्ये तरबेज झालो. माझे ड्रायव्हिंग लायसन्स जीवन जगण्यासाठी आणि जीवनात जिंकण्यासाठी माझ्यासाठी पासपोर्ट ठरले. मी अरुप सेन यांच्याकडे वाहन चालक म्हणून नोकरी करू लागलो. मला आठ हजार रुपये पगार मिळू लागला. त्या पगारात मी संतुष्ट होतो.

शिक्षण कमी, ऊंची कमी, गरिबीचा शाप, कोणाची मदत नाही, आईची त्रेधातिरपिट, भविष्याची चिंता यामुळे माझ्यात न्यूनगंड निर्माण झाला होता. मला लहानपणापासून वाचनाची, संगीताची आणि इलेक्ट्रिकल वस्तू दुरुस्त करण्याची आवड होती. मालकाला कामाच्या ठिकाणी सोडल्यावर माझ्याकडे भरपूर रिकामा वेळ असायचा. फावल्या वेळात मी माझ्या आवडीला खत-पाणी पुरवत गेलो. मी प्रा. मधुकर दिघे यांचे 'अंतर्मनाचा गाभारा' हे पुस्तक अनेकदा वाचले. एका लग्नात एकाला बुलबुल वाजवताना पाहिले आणि मी बुलबुल वाजवू लागलो. हळूहळू की-बोर्ड वाजवायला लागलो. मी रद्दीच्या दुकानातून बिघडलेले टेपरेकॉर्डर नाममात्र दरात विकत घेऊन रिपेअरिंग करायला लागलो. वाचन, संगीत आणि टेपरेकॉर्डर रिपेअरिंग या छंदांमुळे मी आनंदी जीवन जगू लागलो.

दरम्यानच्या काळात पल्लवी हिच्यासोबत माझा विवाह झाला. ती एक प्रेमळ आणि सुजाण गृहिणी आहे. आमचे दोघांचे शिक्षण कमी होते, ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली होती. मला नोकरी आणि माझे छंद यामुळे वेळ पुरत नव्हता आणि मला शिक्षणाची तशी विशेष गोडी नव्हती. पल्लवीला शिक्षणाची आवड असल्यामुळे मी तिला पुढील शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित केले. आज ती पदवीधर आहे याचा मला अभिमान आहे. जीवनाला नवीन दिशा देण्याचा आमचा शोध सुरूच होता. दरम्यानच्या काळात मी हार्मोनियम आणि तबला या दोन

वाद्यांच्या सरावासाठी क्लास सुरू केला. मला संगीत क्षेत्रात श्री. मोहम्मद पटेल आणि रेहाना राणे हे गुरू म्हणून लाभले. लवकरच मला संगीत विशारद ही अनमोल पदवी प्राप्त होईल. मला संगीतकार व्हायची इच्छा आहे. पल्लवी सुद्धा कथ्थक शिकत आहे. लवकरच तिलादेखील नृत्य विशारद पदवी प्राप्त होणार आहे. प्रिशासुद्धा कथ्थकचे धडे घेत आहे. आम्ही या छंदाचे रूपांतर शिकवणीत केले. त्यामुळे आम्हा दोघांना आनंद आणि अर्थप्राप्ती होत आहे.

वाचनाच्या आवडीमुळे माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली. मी नोकरी सोडून उद्योजकतेचा ध्यास घेतला. मला कार ड्रायव्हिंग शिकवायला आवडते. माझ्या या छंदाचे रूपांतर उद्योगात करण्याची प्रेरणा मला सरांमुळे मिळाली. आमच्याच क्लासमधील सौ. सोनाली भगत यांनी माझ्यावर विश्वास टाकून मला त्यांना कार ड्रायव्हिंग शिकवण्याची संधी दिली. मी वाजवी मानधन घेऊन माझ्या पहिल्याच विद्यार्थिनीला गाडी चालवायला शिकवण्यात यशस्वी झालो. डॉ. राजेश कणकवलीकर यांच्या 'आर्ट ऑफ विनिंग!' या ब्रँड नावामुळे प्रेरित होऊन मी 'आर्ट ऑफ ड्रायव्हिंग! नावाची संस्था सुरू केली. एकाचे दोन, दोनाचे चार करता करता आता माझ्या विद्यार्थ्यांचा आकडा हजारावर पोहोचला आहे. इतर मोटर ड्रायव्हिंग स्कूलची आणि माझी मोटर ड्रायव्हिंग शिकवण्याची पद्धत अगदी वेगळी आणि वाजवी आहे. मी माझ्या विद्यार्थ्यांना त्यांच्याच गाडीवर ड्रायव्हिंग शिकवतो. त्यांची गाडी, त्यांचे इंधन, त्यांचा वेळ, त्यांचे श्रम आणि माझे अचूक मार्गदर्शन हे समिकरण ग्राहकांना आवडू लागले. इतरांपेक्षा मी पैसेही कमी घेतो कारण ड्रायव्हिंग करणे आणि शिकवणे ही माझी आवड आहे. आर्ट ऑफ ड्रायव्हिंगच्या माध्यमातून मी दररोज पाच ते सहा विद्यार्थ्यांना गाडी चालवायला शिकवतो. मला पंचवीस वर्षांचा ड्रायव्हिंगचा अनुभव आहे. मी डोअरस्टेप सर्विस पुरवतो. मला कसलेच व्यसन नाही. सतत कामात मग्न राहणे, हेच माझे व्यसन आहे.

कणकवलीकर सरांच्या प्रशिक्षणातून आणि पुस्तकांतून संवाद कौशल्य, समुपदेशन, देहबोली, वेळेचे व्यवस्थापन, प्रभावी नियोजन, स्मरणशक्ती, मानवी स्नेहसंबंध, संभाषण कौशल्य असे एकापेक्षा एक चांगले विषय शिकल्यामुळे मी माझ्या कार्यात विजेता झालो आहे. आपण आपल्या उत्पन्नाचे विविध मार्ग शोधले पाहिजेत, हे 'मी श्रीमंत होणारच!' आणि 'मी यशस्वी उद्योजक होणारच!' या पुस्तकांमधून मला शिकता आले. मी संमोहन तज्ज्ञ स्व. श्री. मनोहर नाईक यांच्याकडून प्रशिक्षण घेतले, त्याचाही मला फायदा होत आहे. मी श्री. रवी बोकसे यांच्याकडून शेअर बाजाराचे धडे घेतले. कोरोना काळात त्यांचा मृत्यू झाला. त्यांना श्रद्धांजली म्हणून मी शेअर बाजाराचे क्लासेस सुरू केले आहेत. शेरखान यांची फ्रेंचायझी घेतली आहे. आमच्या गुरुवर्यांसोबत संगीताच्या आणि नृत्याच्या क्लासेसच्या शाखा विस्तारित करण्याच्या प्रयत्नात मला यशप्राप्ती होत आहे. सध्या नवी मुंबई, वाशी आणि कुर्ला येथे आमच्या उद्योगाच्या शाखा सुरू केल्या आहेत. आज स्वतःच्या हिमतीवर नवी मुंबईसारख्या ठिकाणी स्वतःचे घर घेणे, गाडी घेणे मला शक्य झाले. शिवरायांच्या गड-किल्ल्यांचे दर्शन घेण्याचे माझे स्वप्न होते. अलीकडे मी गिर्यारोहण आणि पर्यटन क्षेत्राकडे वळलो आहे. नुकताच मी भीमाशंकरचा ट्रेक पूर्ण केला. मला मोटर सायकलने भ्रमंती करायला आवडते. कार तर मी रोजच चालवतो. त्यामुळे कारचे आकर्षण कमी झाले आहे.

आज आम्ही आमच्या आईसोबत सुखाचे आणि समाधानाचे जीवन जगत आहोत. मला तरुण पिढीला सांगावेसे वाटते की, आपल्या आवडीचे काम करा म्हणजे कामाचा कंटाळा आणि थकवा येणार नाही. आपल्या छंदाचे रूपांतर उद्योगात करा. वाचनकला समृद्ध करा. वाचनसंस्कृतीचा वारसा निश्चितच आपल्याला यशोशिखराकडे घेऊन जातो, याचे मी स्वतःच एक उदाहरण आहे. नोकरी करून गुलामी पत्करण्यापेक्षा छोटा-मोठा व्यवसाय करून, स्वतःचे साम्राज्य उभे करून त्याचा राजा होणे कधीही उचित ठरेल. माझ्याकडे पन्नासपेक्षा जास्त टेपरेकॉर्डर्स आणि कॅसेट्स आहेत. आता टेपरेकॉर्डर नामशेष झालेले आहेत, म्हणून माझ्याकडील टेपरेकॉर्डरची लायब्ररी सुरू करून ते भाड्याने देण्याचा मानस आहे.

उत्तम व्यवहारे आणली आहे, हिच शिकवण आचारणात आणली आहे.

*(या मुलाखतीचे शब्दांकन करणाऱ्या लेखकाची २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच त्यांनी आजवर मी विजेता होणारच! या कार्यक्रमाचे ३५०० हून अधिक प्रयोग सादर केले आहेत. आर्ट ऑफ विनिंग नावाने ते प्रशिक्षण देतात. ते नामांकित कंपन्यांचे प्रशिक्षक आहेत. त्यांनी सामाजिक बांधीलकीतून पुणे येथे शिष्यकुल या संस्थेची उभारणी केली आहे. त्यांचा e-mail : nishamissionvijeta@yahoo.com असून त्यांचे भ्रमणध्वनी ९८२०२९२०७२ / ९०२९३७३१११ आहेत.)*

■ ■

### माणसं विविध स्वभावांची!

जगात विविध, विचित्र स्वभावाची माणसं दिसून येतात. कित्येक वेळा सहवासात येतात. कुणाच्या कल्पनेतून निर्माण होतात कोण जाणे. याचा कल्पक कारागीर कोण आहे. कारण एक दुसऱ्यासारखा दिसत नाही, असत नाही. याचे उत्तर आजपर्यंत कोणालाच सापडले नाही.





यशोगाथा

## विक्रम येरमाळकर

# असामान्य प्रेरणादायी प्रवास!

**उच्च शिक्षण घेतल्यानंतर लागलेली सरकारी नोकरी सोडून नावीन्याच्या ध्यासाने विक्रम येरमाळकर यांनी व्यवसाय करण्यासाठी पाऊल उचलले. सुरुवातीच्या काळात आलेले अपयश पचवत मोठ्या हिमतीने कंपन्यांना वीज पुरवठा करणारी खाजगी कंपनी येरमाळकर यांनी सुरू केली. याद्वारे ग्राहकांनाही सुविधा, समाधान मिळाल्याशिवाय त्यांची आर्थिक बचतही होत आहे. या व्यवसायातून अनेकांना रोजगार मिळाले आहेत, त्यातही महिलांना प्राधान्यक्रमाने रोजगार त्यांच्या कंपनीत दिला जातो. - सुधीर साबळे**

छत्रपती संभाजीनगरच्या असणाऱ्या विक्रम येरमाळकर या तरुणाने इंजिनीयरिंगची पदवी घेतल्यानंतर चांगली नोकरी मिळायची आणि सेट व्हायचे, असे ध्येय डोळ्यासमोर ठेवले होते. विक्रमला पहिलीच नोकरी मिळाली ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ज्युनिअर इंजिनीयर म्हणून... आता सरकारी नोकरी म्हणजे सुखाची नोकरी असा अनेकांचा समज, वेळेवर होणारा पगार, तिथे मिळणाऱ्या सुविधा याचा सगळ्यांनाच हेवा वाटतो... सरकारी नोकरी असली म्हणजे मान-सन्मान आणि सुखाचे दिवस अनुभवता येणे सहजशक्य असते, असे अनेकांना वाटते. सरकारी नोकरीमध्ये चिकटल्यानंतर काहीजणांना फार थोड्या कालावधीत त्याचा कंटाळा येतो आणि ती मंडळी दुसऱ्या वाटा शोधू लागतात. विक्रमच्या बाबतीत देखील असेच काहीसे झाले. इथे काम करताना त्याला अनेक कडू-गोड अनुभव आले. त्यामुळे 'आपण चुकीच्या क्षेत्रात आलो आहोत काय?' असे त्यांना कायम वाटत राहायचे. सर्वसामान्य लोक, उद्योग यांना भेडसावणाऱ्या अडचणी आपण सोडवू शकत नाही याची खंत त्यांना कायम मनाला डाचत राहायची. त्यामुळे विजेच्या समस्यांनी त्रस्त असणाऱ्या मंडळींना मदत करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. आपण वीज वितरणाच्या क्षेत्रात काहीतरी वेगळे करावे. या उद्देशातून त्यांनी नव्या संधीचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या डोक्यात घोळणाऱ्या या विचाराला नशिबाची साथ मिळाली आणि त्यामुळेच तीन वर्षांपूर्वी त्यांनी वीज वितरण क्षेत्रात काम करणाऱ्या इरो पॉवर या कंपनीची मुहूर्तमेढ रोवली, त्याला आज चांगले यश मिळताना दिसत आहे.

**व्यवसायाचे बाळकडू लहानपणापासूनच :** विक्रम यांनी पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण छत्रपती संभाजीनगरमधल्या सरस्वती भुवन प्रशालेमधून पूर्ण केले. आजोबा पेशाने इंजिनीयर त्यामुळे आपण देखील त्यामध्येच करियर करायचे हे विक्रमने शाळेमध्येच असताना पक्के केले होते. विक्रमच्या वडीलांचा एक छोटेखानी व्यवसाय होता, ते इंडस्ट्रीसाठी आवश्यक असणारे रॉ मटेरियल आयात करायचे. छत्रपती संभाजीनगरमधल्या औरंगपुरा भागात त्यांचा व्यवसाय होता. विक्रम यांच्या घरापासून देवगिरी कॉलेज हे हाकेच्या अंतरावर होते, त्यामुळे तिथे जाणाऱ्या मुलांची भूक पूर्ण व्हावी, म्हणून विक्रमच्या आईने घरातल्या एका जागेत छोटेखानी कँटीन सुरू केले होते. विक्रमचे आई-वडील हे दोघेजण सुरुवातीपासून व्यवसायात होते, त्यामुळे उदयोग काय असतो, तो कसा करतात, याची माहिती लहान असतानाच झाली होती. दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर देवगिरी कॉलेजमध्ये शास्त्र (विज्ञान) शाखा निवडून त्यामध्ये अकरावी-बारावी पूर्ण करण्याचा निर्णय त्याने घेतला होता. शालेय शिक्षण सुरू असताना आपल्या डोक्यात असणाऱ्या कल्पनांना प्रत्यक्षात उतरवत छोटे-मोठे प्रोजेक्ट करण्याचा छंद विक्रमला होता. वर्ष असेल १९९५-९६. तेव्हा कॉम्प्युटर नवीन आला होता. त्याची किंमत देखील खिशाला परवडणारी नव्हती. त्यामुळे तुलनेने कॉम्प्युटरची संख्या कमी होती. आपल्या मुलाला टेक्निकल गोष्टींमध्ये विशेष स्वारस्य आहे, त्यामुळे त्याला योग्य वयात कॉम्प्युटरची ओळख झाली तर भविष्य काळात त्याचा त्याला नक्कीच फायदा होईल, असा विचार

करून विक्रमचे वडील मुकुंद येरमाळकर यांनी ३० ते ३५ हजार रुपये खर्चून मुंबईमधून एक कॉम्प्युटर खरेदी केला. घरात कॉम्प्युटर आल्यानंतर दिवसभर कॉलेज, अभ्यास आणि संगणक असे विक्रमचे वेळापत्रक होऊन बसले. अकरावी-बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर छत्रपती संभाजीनगरमधल्या गव्हर्नमेंट इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये त्याने प्रवेश घेतला. अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण सुरू असताना विक्रम आणि त्याचा भाऊ रोहितने 'आपल्या घरातील वीज एका बॉक्समधून चालवण्याचा एक प्रोजेक्ट तयार केला. अनोखे तंत्रज्ञान वापरून हा सगळा उदयोग करण्यात आला होता. या अनोख्या प्रोजेक्टची सगळीकडे चांगली स्तुती झाली, विशेष म्हणजे कॉलेजमध्ये त्याबद्दल विशेष गौरव करून पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली. आपण केलेल्या या छोटेखानी प्रकल्पाचे सर्वत्र कौतुक झाल्यामुळे विक्रमामधला आत्मविश्वास वाढत गेला.

**अन् नोकरी मिळाली :** इंजिनीयरिंगचे शिक्षण पूर्ण होतानाच कॉलेजमध्ये कॅम्पस सिलेक्शन सुरू होते. अनेक कंपन्या आपल्यासाठी आवश्यक असणारे उमेदवार शोधण्यासाठी इथे आले होते. तेव्हा, पहिल्यांदा तू नोकरी कर, त्यामधून योग्य तो अनुभव घे, त्यानंतर पुढे काय करायचे ते ठरव, हा आजोबांनी दिलेला सल्ला विक्रम यांना तेव्हा आठवला. दरम्यान, विक्रमच्या वडिलांना व्यवसायात ८५ ते ९० लाख रुपयांचे नुकसान झाले होते, त्यामध्ये वडिलांना गाडी, शोरूम विकावे लागले होते. त्यामुळे एक उदहारण समोर असताना आपण व्यवसाय करण्याचे धाडस करणे कदाचित आपल्यासाठी धोकादायक ठरू शकते, त्यामुळे विक्रमने व्यवसाय करण्याचा विचारच डोक्यातून पूर्णपणे काढून टाकला. कॅम्पसमधून त्याला महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळात ज्युनिअर इंजिनीयर म्हणून नोकरी मिळाली.

आपल्या मुलाला सरकारी नोकरी मिळाली, म्हणून घरातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. पहिलेच पोस्टिंग त्याला मिळाले ते आष्टीमधे जालना जिल्ह्यातील परतूरमध्ये हे ठिकाण. तिथे सबस्टेशन इंजिनीयर म्हणून नियुक्ती झाली. त्याच्या हाताखाली ३५ जणांचा स्टाफ होता. ग्रामीण भागातला विजेचा प्रश्न हा खूपच गंभीर होता. तेव्हा लोडशेडिंग सुरू असायचे त्यामुळे या भागातील उदयोग, नागरिक यांची एमएसईबीच्या नावाने कायम ओरड सुरू असायची, त्यांचे प्रश्न सोडवता सोडवता नाकी नऊ यायची.

ग्रामीण भागात लोकांच्या विजेच्या अडचणी खूप आहेत, अनेकांना कोणत्या ना कोणत्या कारणामुळे त्यापासून वंचित राहावे लागते, या सगळ्या गोष्टींनी विक्रमच्या मनात घर केले होते. त्यामुळे याच क्षेत्रात आपण काहीतरी वेगळे करावे, असा विचार विक्रमच्या मनात आला होता. दरम्यान, २००५ मध्ये टोरंट कंपनीने वीज वितरण क्षेत्रासाठी एक टीम फॉर्म केली होती. ती टीम भिवंडी भागातील सर्वेक्षण करणार होती. या भागात पॉवर लूम इंडस्ट्री आहे. २० वर्षासाठी या कंपनीला वीज पुरवठा करण्याचा ठेका देण्याचे निश्चित करण्यात आले होते, अशी माहिती मिळताच आपल्याला इथे काम करण्याची चांगली संधी आहे, असा विचार करून विक्रमने प्रयत्न सुरू केले. त्यांच्या या निर्णयानंतर विक्रमला कोअर टीममध्ये स्थान मिळाले. भिवंडीमध्ये ज्या ठिकाणी वीज पुरवठा करण्याचे कंत्राट त्या कंपनीला मिळाले होते, त्या ठिकाणी जाऊन सर्वेक्षण करणे, विजेची गळती कोणत्या भागात आहे, याचा शोध घेण्याचे काम सुरू झाले. विक्रम त्यामध्ये सहभागी झाला होता. त्या ठिकाणी सर्वेक्षण करताना लोक अंगावर धावून येत असत, काही म्हणणे ऐकून न घेता तिथून हाकलून लावत असत. त्यांचा विजेच्या खासगीकरणाला विरोध होता; पण त्यावेळी संयमाने भूमिका घेत, त्यांना त्याचे फायदे काय आहेत, त्यामुळे आर्थिक बचत कशी होणार आहे, हे पटवून देण्याचे अवघड काम विक्रम करायचा. हे करताना त्याला येणाऱ्या अनुभवातून त्याला सामाजिक जाणीवा उमगत गेल्या होत्या. या भागातील ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यासाठी जे काही शक्य आहे, ते करण्यासाठी विक्रमची अहोरात्र धडपड सुरू होती. विजेच्या वितरणात होणारा नवा बदल जर तुम्ही स्वीकारला तर भविष्य काळात तुमची चार पैशांची बचत होईलच पण त्या खेरीज तुम्हाला उत्तम दर्जाची सेवा या खासगीकरणाच्या माध्यमातून मिळू शकते, हे पटवून देण्यास विक्रम विसरला नाही. सरकारी नोकरी सोडून टोरंट सारख्या मोठ्या ठिकाणी काम करताना विक्रमला खूप काही शिकायला मिळाले, त्यामुळे आपण खासगी क्षेत्रातच काम करायचे त्याने मनाशी पक्के केले होते.

टोरंटमध्ये अनुभव घेतल्यानंतर आपल्याला नवीन कोणती संधी मिळू शकते का, याचा शोध घेत असताना त्याला क्रॉम्प्टन ग्रीव्हसमध्ये नोकरी मिळाली, तिथे देखील वीज निर्मिती, पुरवठा याची जबाबदारी त्याच्याकडे सोपवण्यात आली होती. त्या कंपनीमध्ये त्यांची पत्नी वंदना या कमर्शियल विभागाच्या प्रमुख म्हणून तर विक्रम हे टेक्निकल विभागाचे प्रमुख म्हणून काम करत होते. हे सारे करताना वेळीच आपण सरकारी नोकरीमधून बाहेर पडल्यामुळे आपल्याला जे ज्ञान मिळवणे आवश्यक होते, ते सहजपणे मिळवता आले, नवे अनुभव घेता आला अशी भावना त्याच्या मनात निर्माण झाली होती.

**वीज कायद्यात झाला बदल :** केंद्र सरकारने २०१०मध्ये वीज कायद्यात बदल केला होता. नव्या कायद्यानुसार स्पेशल इकॉनॉमिक झोन, आयटी पार्क यांना आवश्यक असणारी वीज पुरवण्याचे काम खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या करू शकणार होत्या, त्यामुळे या क्षेत्रात प्रगती करण्याची संधी आपल्यासमोर असल्याचे विक्रमला दिसले होते, त्यामुळे आपल्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधीच त्याच्यासाठी खुली झाली होती. एका खासगी कंपनीला परवाना

मिळवून देण्यासाठी अर्ज केला; पण केंद्र सरकरने कायद्याची घोषणा केली असली तरी सरकारी बाबू मंडळींना त्याची फार काही माहिती नव्हती, त्यामुळे हा परवाना मिळवण्यासाठी विक्रम सरकारी कार्यालयांचे उंबरे झिजवत होता; पण त्याच्या प्रयत्नाना काही यश मिळत नव्हते, त्यामुळे हा परवाना मिळवण्यासाठी विद्युत नियामक आयोग, अशा अनेक यंत्रणांच्या विरोधात उभे राहावे लागले. कर्मचारी युनियनच्या विरोधात रस्त्यावर उतरून लढा द्यावा लागला. या सगळ्याला यश मिळाले ते तब्बल सात वर्षांनी. २०१० मध्ये परवाना मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाला परवाना मिळण्यास २०१७ साल उजाडले. एका व्यावसायिकाला हा परवाना विक्रम यांनी मिळवून दिला होता.

**नोकरीला रामराम आणि कंपनी सुरू :** आपण स्वतःची कंपनी सुरू करतो असा आत्मविश्वास आल्यानंतर एका क्षणाचा विलंब न करता विक्रम आणि त्याची पत्नी वंदना हिने कंपनी सुरू केली. आतापर्यंत नोकरी करताना साठवलेली पुंजी आपल्या कंपनीमध्ये लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सुमारे ४० लाख रुपयांची रक्कम टाकून त्यांनी आपली स्वतःची कंपनी सुरू केली.

**सुरुवातीला अपयश आले :** २०१९ ची वर्ष अखेर सुरू झाली होती. जगभरात कोरोनाची चर्चा सुरू झाली होती. तेव्हा आपण कंपनी सुरू करून फसलो आहोत अशी भावना त्याच्या मनात घर करू लागली होती. नोकरी सोडण्याच्या आपला निर्णय हा पथ्यावर पडला कि काय असे त्याला वाटू लागले होते.

मार्च २०२० मध्ये विक्रम प्रसिद्ध व्यावसायिक अतुल चोरडिया यांना जाऊन भेटला. त्यांना खासगी कंपनीच्या माध्यमातून वीज पुरवठा केला तर तो सेझ आणि आयटी पार्क यांना कसा फायदेशीर ठरू शकतो, याचे प्रेझेंटेशन दिले. त्यांनी त्याचे स्वागत केले. दरम्यान, तेव्हाच कोरोना वाढला आणि देशभर लॉकडाऊन लागला. त्यामुळे सगळे ठप्प झाले आणि खराडीमधल्या ज्या आयटी पार्कमध्ये हा प्रोजेक्ट करायचे निश्चित केले होते, ते काम होल्डवर गेले. त्याच वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे ठरवण्यात आले होते. आयटी पार्कमधला नवा प्रोजेक्ट उद्या सुरू होणार, त्याच्या आदल्या दिवशी ३१ ऑक्टोबर रोजी महावितरणचे अधिकारी त्या आयटी पार्कच्या गेटवर धाड टाकण्यासाठी आले होते. त्या पथकामध्ये २५ पेक्षा अधिक अधिकाऱ्यांचा समावेश होता. त्यांना पाहिल्यानंतर विक्रमच्या टीमचे मनोधैर्य खचले. आता काय होणार, प्रोजेक्ट सुरू होणार नाही, अशी भीतीची छाया तिथे असणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होती; पण विक्रमने हार न मानता आपण सगळे कायद्याच्या चौकटीमध्ये राहून करत आहोत, त्याचा आयटी कंपन्यांना फायदाच होणार आहे, हे त्या अधिकाऱ्यांना पटवून देण्याचा कठीण टास्क पूर्ण केला. पाच तासांच्या अथक कष्टानंतर ते अधिकारी शांत झाले आणि विक्रमची कंपनी अनधिकृतपणे काही करत आहे का, याचा शोध घेण्यासाठी आलेल्या त्या अधिकाऱ्यांना काही न आढळल्यामुळे आल्या पावली परत फिरावे लागले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे एक नोव्हेंबर रोजी हा प्रोजेक्ट सुरू झाला.

**काम सुरू आणि ग्राहक खूश :** आयटी पार्कमधल्या कंपन्यांना वीज पुरवठा करण्याच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा देण्याचे नियोजन विक्रम यांनी केले. पहिल्या दिवशी १२ ग्राहकांनी कंपनीकडे वीज देण्याच्या बाबत नोंदणी केली. इरो पॉवरशी जोडले गेलेले ग्राहक पहिल्या दिवसापासून कंपनीच्या कामावर खूप खूश होते. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी विक्रमने लगेचच ग्राहक सेवा केंद्र सुरू केले, त्यामध्ये कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. आयटी पार्कमधल्या या प्रोजेक्टमुळे विक्रमची व्यवसायाची गाडी रुळावर येऊ लागली होती. मार्च २०२१ मध्ये त्याच ठिकाणी असणाऱ्या दुसऱ्या फेजमध्ये वीज पुरवठा करण्याचे काम सुरू झाले. पहिल्याच दिवशी त्याच्याकडे वीजेसाठी ४८ ग्राहकांनी नोंदणी केली. इरो पॉवरच्या सेवे बद्दल त्यांनी ऐकले होते, त्यामुळे त्या कंपन्यानी डोळे झाकून आपली विजेची गरज पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे नोंदणी केली होती. विक्रमने त्यांना कंपनीची कार्यपद्धती समजावून सांगितली, खासगी कंपनीकडून होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे पहिल्या दिवसापासून या कंपन्यांची विजेमध्ये २५ ते ३० टक्के बचत होणार होती. पहिल्याच बिलामध्ये ते त्यांना दिसले.

खासगी कंपनीच्या माध्यमातून विजेचा पुरवठा करण्यास सुरुवात केल्यानंतर सुरुवातीला हरित ऊर्जेचा वापर करण्याचे प्रमाण विक्रम यांनी आठ ते नऊ टक्क्यांपर्यंत ठेवले होते. तीन वर्षांमध्ये हे प्रमाण ४० टक्क्यापर्यंत जाऊन पोहचले आहे. इरो पॉवरकडून ज्या कंपन्यांना विजेचा पुरवठा करण्यात येतो त्या सगळ्या कंपन्या या युरोप, ऑस्ट्रेलिया या भागातील आहेत. विक्रमने आपल्या कंपनीमध्ये महिलांना प्राधान्य दिले आहे. कंपनीच्या स्टाफमध्ये ६० टक्के महिलांना प्राधान्य दिले. विशेष म्हणजे या सर्व महिला या ग्रामीण भागातील शिक्षण घेतलेल्या आहेत, त्यांना सक्षम करण्यासाठी त्याने हा निर्णय घेतला आहे.

आपल्याला ग्राहकांसाठी काहीतरी करायचे आहे, त्यांच्यासाठी हा व्यवसाय उभा करायचा आहे, हे ध्येय पक्के केले. व्यवसाय उभा करताना घरातील मंडळींनी दिलेला पाठींबा, पत्नीचे सहकार्य आणि भावाचे पाठबळ यामुळे त्यांचा हा व्यवसाय आकाराला येऊ शकला. आपल्या ध्येयपूर्तीसाठी कोणतीही तडजोड न करणाऱ्या विक्रमने मिळवलेले यश हे नव्या पिढीच्या तरुणांना दिशा देणारे ठरेल हे नक्की...

*(या लेखाचे लेखक वरिष्ठ पत्रकार असून विविध नियतकालिकांसाठी विविध विषयांवर लिखाण करीत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९४२१०८००७२ असा आहे.)* ■■



### केंद्राच्या योजनेतून पायाभूत सुविधांचा विकास

# नवे आयाम, नवे दृष्टीकोन

**पीएम गतीशक्ती योजनेचे सात इंजिन आहेत. ज्यात रस्ते, विमानतळ, सार्वजनिक वाहतूक, हवाई व्यवस्था, लॉजिस्टिक, पायाभूत सुविधा, रेल्वे बंदर, जलमार्ग यांचा आधुनिक व सर्वांगपूर्ण विकास अपेक्षित आहे. शासनाच्या विविध योजना व धोरणात येत्या काळात भारत स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करणार असे सकारात्मक चित्र सध्या दिसत आहे.**

**- डॉ. अभिराम विजया सुरेश डबीर**

१३ ऑक्टोबर २०२१ रोजी नवी दिल्लीतून प्रारंभ झालेल्या पीएम गतीशक्ती योजनेचा बृहत आराखडा हा विकसित भारताच्या या आत्मशक्तीला, आत्मविश्वासातल्या आत्मनिर्भरतेच्या संकल्पापर्यंत घेऊन जाणारा गतीशक्तीयुक्त मार्ग आहे. हा राष्ट्रीय बृहत आराखडा २१ व्या शतकातील भारताला नवीन भारताच्या पायाभूत सुविधांच्या गरजांसाठी गतीशक्ती देईल. नव्या पिढीच्या पायाभूत सुविधा आणि मल्टीमॉडेल कनेक्टिव्हिटीला या राष्ट्रीय आराखड्यामुळे गतीशक्ती मिळेल. पायाभूत सुविधांशी संबंधित सरकारी धोरणांमध्ये नियोजन ते अंमलबजावणीपर्यंत १०० लाख कोटी निधींची तरतूद असणारा पीएम गतीशक्ती बृहत आराखडा असून, यामध्ये २४ मंत्रालयांचा समावेश करण्यात आला आहे. सरकारचे प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी हा आराखडा योग्य माहिती आणि अचूक मार्गदर्शन करेल.

**व्याप्ती - पीएम गतीशक्ती योजनेचे सात इंजिन - प्रगतीपथ**

- रस्ते, विमानतळ, सार्वजनिक वाहतूक, हवाई व्यवस्था (अंतर्गत), लॉजिस्टिक पायाभूत सुविधा, रेल्वे बंदर, जलमार्ग यांचा आधुनिक व सर्वांगपूर्ण विकास यामध्ये अपेक्षित आहे.

- आज देशाच्या २२ वेगवेगळ्या शहरांमध्ये सुमारे ९०० कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गिका सुरू आहेत. भारतातील मेट्रोजाळे हे जगातील तिसरे सर्वात मोठे नेटवर्क बनले आहे. पुढील काही वर्षात भारत अमेरिकेच्या मेट्रो जाळ्याच्या लांबीला मागे टाकून जगातील दुसरे सर्वात मोठे मेट्रोजाळे बनेल, अशी शक्यता आहे.

- १६९ भारतातील शहरांमध्ये 'पीपीपी' (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) मॉडेलवर १०,००० ई-बसेस धावू लागण्याची योजना आहे.

- आज देशातील राष्ट्रीय महामार्गाचे जाळे अंदाजे १,४६,१४५ कि.मी. पर्यंत वाढले आहे. अतीजलद कॉरिडॉरसह ४ मार्गिका आणि राष्ट्रीय महामार्ग जाळ्याची लांबी अंदाजे ४६,१७९ कि.मी. आहे. 'एक्स्प्रेस'वे सह २१ ग्रीन फिल्ड प्रवेश नियंत्रित कॉरिडॉरवर ३३३६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

- भारतीय रेल्वे मिशन १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यामुळे ते जगातील सर्वात मोठे हरित जाळे (Green notwork corridor) बनले आहे. भारतीय रेल्वेने २०२२-२३ वर्षी १५१२ मेट्रिक टन मालवाहतूक केली आहे. ही वाढ मागील वर्षापेक्षा ६.६३ टक्के अधिक आहे. पीएम गतीशक्ती नेटवर्क योजना गटाने ३ ऑगस्ट २०२८ रोजी महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांची तपासणी आणि शिफारस केली आहे.

- जगातील सर्वात लांब रिव्हर क्रुझ (नदी सफर बोट) गंगाविलास भारतात रिव्हर क्रुझ पर्यटनाला चालना देत आहे. आज त्याची संख्या २२७ कॉल्स आणि प्रवासी संख्या ५ लाखांपर्यंत पोहोचली आहे. ही वाढ मागील वर्षाच्या तुलनेत २२३ टक्के व ४६१ टक्के वाढ कॉल्स व प्रवासी संख्या याबाबतीत अनुक्रमे दर्शविते.

- जल वाहतुकीत १८ टक्के पटीने वाढ व रिव्हर क्रुझ पर्यटन परिचालनामध्येदेखील १८० टक्के वाढ हे जल पर्यटनाला मिळणारा वाढता भरघोस प्रतिसाद व या क्षेत्रातील उद्यमशीलतेला चालना देणारी बाब आहे.

- गेल्या दशकात सागरमाला प्रकल्पाने किनारी व क्रुझ पर्यटन आणि द्विपसमूहाच्या विकासाला चालना देण्यासाठी कोट्यधी रुपयांचे ११ प्रकल्प पूर्ण केले. यामध्येच असणारा गंगा व इतर महत्त्वपूर्ण नद्यांची

गाळ उपसा, सफाई अभियान स्वच्छता, पाणी प्रदूषणमुक्त करणे हे निरंतर चालणारे सातत्यपूर्ण कार्य आहे आणि लोकशिक्षण व प्रभावी पण समाजजागृतीची जोड देऊन लोकसहभागाने त्याची व पर्यावरणची सुरक्षा करणे हाच त्यावर प्रभावी उपाय आहे.

- भारत हा २०३० वर्षापर्यंत सागरी भारत संकल्पना अंतर्गत आशिया प्रशांत क्षेत्रात प्रमुख क्रुझ केंद्र स्थापित करून क्रुझ प्रवाशांची संख्या ५ लाखांवरून १८ लाख करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठरविले आहे.

- हवाई उड्डाण योजनेचा १३० लाखांहून अधिक लोकांनी लाभ घेतला आहे. आतापर्यंत ५१७ प्रादेशिक कनेक्टिव्हिटी मार्गापैकी ७६ विमानतळांना जोडण्यासाठी परिचालन सुरू असून, यामध्ये ९ हेलिपोर्ट व २ वॉटर एरोड्रोमचा समावेश आहे.

- विमानतळांच्या विकासासाठी ४५०० कोटी रुपयांची तरतूद असून, त्यापैकी ३७५१ कोटी रुपये वापरण्यात आले आहेत.

- स्मार्ट सिटी बनवण्यासाठी निवडक १०० शहरांमध्ये १.७१ लाख कोटी रुपयांपैकी १.६१ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

### पीएम गतीशक्ती प्रकल्पाची सहा बलस्थाने

१) व्यापकता - यामध्ये एका केंद्रीकृत पोर्टलमध्ये विविध मंत्रालये आणि विभागांच्या सर्व विद्यमान आणि नियोजित उपक्रमांचा तपशील समाविष्ट आहे.

२) प्राथमिकता - याद्वारे विविध विभाग विविध क्षेत्रांशी संबंधित परस्पर व्यवहारांच्या माध्यमातून आपापल्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यास सक्षम आहोत.

३) जास्तीत जास्त वापर - हा राष्ट्रीय बृहत आराखडा यातील महत्त्वपूर्ण त्रुटींवर वेळोवेळी त्या ओळखून, अभ्यासून त्यानंतर विविध प्रकल्पांची योजना आखण्यात विविध सामील २४ मंत्रालयांना मदत करीत आहे.

४) सामंजस्य - पी.एम. गतीशक्ती प्रत्येक विभागात उपक्रमांतर्गत शासन व्यवस्थेच्या विविध संस्थांमध्ये समन्वय सुनिश्चित करून त्यांच्यात समग्र सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत आहे.

५) विश्लेषणात्मक कार्यवाही : हा बृहत आराखडा जीआयएसवर आधारित स्थानिक नियोजन आणि अनेक विश्लेषणात्मक उपकरणांच्या माध्यमातून (१४००) जास्त स्तर असलेल्या एकाच ठिकाणी संपूर्ण डेटा (विदा) प्रदान करीत आहे.

६) गतीशीलता : सर्व मंत्रालये आणि विभाग आता जीआयएस मंचाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांशी संबंधित प्रकल्पांच्या प्रगतीची कल्पना, आढावा आणि त्याचे निरीक्षण करण्यात सक्षम होत आहेत.

बदलत्या विकसित भारतामध्ये योगदान : उद्यमशीलतेला प्रचंड वाव पीएम गतीशक्ती बृहत आराखडा आता सुनिश्चित करत आहे की २१ व्या शतकातील भारत पायाभूत प्रकल्पांध्ये समन्वयाच्या अभावामुळे आर्थिक नुकसान सोसणार नाही आणि वेळ वाया घालवणार नाही.

- पीएम गतीशक्ती राष्ट्रीय बृहत आराखडा अंतर्गत रस्ते पासून रेल्वेपर्यंत, विमान वाहतूकपासून कृषीपर्यंत विविध मंत्रालये, विभागांना याच्याशी जोडले जात आहे.

- प्रत्येक मोठ्या प्रकल्पाला, प्रत्येक विभागला, अचूक, योग्य माहिती वेळेवर माहिती मिळाली यासाठी 'तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म'देखील तयार केले आहे.

एका अभ्यासानुसार भारतात लॉजिस्टिक खर्च जीडीपीच्या जवळपास १३ टक्के आहे. जगातील मोठमोठ्या देशांमध्ये अशी आज परिस्थिती नाही. यावरून भारताच्या लॉजिस्टिक विकास घोडदौडीचा आवाका लक्षात येतो.

- पीएम गतीशक्ती राष्ट्रीय बृहत आराखडा देशाच्या धोरण आखणीशी संबंधित सर्व सहभागी यंत्रणा, गुंतवणूकदारांना एक विश्लेषणात्मक आणि निर्णयक्षम साधनेदेखील प्रदान करीत आहे. यामुळे सरकारला प्रभावी नियोजन आणि धोरण आखणीत मदत मिळत असून, सरकारचा अनावश्यक खर्च नाचण्यास मदत होत असून, उद्योजकांनादेखील त्यांच्या उद्यमशील प्रकल्पांसाठी कोणत्याही प्रकल्पांशी संबंधित माहिती मिळणे शक्य झाले आहे.

### ब) पीएम विश्वकर्मा योजना

जो सतत विश्वाची रचना किंवा त्याच्याशी संबंधित निर्माण कार्य करतो, त्याला 'विश्वकर्मा' म्हणतात. हजारो वर्षांपासून जे सहकारी कारागीर भारताच्या समृद्धीच्या मुळाशी राहिले आहेत, ते आपले 'विश्वकर्माच' आहेत. आज नव विकसित भारताची गरज आहे ती या विश्वकर्मा बांधवांना खरी ओळख देण्याची त्यांना पाठबळ कौशल्या उत्थानाचे व आर्थिक पाठबळ देण्याची या योजनेची सुरुवात १७ सप्टेंबर २०२३ रोजी नवी दिल्लीतून शुभारंभ करून झाली. या योजनेत १८ वेगवेगळ्या प्रकारची कामे करणाऱ्या विश्वकर्मा सहकाऱ्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या योजनेवर केंद्र सरकार १३ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. ही योजना विश्वकर्मा सहकाऱ्यांना विकसित भारताच्या आधुनिक युगात घेऊन जाण्याचा आणि त्यांचे सामर्थ्य वाढवण्याचा प्रयत्न आहे. या योजनेअंतर्गत १८ पारंपरिक विश्वकर्मा - सुतार, नौकाबांधणी करणारे, शस्त्रास्त्रे बनवणारे लोहार, हातोडी, अवजारे बनवणारे, कुलूप बनवणारे, सोनार, कुंभार, मूर्तीकार, दगड फोडणारे, चांभार, गवंडी, टोपल्या / चटया / केरसुणी/ झाडू बनवणारे, काथ्या, विणकर, बाहुल्या - खेळणी इ. (पारंपरिक) वस्तू बनवणारे, न्हावी, माळा, धागे बनविणारे, धोबी, शिंपी, मच्छिमारीची जाळी बनवणारे इ. समाविष्ट आहेत. देशात पारंपरिक शिल्प कला उद्योगाला जिवंत ठेवण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत हस्तशिल्पी आणि कारागीरांना सामाजिक व आर्थिक साहाय्य दिले जात आहे. या योजनेत २२.८० लाख कारागीर आणि हस्तशिल्पीचे नामांकन करण्यात आले आहे. १६२३३ लाभार्थ्यांचे तीन स्तरावर पडताळणी करून नोंदणी करण्यात आली आहे. या योजनेला मूर्त रूप देण्यासाठी केंद्र शासनाने १३ हजार कोटी रुपयांची २०२३-२४ ते २०२६-२८ पर्यंत आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

### उद्यमशील भारतामध्ये योगदान

- कौशल्य उत्थान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पारंपरिक शिल्पकला पुनरुज्जीवीत करण्यात सहाय्य करण्यासाठी दोन हप्त्यात ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जात आहे.

- ही योजना एक 'सांस्कृतिक सूत्र' म्हणून विविध शिल्पकला व्यवसायांशी संबंधित लोकांना दोन स्तरांवर जोडण्याचे काम करीत आहे. त्यामुळे विविध कला-कौशल्याशी संबंधित लोकांना एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. त्यामुळे प्रादेशिक असमतोल कमी करण्यात मदत होणार आहे.

- कारागीरांना सक्षम बनविण्याबरोबरच त्यांचा विकास आदी समृद्धीसाठी त्यांच्या कलेचे संवर्धन केले जात आहे.

- पीएम विश्वकर्मा योजना भौगोलिक आणि सांस्कृतिक शिल्पकलांच्या गर्दीत हरवलेल्या आणि आपली स्वतःचीच ओळख विसरत चाललेल्या कारागीरांना राष्ट्रीय मान्यता देऊन राष्ट्रीय स्तरावर त्यांना एका धागण्यात गुंफण्याचा व त्यांना स्वतःची ओळख करून देण्याचा निश्चयी दृष्टिकोन आहे.

- केंद्र सरकार दलित, महिला, आदिवासी, वंचित धारकांना स्वयंरोजगारासाठी अनेक योजना घेऊन आले अहे. मा. पंतप्रधान यांनी २०१६ रोजी 'स्टँडअप इंडिया' चा शुभारंभ करताना देशातील सर्व बँकांना आवाहन केले होते की, प्रत्येक शाखेतून तरुण, दलित, आदिवासी, स्त्री यांच्यापैकी दोघांना कर्ज दिले जाते.

- एस.सी. एस.टी. आणि महिलांसाठी उद्यमशीलता वाढविण्यात 'स्टँडअप इंडिया' कार्यक्रम मदत करीत आहे. यांच्यात उद्यमशीलता वाढविण्याचा दृष्टिकोन हे एक पाऊल आहे.

शेवटच्या पायरीवर असलेली व्यक्ती, आपल्या परिश्रम, बुद्धी आणि क्षमतेच्या बळावर कर्जाची सुविधा व योग्य उद्योजकता प्रशिक्षणाची जोड देऊन, उद्योजकतेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाद्वारे संस्कार देऊन नोकरी मागणाऱ्याऐवजी नोकरी तयार करणारा नवउद्योजक - नवउद्यमी बनत आहे. हे देशाच्या अर्थकारण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे द्योतक आहे.

- पीएम विश्वकर्मा योजनेची सुरुवात झाल्यावर राष्ट्रीय पातळीवरून महाराष्ट्राचे सर्वप्रथम कारागीरांची क्षमता वृद्धींगत करण्यासाठी उद्योजकता प्रशिक्षण कार्यशाळा / प्रशिक्षणाचे आयोजन राष्ट्रीय स्तरावर (उस्ताद) मास्टर ट्रेनर्सच्या मार्गदर्शनाद्वारे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र एमसीईडी मुख्यालय छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे पुढाकार घेऊन आयोजित करण्यात आले होते. हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

- जागतिक कौशल्य मॅपिंगसाठी भारताचा प्रस्ताव नुकताच जी-२० शिखर संमेलनामध्ये स्वीकारण्यात आला. यामुळे येणाऱ्या काळात तरुणांसाठी उत्तम संधी निर्माण होतील आणि भारताच्या याच आत्मशक्तीला, आत्मविश्वासाला, आत्मनिर्भरतेच्या संकल्पाकडे घेऊन जाणार आहे, यात शंका नाही.

*(या लेखाचे लेखक हे राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट प्रेरक-प्रशिक्षक आहेत. सध्या ते एमसीईडी मुख्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०३०७८७५९ आहे.)*




*एमसीईडी उपकेंद्र हिंगणा रोड नागपूर येथे एक्सपोर्ट फार्मावर आधारित ६ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय श्री.पी. एम. बल्लाळ सहाय्यक आयुक्त एफडीए (FDA) श्री.अतुल पेटीया एक्स प्रेसिडेंट, श्री.रितेश मिश्रा प्रेसिडेंट, श्री.जश ठक्कर सेक्रेटरी, JCI श्री.एच.पी. सिंग, key Faculty, श्री.एच. आर. वाघमारे केंद्र प्रमुख, श्री. पंकज ठाकरे डीपीसी MCED व कार्यक्रम समन्वयक के. पी. टाकले, श्री.निलेश मसराम कार्यालयीन सहायक यांच्या उपस्थितीत पार पडला. पहिल्यांदाच MCED उपकेंद्र येथे अपुरस्कृत प्रशिक्षणामध्ये एकूण ३५ फार्मा उत्पादक उद्योजक यांनी सहभाग घेतला असून पुढील ५ दिवस हा प्रशिक्षण सुरू राहणार आहे या उद्घाटन कार्यक्रमांमध्ये सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाच्या आयोजनाकरिता मा. कार्यकारी संचालक MCED व मुख्यालयांचे सहकार्य प्राप्त झाले तसेच उपकेंद्राच्या सर्व कार्यक्रम समन्वयक सहकार्य मिळाले.*




# हॅकर्सना धडा शिकवणारे
# न्युटन्स ॲपल

**आर्थिक फटका, माहितीची चोरी, माहितीचा गैरवापर करुन फसवणूक करणे आदींमुळे अनेक व्यक्ती, संस्था, कंपन्या यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. यापासून आपले संरक्षण कसे करायचे याबाबत सेबी, रिझर्व्ह बँक, भारत सरकार आणि अनेक संस्था सतत लोकजागृती करण्याचे काम करीत असतात तरी देखील हे सायबर विश्वातील हॅकर्स अलगद सावज गाठतात. सायबर विश्वातील हॅकर्स, चाचे, भामटे यांना घडा शिकविणाऱ्या 'न्यूटन्स ॲपल्स' याविषयी.**

**- प्रसाद घारे**

भारतात जुन २४ मध्ये प्रत्येक दिवशी सरासरी ४६ कोटी ऑनलाईन आर्थिक व्यवहार ('युपीआय' च्या माध्यमातून) झाले आणि त्यातून जवळपास ६६ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली अशी बातमी नुकतीच एका इंग्रजी वर्तमानपत्रात वाचनात आली. ही बातमी वाचून ऑनलाईन आर्थिक व्यवहारात भारताने केलेल्या अभिमानास्पद कामगिरीचे कौतुक वाटले. दुसर्या बाजुला ऑनलाईन चाचे, भामटे म्हणजेच हॅकर्ससाठी किती मोठी संधी निर्माण झाली आहे याची चिंता सतावू लागली. ऑनलाईन व्यवहार करताना घ्यायची काळजी याच्या अनेक जाहिराती रिझर्व्ह बँक, सेबी, आयआरडीएआय अशा विविध संस्था दररोज करीत असल्या तरी देखील गेल्या काही वर्षात ऑनलाईन फसवणुकीचे अनेक नवनवीन मार्ग या हॅकर्सनी शोधून काढले आहेत. त्यांच्या या जाळ्यात अनेक सुशिक्षित, पदवीधर, अशिक्षित, श्रीमंत, गरीब व्यक्ती अलगद अडकतात. आपल्या कळत, नकळत कुठल्या तरी अनोळखी व्यक्तीचा आपण फोन घेतो किंवा कुठली तरी लिंक क्लिक करतो आणि पाहता पाहता बँकेतून पैसे नाहीसे होतात. असे शेकडो सायबर गुन्हे रोज घडत असतात. रोजच्या वर्तमानपत्रात या बद्दल रकानेच्या रकाने भरून बातम्या येतात. ऑनलाईन च्या या जमान्यात आपण सर्वच जणं स्मार्ट झालो आहोत असे आपल्याला वाटत असते मात्र या अशा बातम्या वाचल्या की दिवसाढवळ्या गोडबोलून चोऱ्या करणारे आपल्या पेक्षा जास्त स्मार्ट असतात हे आपल्या लक्षात येते. म्हणूनच या चोरांना आजच्या जमान्यात हॅकर असे म्हटले जाते. हा हॅकर काय करतो तर एखाद्या व्यक्तीच्या परवानगीशिवाय किंवा नकळत त्याच्याशी संबंधित माहिती मिळवतो आणि त्याचा वापर करून एखादी महत्त्वाची माहिती, कागदपत्रे, पैसे, पीन नंबर, बँक अकाऊंट नंबर, पॅन, आधार नंबर इत्यादीची चोरी करतो याला हॅकिंग असे म्हणतात. जगाच्या पाठीवर कोठूनही असे हॅकिंग करता येते त्यामुळेच त्यांना पकडणे अवघड असते मात्र अशक्य नसते. अशा या हॅकर ना लगाम घालण्याचे काम करणाऱ्यांना एथिकल हॅकर (नैतिक अंतर्भेदन) म्हणतात. म्हणजेच सोप्या मराठी भाषेत काट्याने काटा काढणे.

**एथिकल हॅकर :** या हॅकरचे (ऑनलाईन चाचे,भामटे) मनसुबे उधळून लावणाऱ्या, त्यांची कृष्णकृत्ये उजेडात आणणाऱ्या दोन मराठी तरुण उद्योजकांची साहसकथा आपल्याला सांगायची आहे. हे दोघे सर्टिफाईड एथिकल हॅकर आहेत. लोकांची, संस्थांची, कंपन्यांची, बँकांची वेळी, अवेळी दिवसाढवळ्या होणारी फसवणूक करणाऱ्या या भामट्यांना म्हणजेच हॅकरना वेसण घालण्याचे काम हे करतात. यासाठी त्यांनी एक कंपनी स्थापन केली आहे तीचे नाव न्यूटन्स ॲपलही कंपनी ISO 27001: 2013, ISO 27701, ISO 9001 CERTIFIED (प्रमाणित) आहे. ऐश्वर्या गोरे आणि मंदार वाघमारे यांनी पुणे विद्यार्थी गृहाच्या (मुक्तांगण) अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग ची पदवी घेत असतानाच म्हणजे सन २०१७ मध्ये ही कंपनी स्थापन केली. इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग पेक्षा या दोघांना सायबर विश्वात घडणाऱ्या घडामोडी, हॅकिंग, हॅकर, सायबर सिक्युरिटी, नेटवर्किंग, मध्ये अधिक रस होता. या विषयाचा दोघांनी मन लावून अभ्यास करायला सुरुवात केली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांची परवानगी घेऊन मंदार ने इंजिनियरिंगच्या दुसर्या वर्षातच सायबर सिक्युरिटी या विषयावर एक कार्यशाळा घेतली होती. यासाठी दोनशे रुपये शुल्क ठेवण्यात आले. याला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला त्यामुळे एक तासाची ही कार्यशाळा बरेच तास चालू होती. या कार्यशाळेसाठी मंदारला ऐश्वर्याने मदतीचा हात दिला. येथेच न्यूटन्स ॲपलची बीजे पेरली गेली होती. न्यूटन्स ॲपल एलएलपी चे आज देशविदेशात दोनशे पेक्षा जास्त ग्राहक आहेत. यामध्ये रुग्णालये, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, सिमेंट कंपन्या, विविध उत्पादन कंपन्या, सेबी, आयआरडीएआय, बँका, आर्थिक संस्था, औषध कंपन्या, आणि पीएमएस (पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सार्व्हिसेस) कंपन्यांचा समावेश आहे. ऐश्वर्या आणि मंदार हे या कंपनीचे संस्थापक असून या कंपनीत दोघे भागीदार म्हणून काम करतात. कंपनीची सध्या पंचवीस जणांची टीम असून त्यात काही कर्मचारी तर काही सल्लागार आहेत. विशेष म्हणजे ही सगळी तरुण मंडळी आहेत. हॅकिंग या विषयात ते पारंगत आहेत.

**फिश इन्स्टिंक्ट :** 'फिशिंग' हे हॅकर्सचे जणू चलनीनाणेच. याचा उपयोग करून अनेकांना सहज फसवता येत असल्याने याचा सर्रास वापर ते करतात असे

'न्यूटन्स ॲपल्स' च्या लक्षात आले. त्यांनी फसवणूकीच्या विविध पद्धतीच्या मुळाशी जावून अभ्यास केला. तसेच बाजारात उपलब्ध असणाऱ्या अन्य सॉफ्टवेअर मधील चांगल्या गोष्टी आणि कच्चे दुवे समजून घेतले आणि या हॅकर्स ना धडा शिकविण्याच्या उद्देशाने एक सॉफ्टवेअर विकसित केले. त्याचे नाव 'फिश इन्स्टिंक्ट' (Phis Instinct) www.phishinginstinct.com हे सॉफ्टवेअर सध्या टाटा टेक्नॉलॉजीज या आघाडीच्या कंपनीमधील देशविदेशात काम करणारे बारा हजार कर्मचारी वापरत आहेत. हे सॉफ्टवेअर प्रामुख्याने फिशिंग म्हणजे नेमके काय, त्यापासून सावध कसे रहायचे, त्याचा मुकाबला कसा करायचा याचे फिशिंग सिम्युलेशन च्या माध्यमातून मेलव्दारे प्रशिक्षण देते. या प्रशिक्षणातून 'न्यूटन्स ॲपल्स' ला कोणता कर्मचारी फिशिंग च्या कोणत्या जाळ्यात अडकतो हे समजू शकते. काही जणं अनोळखी फोनमुळे, काही जणं फसव्या ईमेल मुळे तर काही जणं गिफ्ट्सच्या मोहात अडकतात. त्यांना त्यानुसार प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण वारंवार दिले जाते. कधी कधी ते अचानक दिले जाते. यातून कर्मचारीवर्ग फिशिंग च्या जाळ्यात अडकत नाही ना हे तपासले जाते. या प्रशिक्षणातून कर्मचारीवर्गात जागृकता (Awareness) निर्माण होण्यास मदत होते. हीच जागृकता त्यांना फिशिंग च्या मोहापासून परावृत्त करते.

रिझर्व्ह बँक, सेबी, आयआरडीएआय तसेच अन्य सरकारी संस्थांनी अशा स्वरूपाचे प्रशिक्षण घेणे आणि आवश्यक आनुपालन (Compliances) करणे बंधनकारक केले आहे. यादृष्टीने 'फिश इन्स्टिंक्ट' (phis Instinct) हे सॉफ्टवेअर अतिशय गरजेचे झाले आहे. हे सॉफ्टवेअर पूर्णपणे भारतीय बनावटीचे असून ते क्लाऊड वर उपलब्ध आहे. वार्षिक, सहामाही, किंवा महिन्याचे ठराविक शुल्क (Subscription) भरून त्याचा उपयोग करता येतो. बँका, विमा कंपन्या, मोठे ब्रोकर्स, म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर, लहान, मोठ्या खासगी आणि सरकारी कंपन्या यांच्यासाठी ते उपयुक्त आहे.

**ऐश्वर्या आणि मंदार वर्गमित्र :** ऐश्वर्या गोरे आणि मंदार वाघमारे हे दोघं पुणेकर. ऐश्वर्या कर्वेनगर येथील पटवर्धन बाग परिसरातील. अभिनव हायस्कूल ही तिची शाळा. मंदार पिंपरी चिंचवड परिसरात राहणारा

सेंट उर्सुला हायस्कूल या शाळेचा तो विद्यार्थी. ऐश्वर्या आणि मंदार पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी. दोघांनी इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग ची पदवी संपादित केली. मात्र दोघांची आवड एकच होती ती म्हणजे सायबर सिक्युरिटी या क्षेत्रात काम करण्याची. विशेष म्हणजे दोघांना नोकरी पेक्षा याच क्षेत्रात स्वतंत्र उद्योग/व्यवसाय सुरु करायचा होता. महाविद्यालयात असतानाच त्यांनी या क्षेत्रात कामाला सुरुवात केली. सन २०१९ मध्ये पदवी हातात आल्यावर दोघांनी एक वर्ष नोकरीचा अनुभव घेतला. त्यानंतर कोविड मध्ये वेळ गेला अखेर सन २०२० मध्ये किर्लोस्कर ऑईल इंजिन या कंपनी कडून त्यांना पहिले काम मिळाले त्यानंतर लहान, मोठ्या कंपन्यांकडून कामे मिळायला सुरुवात झाली. आज या दोघांनी स्थापन केलेल्या 'न्यूटन्स ॲपल' या कंपनीत पंचवीस जणं काम करतात तर देशविदेशातील ग्राहकांना ते सायबर सिक्युरिटी या क्षेत्रात आधुनिकातील आधुनिक सेवा पुरविण्याचे काम करतात. कंपनीच्या विस्ताराच्या दृष्टीने त्यांची परदेशातील काही गुंतवणूकदारां बरोबर बोलणी चालू आहेत. सध्या बर्याच गोष्टी ऑनलाईन केल्या जातात. यामुळे वेळ वाचून कामे पटकन होत असली तरी याचे धोके अनेक आहेत. आर्थिक फटका, माहितीची चोरी, माहितीचा गैरवापर करुन फसवणूक करणे आदींमुळे अनेक व्यक्ती, संस्था, कंपन्या यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. यापासून आपले संरक्षण कसे करायचे याबाबत सेबी, रिझर्व्ह बँक, भारत सरकार आणि अनेक संस्था सतत लोकजागृती करण्याचे काम करीत असतात तरी देखील हे सायबर विश्वातील हॅकर्स अलगद सावज गाठतात. या हॅकर्स ना लगाम घालण्याचे काम ऐश्वर्या आणि मंदार सारखे एथिकल हॅकर अहोरात्र करीत असले तरी त्यांचे प्रयत्न अपुरे पडतात यासाठी आपण सगळ्यांनी कोणताही ऑनलाईन व्यवहार करताना सावधानता बाळगणे खूप महत्त्वाचे आहे. आपण बेसावध राहिलो की हॅकर्स आपला खिसा कापणार हे नक्की.

**दुबई मध्ये ऑफिस :** न्यूटन्स ॲपल चे बरेचसे ग्राहक हे गल्फ मध्ये आहेत. युरोप आणि अमेरिकेतील मार्केट आता अकुंचन पावत आहे. अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांची मुख्यालय, कार्यालये दुबई मध्ये आहेत. याचा विचार करुन लवकरच एक ऑफिस दुबई मध्ये सुरु करण्याचा आमचा विचार आहे. असे सांगून ऐश्वर्या गोरे म्हणाली की, आमच्या कंपनीने सायबर सिक्युरिटी चा विचार करून काही उत्पादने तयार करण्याचे काम चालू केले आहे. यातील एका उत्पादनाचे नाव नताशा असे आहे NATASHA म्हणजेच

Newtons Apple Threat Analyzer Secure Home Assistant. सायबर सिक्युरिटी या क्षेत्राची भारतातील बाजारपेठ ही १.५ बिलियन डॉलर्स इतकी आहे. ती सन २०२८ पर्यंत वाढून ४.७ बिलियन डॉलर्स होण्याची शक्यता आहे. या क्षेत्राची जागतिक बाजारपेठ आजच्या घडीला १९०.४ बिलियन डॉलर्स आहे, ती सन २०२८ पर्यंत २९८ बिलियन डॉलर्स पेक्षा अधिक होईल असा अंदाज अभ्यासकांनी वर्तविण्यात आला आहे. भविष्यकाळात या क्षेत्रात देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेत खूपच संधी आहेत. याचा विचार करुन आम्ही दुबईत ऑफिस सुरु करण्याचा विचार करीत आहोत असे ऐश्वर्या आणि मंदारने आवर्जून सांगितले.

**नवीन संधी :** नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर बँकिंग ट्रेनिंग अँन्ड सार्व्हिस (NIBTS) या संस्थेच्या माध्यमातून मंदारने जून महिन्यात सिमला येथे देशातील सहकारी बँकाचे अध्यक्ष, सीईओ यांना सायबर सिक्युरिटी संदर्भात प्रशिक्षण दिले. रिझर्व्ह बँकेने बँकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना असे प्रशिक्षण देणे बंधनकारक केले आहे. अशी प्रशिक्षणाची संधी न्यूटन्स ॲपल्सला आगामी काळात मिळणार आहे. डेन्मार्क मधील एका मेडिकल डिव्हाईस करणाऱ्या कंपनीसाठी 'न्यूटन्स ॲपल्स' सध्या काम करीत आहे. ऑनलाईन ब्लड तपासणी आणि विश्लेषण करताना तसेच रुग्णाची मेडिकल हिस्ट्री एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी पाठवताना सायबर चाचे,भामटे ही माहिती हॅक करायची भिती असते त्याचा विचार करुन सायबर सिक्युरिटी पुरवण्याचे काम या कंपनीसाठी न्यूटन्स ॲपल्स करत आहे. या नवीन कामामुळे भविष्यात फार्मा क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होणार आहेत असे सांगताना मंदार आणि ऐश्वर्या म्हणाले, नव्याने विकसित केलेले फिश इन्स्टिंक्ट हे सॉफ्टवेअर जास्तीत जास्त कंपन्या आणि बँकापर्यंत नेण्यासाठी एक सेल्स तसेच प्रॉडक्ट टीम उभी करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. सायबर सिक्युरिटीज या क्षेत्रात जगभरात अनेक संधी नव्याने निर्माण होत आहेत त्याचा विचार करुन न्यूटन्स ॲपल्सची टीम तयार करण्याचा आमचा विचार आहे.

आजच्या ऑनलाईनच्या जमान्यात 24x7 जागते रहो हा मंत्र आपल्याला कायमच लक्षात ठेवायला लागणार आहे हेच खरे. तेव्हा जागते रहो. सायबर विश्वातील हॅकर्स, चाचे, भामटे यांना घडा शिकविणाऱ्या 'न्यूटन्स ॲपल्स' ला आणि त्यांच्या टीम मेंबर्सच्या आगामीकाळातील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

*(या लेखाचे लेखक मुक्त पत्रकार असून त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३००५४४८ असून ई-मेल prasad.ghare@gmail.com आहे.)*

# नमुना प्रकल्प अहवाल

## इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल

**ओळख :** सदरील प्रकल्प हा इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल उत्पादित करण्याचा आहे. आजकाल आपणा सर्वांना माहिती आहे की, बाजारपेठेतून यांत्रिक वेईंग स्केल हळूहळू नाहीशी होत आहेत व त्याची जागा इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल घेत आहे. कारण त्याचे फायदे पण खूप आहेत. लहान उद्योजकांना याची बाजारपेठ खूप मोठी आहे व वाढतच जाणार आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा ५,००० चौरस फूट

इमारत ३,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** ...

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-२, अर्धकुशल-३, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :** बेंच ड्रिलिंग मशीन, ओसीलो, स्कॉर्पेट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | -- |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | १०,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | १,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | २,००,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **३,५०,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | २,२५,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ८,००,००० |
| पक्का माल | ४,००,००० |
| प्रत्यक्ष | १,००,००० |
| **एकूण :** | **१३,००,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ९६,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | २,२५,००० |
| पाणी | २५,००० |
| **एकूण :** | **२,५०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-२ | ६,००,००० |
| अर्धकुशल-३ | ६,३०,००० |
| अकुशल-२ | ३,००,००० |
| **एकूण :** | **१५,३०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १७,००० |
| **एकूण :** | **६७,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३५,००० |
| **एकूण :** | **१,३५,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक | ३,५०,००० |
| वॉचमन | ६०,००० |
| **एकूण :** | **४,१०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | २,६०,००० |
| प्रवास खर्च | ६०,००० |
| **एकूण :** | **३,२०,०००** |
| **एकूण :** | **७,३०,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ५,५०,००० |
| इतर | ३,२५,००० |
| **एकूण :** | **८,७५,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | -- |
| इमारत | -- |
| यंत्रसामग्री | १०,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ३,५०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | २,२५,००० |
| **एकूण :** | **१५,७५,०००** |
| खेळते भांडवल | १३,००,००० |
| **एकूण :** | **२८,७५,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे १० टक्के | २,८७,५०० |
| बँकेचे कर्ज ९० टक्के | २५,८७,५०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ९६,००,००० |
| उपयुक्तिके | २,५०,००० |
| वेतन व भत्ते | १५,३०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ६७,००० |
| घसारा | १,३५,००० |
| प्रशासकीय खर्च | ७,३०,००० |
| विक्री खर्च | ८,७५,००० |
| व्याज | ३,१०,५०० |
| **एकूण :** | **१,३४,९७,५००** |
| **वार्षिक विक्री :** | **१,६४,६६,९५०** |
| **वार्षिक नफा :** | **२९,६९,४५०** |

# सिंटर्ड मेटल ब्रश

**ओळख :** सदरील प्रकल्प हा सिंटर्ड मेटल ब्रश उत्पादित करण्याचा आहे. सिंटल मेटल ब्रशाचा वापर ऑटोमोबाइल, टेक्सटाइल, ॲग्रीकल्चर, होम अप्लायन्सेसमध्ये होतो व काही प्रमाणात एअरक्राफ्ट उद्योगात होतो. याची बाजारपेठ खूप मोठ्या प्रमाणात वाढते आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा २५,००० चौरस फूट

इमारत १५,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** ......

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-१०, अर्धकुशल-५, अकुशल-५

**लागणारी यंत्रसामग्री :** ........

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ४५,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | २,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | १,००,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **३,५०,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | २,००,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २,२५,००० |
| पक्का माल | १,००,००० |
| प्रत्यक्ष | १,००,००० |
| **एकूण :** | **४,२५,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २७,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १,८०,००० |
| पाणी | ३०,००० |
| **एकूण :** | **२,१०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-१० | १५,००,००० |
| अर्धकुशल-५ | ८,००,००० |
| अकुशल-५ | ६,००,००० |
| **एकूण :** | **२९,००,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | २,२५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १७,५०० |
| **एकूण :** | २,४२,५०० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ४,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३५,००० |
| **एकूण :** | **४,८५,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-२ | ४,००,००० |
| वॉचमन-१ | ६०,००० |
| **एकूण :** | **४,६०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ३,५०,००० |
| प्रवास खर्च | २,२५,००० |
| **एकूण :** | **५,७५,०००** |
| **एकूण :** | **१०,३५,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ३,२५,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **३,७५,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ४५,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ३,५०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | २,००,००० |
| **एकूण :** | **५०,५०,०००** |
| खेळते भांडवल | ४,२५,००० |
| **एकूण :** | **५४,७५,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | १६,४२,५०० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ३४,३२,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २७,००,००० |
| उपयुक्तिके | २,१०,००० |
| वेतन व भत्ते | २९,००,००० |
| देखभाल व दुरुस्ती | २,४२,५०० |
| घसारा | ४,८५,००० |
| प्रशासकीय खर्च | १०,३५,००० |
| विक्री खर्च | ३,७५,००० |
| व्याज | ४,५९,९०० |
| **एकूण :** | **८४,०७,४००** |
| **वार्षिक विक्री :** | **९८,३६,६५८** |
| **वार्षिक नफा :** | **१४,२९,२५८** |



# प्रश्नपेटी

**प्रश्न : कॉटन लायक्रा प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**प्रसन्न देशपांडे, पुणे**

**उत्तर :** कॉटन लायक्रा प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जागा ७,००० चौरस फूट

इमारत ५,००० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज २० अश्वशक्ती

पाणी ५ के.एल.

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-२, अकुशल-३

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक कॉटन लायक्रा मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे डाईक ब्लीच्ड, इलॅस्टिक झीपर्स, इतर

या प्रकल्पासाठी एकूण भांडवल ३० ते ३५ लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ५ ते १० लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता २० ते ३० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा २० ते २२ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : पीनट बटर प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विशाल धायगुडे, धाराशिव**

**उत्तर :** पीनट बटर प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

जागा २,००० चौरस फूट

इमारत १,००० चौरस फूट

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-१, अकुशल-१

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक पीनट बटर मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे .......... व इतर

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २० ते ३० लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १५ ते २० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ३ लाख ते ५ लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १७ ते १९ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : हेअर ब्रशेस प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**प्रतिक पाटील, जळगाव**

**उत्तर :** हेअर ब्रशेस प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा ३,००० चौरस फूट

इमारत १,००० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज १० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-२, अकुशल-१

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : हेअर ब्रशेस मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे व दर्जाचे ......... व इतर या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २० ते ३० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १० ते २० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ७ ते १० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २३ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १३ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : व्हॅक्युम पायरोलॅसिस प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विक्रम वर्मा, नागपूर**

**उत्तर :** व्हॅक्युम पोयरोलॅसिस प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा १५,००० चौरस फूट

इमारत ५,००० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज ३० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : व्हॅक्युम पोयरोलॅसिस मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेस्ट टायर्स, केमिकल्स इत्यादी.

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल १०० ते ११० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ७० ते ८० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता २० ते ३० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा ३० ते ३२ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात यईल.)*

# उद्योग, व्यापार, व्यवसायाद्वारा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सर्व काही...

प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादीसंदर्भात माहिती.

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

**उद्योजक**

अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com

To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in


## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३१९६).*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ______________________

पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ______________________

______________________

पिन कोड ______________________

कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ______________________

| वर्गणीचे दर | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

| जाहिरातींचे दर | |
|---|---|
| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करुन पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गदार व्हा..!

**ऑफिसर कोड 46 टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास 9403078779 वर संपर्क साधा.**

**वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे**

कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५९६ IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३१९६ वर कळवावा.

# उद्योजक

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, 'उद्योजक' मासिक वर्गणी/जाहिरात

### संपर्काचे पत्ते

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी 'उद्योजक' मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातींविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले 'उद्योजक' कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

## महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे (एमसीईडी) राज्यातील कार्यालयांचे पत्ते

**मुंबई विभाग :** श्री.राजेश कांदळगांवकर, विभागीय अधिकारी, कोकण विभाग, श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८९६, २७५६४०२५, ८१८०९९७९०९, ९४०३०७८७७२. श्री.प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), मुंबई शहर/उपनगर, द्वारा विकास सेंटर, ७वा मजला, रुम नं.७०२, डॉ.सी.जी.गिडवाणी मार्ग, बसंत टॉकीजजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई-४०० ०७४, ७९७७२४२१६७. श्री.सुबोध बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी.एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मुलुंड चेक नाका, ठाणे (प)-४०० ६०२. ७७७४०५३०१४. श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रायगड बाझारसमोर, अलिबाग, जिल्हा रायगड-४०२२०१. ९४०३०७८७७२. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.१०३, कोळगाव, ता. जि.पालघर, ☎८६६९०५४०७८. चारुशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ९४०५०५९०२०. **पुणे विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.एम.डी. शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. ☎ ९४०३०७८७५३, २५५३७७२४/२५५२०३५९. श्री.एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, सी-१८१, एच ब्लॉक, इंजिनिअरिंग ऑटो क्लस्टर परिसर, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१९. ☎७३८७०२०२३५. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२१. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८१९०१८९. **कोल्हापूर विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), प्लॉट क्र.३१५, दत्ताजी चेंबर्स, ई वॉर्ड, न्यू शाहूपुरी, मराठा रिजन्सी हॉटेलसमोर, कोल्हापूर-४१६६०१. ☎(०२३१) २६६२०७१. श्री.प्रवीण कायंदे, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, महावीर गार्डनसमोर, कोल्हापूर-४१६ ६०१. ☎(०२३१) २६६६७४८.सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९, ७०५७९९४३०८. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.) एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०४९५०००४. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, ☎२२१३६२, २२८७०५, ९४०३०७८७६७. **नाशिक विभाग :** श्री.आलोक मिश्रा, विभागीय अधिकारी, श्री.एस.ए.भामरे, प्रकल्प अधिकारी, श्री.मंगेश बनकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक, ☎२३५२१५१, २३६३४१४, ९४०३०७८७६३, ७७२००७५९०१, ८२०८०५५०१९. आरती शेलोरकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ८७८८५५७५३०. श्री.टी.पी.जिवडे, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन मार्ग, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, अहमदनगर. ☎२३२०४८५,९५६१७३७७४७. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, ७७२००७५९०१. श्री.डी.एस.ढाकणे, क. प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नंदुरबार. ☎०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९. **नागपूर विभाग :** श्री.प्रदीप इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, शिवानी गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री कर कार्यालयाजवळ, नागपूर. ☎२५३७०९७, ९४०३०७८७६९ ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, श्री. पंकज ठाकरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२, ८९७५५०६६३०. श्री.रोशन तायवडे, क. प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३, ९८३४३५२२९५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टँडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर, ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. कु.काजोल राठोड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१, ७६६६१३६३८९. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. संगीता ढोणे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४, ☎२५०२७४, ८७८८६४८९६५. **छत्रपती संभाजीनगर विभाग :** श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.) सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. ९४०३०७८७६६, ९४०३६८३१७३, ९८८१३०४९३०. श्री.विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९०४९२२८८८८. श्री.दत्तात्रय क्षीरसागर, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ७०५७९६८१३१. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. **नांदेड विभाग :** श्री.किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), उद्योग भवन, तळ मजला, शिवाजीनगर, नांदेड. मो. ९४०३०७८७८३, ९४०३६८३१९७. श्री.के.व्ही.राठोड, प्रकल्प अधिकारी, हॉल क्र.७४, सर्व्हे नं. ६२२, वार्ड क्र.२०, चिद्रावार नगर, शासकीय कृषी कार्यलयाजवळ, जुना पेडगाव रोड, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ९४०३०७८७७३. श्री.दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री. सुधीर आठवले, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली. ☎२२२२१८, ९७६५२९१७८५. **अमरावती विभाग :** श्री.पी.व्ही.इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.पी.व्ही.इंगळे, प्रकल्प अधिकारी, श्री. राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), श्री.नेत्रदीप चौधरी, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही.मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२. ९४०३०७८७६९, ८८५७८६९८८३, ९८२२४४१२०९. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८,० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जतकर भवन, टिळकवाडी, बस स्टँड मार्ग, बुलढाणा, ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रूपेश हिरुलकर, क.प्रकल्प अधिकारी (से.पू.), उद्योग भवन, अमरावती मार्ग, यवतमाळ. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.गौरव इंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम, मो. ९४०५५४८३२९

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak August 2024
Date of Publication : 25th July 2024

For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

## धोरण रोजगार निर्मितीचे,
## उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

* ''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा''
* मार्गदर्शन व गुंतवणूकीसाठी पैशांचा अभाव आहे का?
* उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही का?
* तर उद्योजक होण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपीचा लाभ घ्या.

* या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख तर
* सेवा व कृषि पूरक प्रकल्पांसाठी २० लाख रूपयांपर्यंतचे कर्ज पुरवठा.
* मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे.
* तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वंयरोजगार उभारण्यासाठी आजच सीएमईजीपीचा लाभ घ्या.



**: अधिक माहिती व संपर्कासाठी :**

राज्यस्तरीय संनियंत्रण : विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
हेल्पलाईन नंबर : २२ २२०२ ३९१२.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)
संकेतस्थळ : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

**Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in**


**If undelivered please return to**

Chief Editor,
Udyojak Magazine,
उद्योजक
MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar-431005.**
Portal : www.mced.co.in

**To,**

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s.Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar-431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**